# भारतीय नररत्ने

लेखक : नरसिंह चिंतामण केळकर
संपादक : काशीनाथ नरसिंह केळकर
एम्.ए., एल्एल्.बी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
३७८८८ वि: ११९३४ —
१५८७ नों: दि: ६।५।६५

एकेक अलौकिक मूर्ति
करि कर्तव्याची पूर्ति
मिळवी शाश्वत जी कीर्ति
त्या 'नररत्नां'चा दाता – एक काळ ऐसा होता ॥

—कै. दु. आ. तिवारी

REFBK-0012729

सुविचार प्रकाशन मंडळ
नागपूर आणि पुणे

किंमत १ रुपया १२ नवे पैसे

प्रथमावृत्ती, एप्रिल १९६४
© सुविचार प्रकाशन मंडळ

प्रकाशक :
श्यामकान्त बनहट्टी,
सुविचार प्रकाशन मंडळ,
धनतोली, नागपूर १.
४६१/४, सदाशिव, पुणे २.

१. भारतीय नररत्ने
२. आकार : क्राऊन अष्टपत्री
३. कागद : ५१ × ७६ सेंटिमीटर,
१२·७ किलो, व्हाइट प्रिंटिंग.
४. टाइप : १२ पाइंट
५. किंमत : १ रु. १२ न. पै.
६. मराठी, गट A (a)–
माध्यमिक शालान्त परीक्षा,
१९६६; शीघ्र वाचनासाठी.

♣

मुद्रक :
श्यामकान्त बनहट्टी,
श्रीनिवास मुद्रणालय,
सुविचार प्रकाशन इमारत,
धनतोली, नागपूर १.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...३५८६८८... वि: ...निबंध
...१५०७९ नों: दि: ...६।२।६८

## संपादकीय निवेदन

साहित्यसम्राट कै. नरसिंह चिंतामण केळकर यांनी काही विख्यात भारतीय स्त्री-पुरुषांच्या गौरवार्थ लिहिलेल्या लेखांचा हा एक छोटासा संग्रह आज वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. तात्यासाहेब केळकर हे एक सिद्धहस्त व शैलीकार लेखक होते. कोणताही विषय प्रसादपूर्ण भाषेत, खुलवून, खुमासदार रीतीने मांडण्याची त्यांची हातोटी अप्रतिम होती. त्यामुळे निबंधवाङ्मयाच्या क्षेत्राबरोबरच चरित्रवाङ्मयाच्या क्षेत्रातही ते मोलाची भर घालू शकले. 'लो. टिळकांच्या चरित्रा'त त्या काळच्या अनेक थोर व गाजलेल्या व्यक्तींची सुंदर व्यक्तिचित्रे त्यांनी रंगविली आहेत. याशिवाय 'केसरी'चे संपादक असताना, कोणत्या ना कोणत्या निमित्ताने त्यांना थोर व्यक्तींविषयी लिहावे लागत असे. काही थोर पुरुषांच्या चरित्रांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या, त्यातूनही त्या व्यक्तींच्या कार्याची ओळख करून दिली आहे. अशा त्यांच्या सर्व लिखाणातून अकरा थोर भारतीयांवरील लेख येथे संकलित केले आहेत. मुख्यतः विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हे पुस्तक तयार केले असल्यामुळे सर्व लेखांवर संपादकांनी एकदा हात फिरविला असून अनावश्यक त्याचप्रमाणे विवाद्य असा मजकूर किंवा उल्लेख गाळले आहेत. भारताचा अर्वाचीन आणि आधुनिक इतिहास घडविण्यास ज्यांनी साह्य केले अशा थोर नररत्नांच्या कार्याचा केळकरांच्या सुबोध शैलीतून विद्यार्थ्यांना परिचय व्हावा या हेतूने पुस्तक तयार केले आहे. हे लेख निवळ चरित्रपर म्हणजे व्यक्तीच्या जीवनाची फक्त संपूर्ण हकीकत सांगणारे नसून, त्याच्या कार्याची व गुणांची थोडक्यात ओळख करून देणारे आणि त्याचे व्यक्तिमत्त्व रेखाटणारे असे चर्चात्मक आहेत. राजकीय, वाङ्मयीन, सामाजिक या क्षेत्रांत कार्य केलेल्या थोर व्यक्तींवरील लेखांचा या पुस्तकात समावेश आहे.

लेखांमध्ये, चटकन ज्यांचा संदर्भ लक्षात येणार नाही अशा काही तत्कालीन घटनांचे किंवा व्यक्तींचे उल्लेख आहेत, त्यांच्याविषयी शेवटी थोडक्यात टीपा दिल्या आहेत. पुस्तकाचे संपादन करीत असताना प्रा. श्री. ना. बनहट्टी यांची बहु[illegible] यांचा आभारी आहे.

—संपादक

REFBK-0012729

# अनुक्रमणिका

१. शिवाजी महाराजांची थोरवी ... १
२. महर्षी दादाभाई नौरोजी ... १५
३. न्या. महादेव गोविन्द रानडे ... २२
४. सर फिरोजशहा मेथा ... २९
५. डॉ. ॲनी बेझंट ... ३४
६. लो. बाळ गंगाधर टिळक ... ४१
७. महर्षी धोंडो केशव कर्वे ... ५०
८. स्वामी विवेकानंद ... ५८
९. ना. गोपाळ कृष्ण गोखले ... ६६
१०. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ... ७२
११. विनायक दामोदर सावरकर ... ८१
संक्षिप्त टीपा ... ८८ ते ९६

●●

महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणखात्याने मान्य केलेल्या मराठीच्या लेखन-नियमांप्रमाणे या पुस्तकाचे मुद्रण केले आहे.

अनुक्रम ३७६६९ वि: निबंध
क्रमांक १५७९ नों दि ६।१।५६



# १.

# शिवाजी महाराजांची थोरवी

| जन्म | मृत्यू |
|---|---|
| ३० मार्च १६३० | ४ एप्रिल १६८० |

१२८२८

ऐतिहासिक कालगणनेत शतकाला विशेष महत्त्व देतात. एक शतक पुरे झाले म्हणजे कोणत्याही गोष्टीने कालाचा एक मोठा टप्पा गाठला असे मानण्यात येते. आता ' शंभर वर्षे भरली ' या शब्दातून नाशाची कल्पना सूचित होते; पण तसा अर्थ न घेतला तर त्याच शब्दांनी कृतकृत्यतेचाही बोध होतो. या दृष्टीने चालू १९४५ हे वर्ष महत्त्वाचे ठरते. कारण महाराष्ट्रातील पूर्वीच्या एका मोठ्या ऐतिहासिक घटनेनंतर बरोबर तीन शतके यंदा पुरी होतात. तीनशे वर्षे आपण मागे गेलो म्हणजे १६४५ हे साल येते; आणि मराठ्यांच्या इतिहासात या वर्षाला अपूर्व महत्त्व आहे. कारण त्या वर्षात शिवाजीच्या स्वराज्य-स्थापनेच्या कार्याला प्रारंभ झाला.

यापूर्वी सुमारे आठ वर्षे शहाजीने शिवाजीला, बरोबर दादाजी कोंडदेव देऊन, महाराष्ट्रातील बीजभूत स्वराज्याचा–जहागिरीचा–मुलूख संभाळण्याला पुण्यास पाठविले. अनेक स्थित्यंतरानंतर या वेळी शहाजीने विजापूर-दरबारी राहून बादशहाची सरदारी कायमची करण्याचे ठरविले होते, व बंगलोराहून तो परत विजापूरला आला होता. शिवाजी एक वेळ बंगलोरास बापाकडे गेला होता. पण फार थोडे दिवस राहून परत पुण्याला आला. शहाजीने याच वेळी दादाजी, शामराज नीळकंठ, रघुनाथ बल्लाळ, सोनोपंत इत्यादी मंडळींना अशा विचाराने पुण्यास पाठविले की, शिवाजीने परत आपणाकडे येऊ नये, व पुणे जहागिरीची व्यवस्था शिवाजीच्या नावेच दादाजीने कुलमुखत्यारीने करावी. पुणे जहागिरीच्या मानाने बंगलोरकडे मोठी जहागिरी मिळून जवळ जवळ स्वतंत्र राज्य स्थापण्याइतका वाव तिकडील परिस्थितीमुळे शहाजीला कदाचित मिळाल्यासारखा होता. शिवाय एक जहागीर बंगलोराकडे व एक पुण्याकडे अशा दोन झाल्या तर बरेच. कारण शहाजीने दोन लग्ने करून दोन संसार थाटले होते. अर्थात दोनही बायकांपासून झालेल्या संततीची स्वतंत्र व्यवस्था करणे त्याला प्राप्त होते.

## बंडखोरीच्या कल्पनेचा उदय

कसेही असो; दादाजी कोंडदेवाबरोबर शिवाजी परत पुण्यास आल्यापासून ‘ शिवाजी राजे ’ अशा नावाने, म्हणजे शहाजीचे नाव गाळून, पुणे जहागिरीचा कारभार सुरू झाला. आपली जहागिरी विजापूर बादशाहीत मोडत असली, तरी मराठे सरदारांच्या मनात बादशाहीपासून फुटून जाऊन अंशतः स्वतंत्र होण्याची कल्पना अंधुकपणे डोकावू लागली होती. म्हणून, शहाजी तिकडे काही करो आपण इकडे आपला हात चालवावा, असे शिवाजीच्या मनात विशेषतः येऊन त्याने विजापूरकरांच्या ताब्यातील ठाणी घेण्यास १६४४–४५ साली मुहूर्त केला. प्रतिष्ठित व प्रबळ अशा बादशाहीच्या विरुद्ध बंडखोरी करण्याची कल्पना हळुहळूच मनात बळावते. त्याचप्रमाणे ती शिवाजीच्या मनात आली; मग त्याला दादाजीची संमती असो वा नसो. इतके निश्चित आहे की, शिवाजीप्रमाणे इतर काही तरुण व मध्यम वयाच्या मराठे शिपायांना, पाटलांना, देशमुखांना बंडखोरीची कल्पना मनातून थोडी तरी पटली असावी. कारण केवळ एकट्या शिवाजीच्या मनात ती येऊन फलप्राप्ती झाली नसती.

शिवाजीने स्वराज्याची खरी मुहूर्तमेढ, हल्ली भोर संस्थानचा म्हणून जो मुलूख आहे त्यात रोविली. राजगड पंचक्रोशीतील व रायरेश्वर पंचक्रोशीतील विजापूरच्या लोकांना हाकून देऊन काही ठाणी शिवाजीने घेतली व लगेच राजगड घेतला; आणि रायगड ही राजधानी होईपर्यंत राजगड हीच शिवाजीच्या राज्याची राजधानी होती. या बंडखोरीच्या प्रारंभाच्या वेळी आतल्या आत काय चळवळ चालू होती यावर उत्तम प्रकाश पाडणारे दोन--तीन कागद उपलब्ध असल्याचे इतिहासतज्ज्ञ आपणास सांगतात. पैकी एक कागद विजापूर दरबाराकडून रोहिड-खोऱ्याच्या देशमुखाला आलेली तंबी. त्यात " शिवाजी मावळे लोक जमवून दंगा करू लागला आहे, त्याचा बंदोबस्त तुम्ही देशमुखांनी केला पाहिजे; न कराल तर शिक्षा होईल " असे लिहिले आहे. यावरून दरबारापर्यंत जाऊन पोचण्याइतका मोठा धक्का शिवाजीच्या चळवळीने दिला होता हे उघड दिसते. दुसरा कागद महत्त्वाचा आहे. कारण ते शिवाजीकडून रोहिडखोऱ्याचा देशमुख यास गेलेले एक पत्र आहे. त्यात मजकूर असा आहे की, "रोहिडखोऱ्याच्या देवळात देवीला साक्ष ठेवून तुम्ही–आम्ही मिळून स्वतंत्र राज्य स्थापण्याचे आणि बाद-शहाची सत्ता न जुमानण्याचे ठरविले. या आपल्या बेताला श्रीदेवीची संमती मिळविली व ती मिळालीही. तेव्हा तुम्ही निर्भय असावे. " प्रथम बंडखोरीचे स्वरूप असलेल्या स्वराज्यस्थापनेच्या बीजातून निघालेला हा पहिला अंकुर होय. शहाजीच्या मनात काय गुप्त विचार घोळत असतील ते असोत, परंतु दक्षिणेत शहाजीने चालविलेला उद्योग व पुण्याकडे शिवाजीने चालविलेला उद्योग याच्यातील भेद सर्वस्वी मूलभूत आहे. शिवाजीच्या भाषेत बोलावयाचे, तर 'हिंदवी' व रूढ भाषेत बोलावयाचे तर 'मराठी', स्वराज्यस्थापनेला प्रारंभ १६४५त झाला; आणि या दृष्टीने १९४५ सालाचे महत्त्व महाराष्ट्रीय जनतेच्या दृष्टीस घालणे व त्याची आठवण करून देणे हे योग्यच ठरेल.

**सर्वमान्य पितृपूजा**

यावर कोणी असा आक्षेप घेतील की, ३०० वर्षांपूर्वी घडलेल्या या गोष्टीची आठवण जागृत करण्यापासून आता काय लाभ होणार ? शिवाजीच काय, आम्ही पुढे जाऊन असेही म्हणतो की, शिवाजीहून अधिक टिकाऊ ठरलेले त्याचे भुईकोट काय, किंवा डोंगरी कोट काय, किंवा जलदुर्ग काय, ते सर्व पाच–चार बॉंब पडले असता नामशेष होऊन जाण्याइतक्या कुचकामाचे

आज ठरत आहेत; पण आज काय झाले असते या दृष्टीने शिवाजी किंवा त्याचे किल्ले यांजकडे पाहणे योग्य होणार नाही. तर मराठ्यांच्या जुन्या वैभवाची आठवण करून देणारे ते एक स्मारक या दृष्टीने त्यांकडे पाहिले पाहिजे. आजच्या काळात शिवाजीचे उत्सव महाराष्ट्रातील लोक करतात ते काही वेडे भाबडे दुधखुळे म्हणून नव्हे; तर कोणत्याही राष्ट्रातील लोकांची भावी उत्कर्षाची आशा ही गतवैभवाच्या आठवणीवर आधारलेली असते हे इतिहासाच्या तत्त्वज्ञानातील एक सर्वमान्य तत्त्व आहे; आणि शिवाजीचा उत्सव करताना आम्ही मराठे लोक याच तत्त्वाला अनुसरून वागत असतो.

पण आम्हीचसे काय ? जगातील इतर उदाहरणेही अशीच देता येतील. असा देश किंवा राष्ट्र नाही की ज्यात जुन्या पौराणिक ऐतिहासिक विभूतींचे असे स्मरणरूपी श्राद्ध करीत नाहीत; आणि फिरून लक्षात ठेवावे की, विपन्न स्थितीचे दुःख घालविण्याचा एक तोडगा असाच काही केवळ त्या राष्ट्राभिमानी कृत्याचा अर्थ नाही; तर संपन्न किंवा उत्कर्षाच्या स्थितीत असणारी राष्ट्रेही अशीच पितृपूजा करतात.

आज अमेरिका हे राष्ट्र सर्वांत प्रबळ असे वाटत आहे; आणि निदान त्याच्या आर्थिक उत्कर्षासंबंधाने तर वादच नाही. असे असता प्रतिवर्षी ता. ४ जुलै रोजी अमेरिकेतील लोक तो स्वातंत्र्यदिन हा राष्ट्रीय सण म्हणून पाळतातच की नाही ? आणि त्यातल्या त्यात मौज ही आहे की, अमेरिकेने मिळविलेले हे स्वातंत्र्य इंग्लंडशी लढून मिळविलेले ! यामुळे 'स्वातंत्र्यदिन' पाळणे म्हणजे आज बरोबरीने सहकारितेने लढत असलेल्या एका दोस्त राष्ट्राला (जुन्या पितृराष्ट्राला) त्याच्या अपयशाची आठवण करून देऊन नाक खाजविण्यासारखेच होत नाही काय ? तीन वर्षांपूर्वी, फ्रान्सची झाशीवाली जोन ऑफ आर्क, जिने पूर्वी इंग्रजांचा पराभव केला, तिचे पोवाडे गाण्यात इंग्रजही सहभागी झाले होतेच की नाही ? मग काय त्यांना आपल्या जुन्या अपयशाच्या आठवणीने दुःख न वाटता सुख वाटत असेल ? फ्रान्स आता हिशेबातून वगळला जावो ! परंतु ता. ५ जुलैचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात अमेरिकेची कुचेष्टेची बुद्धी नसते, व जोन ऑफ आर्कचा उत्सव समारंभ हा इंग्लंडही आपला अपमान समजत नाही हे खरे ना ? प्रस्तुत मुद्दा इतकाच की, आज उत्कर्षाच्या शिखरावर असणारी अमेरिका जर दीडपावणे-दोनशे वर्षांपूर्वी मिळविलेल्या स्वातंत्र्याचा उत्सव करिते, तर आज पारतंत्र्याच्या

विपत्तीत सापडलेल्या महाराष्ट्राने ३०० च वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या शिवाजीचा व स्वराज्यस्थापनेचा उत्सव चालू ठेवल्यास त्याला कोणास कशी नावे ठेविता येतील!

## ऐतिहासिक आठवणीचा नंदादीप

जुनी ऐतिहासिक आठवण ही एखाद्या नंदादीपासारखी होय. आपण पाहतोच की, नंदादीप म्हटला म्हणजे त्याची ज्योत अखंड तेवत राहणे हेच त्या धार्मिक कृत्याचे मर्म; आणि आज अशी अनेक सनातन घराणी किंवा देवस्थाने दाखविता येतील की त्यांतील नंदादीपाची ज्योत शेकडो वर्षांत कधीही विझली नव्हती. अग्निपूजक पार्शांचेही उदाहरण असेच सांगता येईल.

पार्शांच्या अग्यारीतल्या अग्नीवर कोणी आपला भात शिजवून घेतो असे नाही, पण हा अग्नी आम्ही अग्नि-उपासकांनी आमच्या मूळच्या देशातून आणलेला, आज अखंड परंपरेने, न विझता, प्रज्वलित होत राहिला आहे; याच त्यांच्या आठवणीमुळे त्या अग्नीला महत्त्व आहे. १९३२ साली, पॅरिसमध्ये एका मोठ्या चौकात विजयतोरणाची म्हणून एक कमान उभारलेली असून तिच्यामध्ये एक विद्युद्दीप अखंड प्रज्वलित ठेवलेला मी पाहिला; आणि त्याचा अर्थ काय हे मी विचारिले तेव्हा मला असे सांगण्यात आले की, १९१४–१८ च्या महायुद्धात फ्रान्सने जो प्रचंड विजय मिळविला त्याचे अखंड स्मारक म्हणून त्या विद्युद्दीपाची योजना केलेली होती. दुर्दैवाने चालू महायुद्धात तो दीप नष्ट झाला असेल; पण जर्मनीचा पाडाव होऊन कायम तह झाल्यावर फ्रेंच लोक तो दीप पुनः पेटविणार नाहीत कशावरून! पार्श्यांना जसा तो अग्नी, किंवा फ्रेंच लोकांना जसा तो विद्युत्–दीप तशीच शिवाजीमहाराजांची आठवण ही मराठ्यांच्या राष्ट्राला पूर्ववैभवाचे स्मरण करून देणारी म्हणून प्रिय वाटते; आणि अशा कामी वर्षांचा हिशेब नाही. करण तीनशेच काय पण तीन हजार वर्षे होऊन गेली तरी राम व कृष्ण यांची आठवण पुनः पुनः होण्याकरिता त्यांचे वार्षिक उत्सव आम्ही करतोच की नाही?

पूर्वपरंपरा हे या जगातील राष्ट्रीय भावनेच्या व्यवहारातील एक प्रकारचे शिष्टमान्य असे भांडवल असते. म्हणून ज्या राष्ट्राला पूर्वी केव्हा वैभव प्राप्त झालेले असते ते त्या वैभवाची आठवण नष्ट होऊ देत नाही. कारण व्यवहारात भांडवलाला जे महत्त्व तेच राजकारणात गतवैभवाच्या आठवणीला. एखादे वेळी

या भांडवलावर चालू व्याजाचे टक्के कदाचित मिळणार नाहीत; परंतु मूळ भांडवल गमावून दिवाळखोरी पत्करण्याला कोणी तयार होत नाही.

एखादी इमारत बांधावयाची असल्यास त्या ठिकाणी जर चांगल्या स्थितीतील जुना पाया सापडला, तर नवा पाया खणण्यापेक्षा इमारत उभारण्याला हा जुना पायाच इंजिनीअर लोक पसंत करितात. कारण तो पाया कालांतराने दृढमूल व भक्कम झालेला असतो.

## पात्रतेचा आत्मप्रत्यय

फार काय ? १९१६ साली लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात, हिंदी राष्ट्राकडून स्वराज्याच्या मागणीचा पहिला उच्चार झाला त्याविषयी ठराव मांडतांना, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी ठरावाच्या प्रस्तावनेत असे म्हटले की, "हिंदुस्थानच्या लोकांची संस्कृती (सामाजिक, धार्मिक, राजकीय) फार प्राचीन असल्यामुळे आजच्या पिढीचे हिंदी लोक स्वराज्य मागण्याला, मिळण्याला, व भोगण्याला सत्पात्रच ठरतात." आज इंग्रजांकडे स्वतंत्र स्वराज्याची मागणी करताना महाराष्ट्राला तरी हा आत्मविश्वास वाटतो की आम्ही पूर्वी स्वराज्य केलेले लोक आहो; आणि फिरून आज स्वराज्य मिळाले तर ते करण्या-चालविण्याची पात्रता आमच्या अंगी खचित आहे; आणि याला उत्तम दाखला व आधार हवा तर तो शिवाजी महाराजांचा देता येईल. तात्पर्य, जुन्या दाखल्याचा आधार हा स्वतःच्या मनाला आत्मप्रत्यय वाटण्याला आणि प्रतिपक्षाला वादात उत्तर देण्याला सहजच उपयोगी पडतो.

पात्रतेचा प्रश्न निघाला म्हणजे आजच आमचे प्रतिपक्षी म्हणून इंग्रज लोक डोळ्यापुढे येतात; आणि त्यांचे सर्वांगीण वर्चस्व डोळ्याला दिपवू पाहते; पण समजा एखाद्या इंग्रजाला माहीत नसलेल्या म्हणून जर, शिवाजी महाराज व तत्कालीन इंग्रज यांच्या संबंधाच्या काही हकीकती—अगदी खऱ्या ऐतिहासिक हकीकती, सांगितल्या तर मला खात्री वाटते की, तो इंग्रज काही वेळ तरी चकित होऊन, डोळे चोळून, गर्वाची धुंदी उतरून, किंचित विनयशील दृष्टीने मराठे लोकांकडे पाहू लागेल. उदा०, त्याला माहीत नसलेली ही गोष्ट सांगावी की, राजापूरच्या बंदरात वखारी घालण्याला, निदान त्या ठिकाणी निर्भय सुरक्षित राहण्याला, ३०० वर्षापूर्वीच्या इंग्रज व्यापाऱ्यांना शिवाजीचा कौल घ्यावा

लागत असे. किंवा हे सांगावे की, शिवाजीने काही इंग्रज व्यापारी पकडून त्यांना खारेपाटणच्या गढीत कैदेत ठेविले होते. कांगावखोर इंग्रज व्यापाऱ्यांनी, वखार-वाल्यांनी, शिवाजीकडे काही नुकसानभरपाई अजीजीने मागितली; ती पदरात पडण्यासाठी त्यांना तेरा वर्षे थांबावे लागले. त्याला हे सांगावे की, १६७४ साली तुमच्या मुंबई सरकाराचे त्या वेळचे प्रतिनिधी शिवाजीच्या राज्यारोहण-प्रसंगी देण्याकरिता मौल्यवान नजराणे घेऊन गेले होते. किंवा दरबारात जाताना त्यांना रुमालाने हात बांधल्यासारखे दाखवून तरी जावे लागत होते. हजारो पॅगोडा नाणी देऊन फिरंगी लोकांना बंदर जकातीची माफी मिळवावी लागत असे; आणि पेशवाईचा काळ शिवाजीनंतरचा, तरी त्याही काळी झालेली वडगावची लढाई, पुरंदरचा तह, बाजीरावाकडे मित्रत्वाची भेट मागण्याकरिता आलेले शिष्टमंडळ, इत्यादी गोष्टी त्या अज्ञानी इंग्रजाला सांगण्यासारख्या आहेत.

## शिवाजी महाराजांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व

असो. शिवाजी महाराजांनी हिंदु स्वराज्याची प्रस्थापना केली याविषयी तर अभिमान वाटतोच; परंतु शिवाजी महाराजांविषयी व्यक्तिशः जी आदरबुद्धी वाटते तिचे कारण त्यांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व हे होय. व्यक्तिमत्त्वात त्यांची बुद्धिमत्ता, मुत्सद्देगिरी, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, सुराज्य व्यवस्थेविषयी आस्थेवाइक-पणा इत्यादी गुण तर आहेतच; परंतु शिवाजी खरा वीरशिरोमणी होता ही गोष्ट ठळकपणे लक्षात येते. आजकालच्या सेनापतीसारखा तो सेनापती नव्हता; म्हणजे लढत्या सैन्याच्या पिछाडीला १०० मैलांवर उभे राहून टेलिफोन तारा-यंत्राने हुकूम सोडणारा, किंवा रेडिओवरून युद्धवार्ता ऐकणारा सेनापती तो नव्हता. शिपाईगिरीचे कोणतेही काम निघाले असता तो आपल्या सैन्याच्या लढत्या तुकडीपुढे स्वतः हातावर शिर घेऊन लढलेलाच दिसला. अफझुलखान प्रकरणी तर त्याने शत्रूशी समोरासमोर ठाकून हत्यारी कुस्ती जिंकली. शाहिस्ते-खानावर हल्ला केला तो रात्री बंदिस्त अशा वाड्यात शिरून. शत्रू पाठीवर घेऊन व प्राण हातात घेऊन त्याने अनेक प्रसंगी मोठमोठ्या मजला मारल्या. आग्रा येथील कैदेतून अत्यंत धाडसाने त्याने आपली सुटका करून घेतली. प्रवासाच्या त्या काळच्या गैरसोयीच्या दिवसात म्हणजे घोड्यावरून किंवा पुष्कळ वेळी तर पायानेच प्रवास करावा लागत असता, शिवाजीने आग्र्यापासून खाली जिंजीपर्यंत किती पायपिटी केली असेल, याचा हिशेब कोण करणार?

१६४६ साली शिवाजीने तोरणा व राजगड घेतले, तेथपासून पुढील ३०-३२ वर्षांत त्याने किती हालचाली केल्या, किती लढाया जिंकल्या, याची याद करून पाहिली म्हणजे त्याच्या उद्योगशीलतेची व चपळतेची पुरी खात्री पटते.

आणि हे सर्व होत असता त्याच्या हातून म्हणण्यासारखे दुष्कृत्य घडल्याचे प्रतिपक्षीय इतिहासकारही सांगत नाहीत; इतका तो शीलसंपन्न व न्यायबुद्धीचा होता हे उघड ठरते. त्याची तुलना इतिहासातील प्रसिद्ध अशा काही व्यक्तींशी करणारे चौकस लेखक आढळतात. उदाहरणार्थ, अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन अशा व्यक्तींशी त्याची तुलना करण्यात येते; परंतु वीरश्री व रणसंग्रामपटुत्व या बाबतीत तो या इतरांच्या बरोबरीचा ठरून शीलसंपन्नत्वात तर तो त्यांच्याहून अधिक ठरतो. अशा विभूतीची आठवण शेकडो वर्षे गेली तरी महाराष्ट्राने कशी विसरावी ?

## असामान्य पुरुष

शिवाजीच्या समकालीन वृद्ध–तरुण मराठ्यांत स्वातंत्र्याची भूक लागलेला असा एकटा शिवाजीच का निर्माण झाला याचे उत्तर देणे कठीण आहे; परंतु शिवाजीच्या अंगी व्यक्तिगुण विशेष श्रेष्ठ होते हे उत्तर दिल्यास त्याला जगाच्या इतिहासात अनेक आधार मिळतील. जगाची रीतीच अशी आहे की, सामान्य समाजाच्या व्यवहाराची गाडी जोपर्यंत रुळावर फिरणाऱ्या चाकामुळे संथ चालते, तोपर्यंत देशावर कोण राज्य करतो याकडे लोक फारसे लक्ष देत नाहीत; पण समाजात एखादी तरी व्यक्ती अशी असामान्य निघते की, तिचा संसार-व्यवहार ठीक चालला असला, तिला स्वतःला विशेष दुःख असे कोणतेहि नसले तरी आपण वस्तुतः स्वतंत्र आहो की परतंत्र आहो याची चिकित्सा करण्याकडे तिचे मन वळते; आणि स्वातंत्र्यलालसा व श्रेष्ठ प्रकारचा स्वाभिमान यांची तळमळ मनाला लागून तिला स्वतःची सुस्थितीही गोड लागत नाही. इतकेच नव्हे, तर स्वातंत्र्याचे ध्येय पदरात पाडून घेण्याच्या धाडसी उद्योगात या सुस्थितीला व संपन्नतेला धोका येत असला तरी तो पत्करण्याला ती तयार होते. शिवाजीच्या काळी शिवाजी-इतके बुद्धिमान किंवा स्वाभिमानी शूर मराठे कोणीच नव्हते, असे कसे म्हणता येईल ? पण त्यांच्या गुणांना राजकारणात कामाला लावणाऱ्या महत्त्वाकांक्षेची आच त्यांच्यामध्ये नव्हती. समाजात एकाच वेळच्या तरुण पिढीत हूड पुंड अशी

मुले शेकडो असतात; पण तो हूडपणा, ती पुंडाई ती कोणत्या उद्योगात खर्चतात, आणि शिवाजीने तेच गुण कोणत्या उद्योगात खर्चले हे पाहिले म्हणजे शिवाजीचे वैशिष्ट्य लक्षात येते.

वरील गुण शिवाजीने आपल्या वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षीच राजकारणाकडे लावले हे लक्षात घेतले म्हणजे तो असामान्य पुरुष होता हे उघड ठरते. या वयात शिवाजीची निजस्थिती अशी होती– घरी लाख-दीड लाखांची जहागीर. बापाचे छत्र प्रत्यक्ष डोक्यावर नाही. वडील भाऊ-बहीण आळा घालतील, मार्गदर्शन करतील, अशी घरी कोणी नाहीत. आई आहे पण ती परित्यक्ता असल्यासारखी उदास, दुःखी. जहागिरीचा व्यवस्थापक शहाणा तरी सावध व आपल्या व्यवस्थेच्या कार्यात मग्न. तात्पर्य, घरी मिळणाऱ्या या स्वतंत्रतेचा उपयोग शिवाजीने इतर चार तरुणांप्रमाणे दुर्गुणांच्या उपासनेकडे, किंवा नजीकच्या-दूरच्या मुसलमान बादशाहीत एखादी नोकरी मनसबदारी मिळविण्याच्या राजनिष्ठ उद्योगाकडे केला असता तर ते स्वाभाविकच झाले असते; पण स्वातंत्र्यप्रेम व महत्त्वाकांक्षा ही त्याच्या मनात प्रबळ ठरल्यामुळे त्याला मामुली सांसारिक व्यक्तिसुख, किंवा राजनिष्ठा प्रकट करून मिळणारी बढती, या गोष्टी त्याज्य वाटल्या.

आणि विशेष हे की, या दोनही महत्त्वाच्या बाबतीतले स्वतःच्या बापाचे ( शहाजीचे ) नरम उदाहरण प्रत्यक्ष डोळ्यापुढे ढळढळीत असता त्याचा पगडा त्याच्या मनावर बसला नाही. शहाजीने जिजाबाई व शिवाजी यांना पुण्याच्या जहागिरीकडेच ठेवले, यात त्याचा हेतू शिवाजीने परस्पर स्वातंत्र्याची चळवळ करावी असा होता असे कित्येकांना वाटते; पण ते तितकेसे खरे नाही. स्वतः शहाजीच्या मनात, स्वराज्य स्थापावे व बादशाही सत्ता झुगारून आपले स्वातंत्र्य जाहीर करावे, या कल्पनेने काही आकार म्हणजे स्पष्ट रूप धरले होते याला चळकट पुरावा नाही. त्याने आपला उत्कर्ष केला तो बादशाही हुकुमतीला, वरिष्ठ अधिकाराला, यत्किंचितही धक्का न लावता. नोकरी, पगार व प्रभुकृपा सुरक्षित ठेवून आपल्या कामात जेवढा बाणेदारपणा दाखविता येईल तेवढा दाखविणारे सनदी, बिनसनदी गोरे व काळे राजसेवक आपण आज या ब्रिटिश राज्यातही पाहतो; पण तो बाणेदारपणा म्हणजे कागद तोंडाआड धरून वरिष्ठाला नावे ठेवण्याइतकाच असतो.

## शहाजी आणि शिवाजी यांतील फरक

शहाजी व शिवाजी यांची तुलना केली तर केवळ जहागीरदार या नात्याने दोघांची एकच प्रत होती. जहागिरीतील किल्ले सर्वस्वी बादशाही मालकीचे. जहागिरीतील इतर पुष्कळ गावचा वसूल करून तो बादशाही खजिन्यात भरावयाचा. काही थोड्या नेमून दिलेल्या गावांचा वसूल खासगीकडे घेऊन त्यातून आपला संसार व इतमाम चालवायचा; पण जहागीरदार म्हणून लोकांत मिरविले तरी वरून येईल त्या हुकुमाची अम्मलबजावणी करण्यात दक्ष राहावयाचे, हाच जहागिरदारीचा सेवाधर्म ठरलेला होता. शहाजीने बादशाही मुलुखातले कोणतेही एखादे ठाणे हस्तगत करून स्वतःकडे घेतले, व तेथील 'बादशाही अधिकारी' हुसकून लावले, असे इतिहास सांगत नाही. शिवाजीने मात्र स्वातंत्र्याचा उपक्रम केला तो बादशाही ठाणी हस्तगत करून व पर्यायाने आपल्या जहागिरीच्या मुलुखाला स्वराज्याचे रूप देऊन. शहाजी आपल्या मृत्यूपर्यंत नवे मुलूख जिंकीत होता, ते बादशाही राज्याला जोडीत होता; पण स्वतःला बादशाही सेनापती आणि ताबेदार समजून; उलट शिवाजीने पहिले ठाणे मारून हस्तगत केल्यानंतर अमुक एक प्रकारे बादशहाचा हुकूम मानला, त्यांचा अम्मल केला, व ताबेदार या नात्याने जहागिरीचा कारभार केला असे इतिहास सांगत नाही. स्वराज्य-प्रस्थापनेचे शिवाजीचे पहिले कृत्य किरकोळ व लहानच होते; पण त्याला उघड बंडाचे स्वरूप होते, व ते स्वरूप प्रकट झाल्यानंतर पुढे केव्हाही त्याचे पाऊल त्या दिशेने मागे पडले नाही.

## स्वराज्याची मुहूर्तमेढ

हे पहिले ठाणे मारून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम शिवाजीने १६४५ च्या प्रारंभी केले. म्हणून चालू १९४५ साली त्या गोष्टीला बरोबर तीनशे वर्षे पुरी होतात.

यानंतर पुढील वर्षी शिवाजीने राजगड घेतला व पुढे रायगडास नवी राजधानी वसवीपर्यंत तीच त्याच्या स्वराज्याची राजधानी चालू होती. राजगड व तोरणा हे किल्ले शिवाजीने घेतल्याचा काळ जवळ जवळ येतो. हे किल्ले घेण्याचा शिवाजीचा डौल बादशाही जहागिरदाराने बादशाहीचा मुलूख किंवा सत्ता वाढवून बळकट करण्यासारखा नव्हता, तर स्वतंत्र राज्यस्थापनेसारखा होता. एकदोन

किल्ले व त्याखालचा मुलूख हे बादशाही मुलुखाच्या मानाने स्वतंत्र राज्य कसले? पण ते चिमुकले, अगदी मुलाच्या खेळातले म्हटले, तरी हेतुदृष्ट्या स्वतंत्र स्वराज्य होते; आणि हा भेद लक्षात येण्याकरिता हे सांगता येईल की, दादाजी कोंडदेव यानेही जहागिरीचा कारभार करताना मावळे जिंकली, पण ती बादशाही मुलुखाला जोडण्याकरिता ! तोरणा, राजगड इत्यादी हस्तगत करण्याचे काम अजून नावाने जहागीरदार असणाऱ्याच शिवाजीने केले; पण ते बादशाही मुलूख वाढविण्याकरिता नव्हे, तर स्वराज्याचा पाया घालण्याकरिता; आणि हे किल्ले घेण्याची जी स्वातंत्र्यबुद्धी तिनेच, शहाजीकडून शिवाजीला आलेल्या व दादाजी कोंडदेवाने वाढविलेल्या, जहागिरीला आपोआपच स्वराज्याच्या मुलुखाचे स्वरूप आले.

शहाजीचे एकंदर चरित्र पाहता, विशेषतः त्याची शिपाईगिरी व मुत्सद्देगिरी पाहता, त्याच्या मनात स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याची कल्पना अगदीच आली नसेल असे निखालस म्हणवत नाही; पण इतके मात्र खास म्हणता येईल की, स्वराज्यस्थापनेची जी कल्पना शहाजीच्या मनात असेल व स्वप्नात येत असेल, ती शिवाजीने मात्र प्रत्यक्ष अनुभवात उतरविली. शहाजीने मोगल बादशाही, अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही या तीनही शाह्यांशी आलटूनपालटून स्नेह व वैर केले. तथापि या त्रिकोणभेदात शहाजीच्या प्रत्यक्ष स्वराज्यस्थापनेची आकांक्षा कोठेच चौरस बसली नाही. तो मोंगलांचा मनसबदारच झाला व राहिला. त्याने सहा वर्षेपर्यंत पेमगिरी येथे जवळ जवळ राजासारखे राज्य केले, पण ते निजामशाही जगविण्याकरिता मुसलमान बाळ-बादशहाला मांडीवर घेऊन, आणि जास्तीत जास्त म्हणजे त्याचा दिवाण किंवा मुख्य प्रधान म्हणून. शेवटी विजापुरी बादशाहीचा सरदार म्हणून शहाजी कर्नाटकात वावरत होता त्या वेळी, तो इतका मातबर, वजनदार व प्रबळ होता की, त्याच्या पूर्वीच्या कारकीर्दीत तो केव्हाही तितका प्रबळ नव्हता; आणि त्याला बादशाही हुकुमाने दुसऱ्या खेपेला कैद प्राप्त झाली ती या संशयामुळे म्हणतात की, शहाजी कर्नाटकात स्वतंत्र हिंदु स्वराज्य स्थापनेच्या 'विचारात' आहे; पण या महत्त्वाकांक्षेचा इनकार करूनच शहाजीला आपली सुटका या कैदेतून करून घेता आली. शहाजी हा फार तर 'किंग मेकर' होता. त्याने इतरांना राजपदे मिळवून दिली. किंवा इतर राजांच्या मागे राहून त्याने त्यांचा पाठपुरावा केला; पण स्वतः राजा होण्याची महत्त्वाकांक्षा त्याने धरली नाही, किंवा धरली असली तरी ती त्याला

साध्य करता आली नाही, असे त्याचे वर्णन काही इतिहासकारांनी केले आहे तेच बरोबर आहे. शिवभारतकाराने आपल्या ग्रंथात अशी भलेपणाची मखलाशी केली आहे की, शहाजीला देवीने असा दृष्टान्त दिला होता की, 'तुला स्वतःला राजपद न मिळाले तरी तुझ्या मुलाला ते मिळणार आहे' आणि तसे घडले खरे. ज्या वेळी शहाजी दक्षिणेत विजापुरी सरदार म्हणून लढत होता, त्याच वेळी इकडे शिवाजी विजापुरी बादशाहीच्या महाराष्ट्रातील मुलुखावर स्वाऱ्या करून ठाणी व किल्ले जिंकीत होता.

इंग्रज कंपनीच्या पत्रव्यवहारावरून असे दिसते की, शिवाजीने अफजलखानाचा वध केलेला ऐकून शहाजीच्या मनात कल्पना आली की, आपण सैन्यासह उत्तरेस जाऊन आपला मुलगा शिवाजी याला मिळावे व दोघांनी मिळून विजापुरावर स्वारी करून आदिलशाही बुडवावी; परंतु हा बेत मनात असला तरी तो फसून शहाजीला कैद भोगावी लागली; आणि बादशहाचे स्वामित्व मान्य करून व कृपा संपादूनच शहाजीला सुटका करुन घ्यावी लागली.

तथापि या समकालीन व समांतर अशा पितापुत्रांच्या वेगळ्या धोरणांचा व उद्योगांचा शेवट मात्र मोठा आनंददायक झाला. तो असा की, १६६१ साली विजापुरी बादशहाने, शिवाजी आवरत नाही असे पाहून, त्याच्याशी गुप्त तह करून त्यात शिवाजीचे स्वातंत्र्य मान्य केले, आणि वरती त्याला सबंध कोकणपट्टीचा मुलूख दिला; पण सर्वांत आनंदाची गोष्ट म्हणजे बादशाही सरदार व प्रतिनिधी या नात्याने हा तह घडवून पक्का करण्याच्या कामावर बादशहाने स्वतः शहाजीलाच नेमले.

विजापूराहून बंगलोरचे जे अंतर त्यापेक्षा विजापुराहून पुणे-रायगड यातील अंतर फारच कमी असे असता बापाने इतक्या दूर मुलुखात बादशहाची नोकरीच केली; व शिवाजीने इतक्या जवळच्या मुलुखात बादशहाशी अठरा वर्षे सतत युद्ध करून प्रत्यक्ष स्वराज्य स्थापले, यावरून शिवाजीच्या खऱ्या योग्यतेची पूर्ण कल्पना येते.

असो. या वेळी शहाजीचा पुण्याच्या बाजूस चार महिने मुक्काम झाला होता; आणि त्या मुक्कामांत शिवाजीने आपण जिंकलेले सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा, रायरी (रायगड), प्रतापगड, पन्हाळा, विशाळगड, रांगणा हे किल्ले बापाबरोबर हिंडून त्याला दाखविले. तेव्हा त्या बापाला आपले भाग्य केवढे थोर

वाटले असेल याची कल्पना करावी ! पुढील साली ( १६६५ ) शहाजी वारला. पण त्याची पत्नी व शिवाजीची आई रायगडावर शिवाजीला झालेला राज्यारोहण समारंभ पाहाण्यास ( १६७५ ) जगली. म्हणून ती शहाजीपेक्षाही अधिक भाग्यशाली म्हटली पाहिजे.

## शहाजीचे स्वराज्य-साधन

इतिहासाचार्य राजवाडे यांनी राधामाधवविलासचम्पू या ग्रंथाच्या प्रस्तावनेत शहाजीने स्वराज्यविषयक जे उपक्रम केले त्यांची बरीच छाननी केली आहे. त्यांच्या मते शहाजीच्या सर्व चरित्रात स्वराज्यस्थापनेच्या कल्पनेचा धागा अनुस्यूत होता. शके १५५१, १५५५, १५६२ व १५७० या चार साली शहाजीने स्वराज्यस्थापनेचे प्रयत्न केले. पैकी पहिला चार-सहा महिन्यात आटोपला. दुसरा शाहजहान बादशहाने हाणून पाडला. तिसरा कर्नाटकातील 'मांडलिकी' राज्यस्थापनेचा बराच सफल झाला; पण चवथा अंदाजाबाहेर फलद्रूप झाला तो पुण्यातील जहागिरीवर शिवाजीची कायमची नेमणूक करून; पण या सर्व प्रयत्नांना प्रच्छन्न, गुप्त, संकल्पित अशी अपूर्णतादर्शक नावे राजवाड्यांनाही द्यावी लागली, म्हणजे एक प्रत्यक्षाशिवाय इतर सर्व प्रकारची स्वतंत्र स्वराज्ये शहाजीने स्थापून पाहिली ! शहाजीचा चरित्रकार म्हणतो त्याप्रमाणे स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, स्वजन यांचे लालनपालन-संरक्षण हे शहाजी आपले जीवितसाफल्य मानी. आम्ही वर दर्शविल्याप्रमाणे शहाजीने स्वाऱ्या करून अनेक मुलूख जिंकलेही; पण ते आपण त्यावर राजा म्हणून अधिष्ठित होऊन राज्य करण्याकरिता नव्हे, तर बादशाहीच्या राज्याला जोडण्याकरिता. मात्र त्यावरील कारभार इतका स्वतंत्र की, कोणीही ते स्वराज्यच म्हणावे. असले राज्य शहाजीने कर्नाटकात व तामिल मुलुखात स्थापले असले तरी, राजवाडे यांनीच दाखविल्याप्रमाणे, ते परकीय कानडी-तामिल लोक यांच्यावर एका मराठ्याने स्थापलेले राज्य होय, पण मराठ्याने महाराष्ट्राचा राजा होऊन, आपणासकट राष्ट्राला दिलेले ते स्वातंत्र्य किंवा स्वराज्य नव्हे. या शेवटच्या प्रकारचे राज्य शिवाजीने स्थापन केले हेच त्याचे वैशिष्टय !

आता हेही खरे आहे की, "आकाशातून पडला आणि धावायला लागला" असा काही प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहूनच शिवाजी उच्चपदस्थ झाला. त्याच्या यशःसिद्धीची मांडणी आधीच

शहाजीकडून पुष्कळशी झाली होती. म्हणजे जहागीर, मोठे नाव, सरदार-मंडळात जागा, क्षत्रिय वृत्तीची पूर्व परंपरा, आणि शहाजीने दोनतीन बादशाहीशी एकदम किंवा आलटून पालटून लढण्यासाठी तयार केलेली सेना व सरंजाम.

परंतु काही म्हटले तरी शिवाजीने केलेला प्रत्यक्ष उद्योग आणि शहाजीने केलेला प्रत्यक्ष उद्योग या दोन्हींचे वर्णन केव्हाही एकाच शब्दाने करता येणार नाही. राजगड घेतल्यापासून १६६१ साली विजापूर बादशाहीचा व शिवाजीचा तह घडून येईपर्यंत शिवाजीचे बंड ' बंड ' या नावानेच चालू होते. या बंडखोराला पारिपत्य करण्याच्या नावाने बादशाही सरदार वरचेवर शिवाजीवर चालून आले, आणि शिवाजीने बादशाहीच्या मुलुखातील जे किल्ले किंवा ठाणी घेतली ती लढून किंवा ' जिंकून ' घेतली व बादशाही अमलापासून तोडून विलग केली. तात्पर्य वयाच्या पासष्टीपर्यंत सतत शिपाईगिरी करूनही स्वराज्यस्थापनेच्या दृष्टीने शहाजीला जे करता आले नाही ते शिवाजीने विशीच्या आत केले; आणि जे केले ते गुप्त, प्रच्छन्न किंवा आभासात्मक असे काही केले नाही: तर हडसून-खडसून, ठसठशीत व शत्रूच्या छातीवर उघड पाय देऊन केले. बाप आणि लेक यांच्या कर्तृत्वात असा सूक्ष्म फरक काढण्यात ऐतिहासिक सत्यनिर्देशापलीकडे कोणास काय मिळवावयाचे असणार ! तथापि सूक्ष्म दृष्टीने पाहणाराला ज्याचे श्रेय त्याला द्यावेच लागते; आणि म्हणनच मुसलमान बादशाहीला धक्का देऊन मराठी लोकांचे इतिहासातील पहिले राज्य स्थापण्याचे श्रेय छत्रपती शिवाजीचेच होय !

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों वि: ...

# २.

# म ह र्षी दा दा भा ई नौ रो जी



जन्म ४ सप्टेंबर १८२५ — मृत्यू ३० जून १९१७

आम्हास कळविण्यास अत्यंत दुःख वाटते की, परमपूज्य महर्षी दादाभाई नवरोजी यांना काल सायंकाळी देवाज्ञा झाली. दादाभाईंच्या वयाला ९२ वर्षे झालेली असल्यामुळे त्यांची प्रकृती अलीकडे सहजच क्षीण झालेली होती. तथापि ईश्वराची त्यांच्यावर विशेष कृपा म्हणून म्हणा, किंवा काळालाही त्यांच्यावर आपले पाश टाकण्यापूर्वी त्यांची चैतन्यमय मूर्ती पाहण्याचे कुतूहलसौख्य जितके अधिक घेता येईल तितके घ्यावे असे वाटल्यामुळे म्हणा, दादाभाईंची देहयष्टी पायावर खडखडीत उभी असून त्यांचे सर्व व्यवहार म्हणजे हिंडणे, फिरणे, बोलणे, चालणे, वाचणे, लिहिणे वगैरे सूक्ष्म प्रमाणात का होईनात, पण चालू होते. केवळ वार्धक्याशिवाय दुसरा कोणताही विकार त्यांना अखेरपर्यंत जडला

नव्हता असे म्हटले तरी चालेल. यामुळे त्यांच्या जन्मदिवसाचा समारंभ असाच आणखीही कित्येक वर्षे आपणाला साजरा करण्यास सापडेल अशी त्यांच्या भक्तांना फार आशा वाटत होती; पण चित्कलेचे हे घड्याळ कितीही भक्कम असले किंवा त्याला कितीही काळजीपूर्वक जपून वागविले तरी वेळ आली म्हणजे केव्हा तरी ते बंद पडावयाचेच !

दादाभाईंच्या मृत्युमुळे सर्व हिंदुस्थान देश हळहळेल व या टोकापासून त्या टोकापर्यंत तीक्ष्ण दुःखावेगाने हलून जाईल हे सांगावयास नकोच. तथापि त्यांच्या वयाकडे लक्ष देता त्यांच्या मृत्यूमुळे झालेल्या देशाच्या हानीचे दुःख वाटून घेण्यापेक्षा त्यांच्या महानुभाव चरित्राचे खरे मर्म काय होते याचा विचार केल्यापासून विवेकाला मदत होईल, व त्याचबरोबर कोणाच्याही देशसेवाबुद्धीला स्फूर्ती येईल असे आम्हास वाटते. दादाभाईंचे चरित्र हिंदुस्थानातील आबाल-वृद्धांना महशूर असल्यामुळे त्यातील ठळक गोष्टींचीही सविस्तर माहिती येथे देण्याचे कारण नाही. एवढेच सांगितले असता पुरे होईल की, त्यांच्या आयुष्या-तील प्रत्येक गोष्ट त्यांच्या स्वार्थत्यागाची व स्वदेशभक्तीची खूण पटविणारी अशीच होऊन गेली. सन १८२५ साली दादाभाईंचा जन्म झाला ती वेळ मुंबई इलाख्यात नुकत्याच होऊन गेलेल्या राज्यक्रांतीच्या संधिप्रकाशाची असल्यामुळे जुने मात्र सर्वस्वी गेले व नवे हाती लागावयाचे ते अद्यापि दूरच होते. यामुळे सामान्य मनुष्याची दिशाभूल होण्याचा तो समय होता; परंतु केवळ आपल्या बुद्धिमत्तेच्या व उद्योगाच्या जोरावर त्यांनी त्यातल्या त्यात मिळणारे उत्तम शिक्षण मिळविले; एवढेच नव्हे तर त्या शिक्षणाचा उपयोगही तावडतोब समाज-सेवेकडे करण्यास सुरवात केली. जवळ जवळ ऐंशी वर्षांपूर्वी, म्हणजे इंग्रजी अमलाच्या अव्वलीस, सरकारी नोकरीला किती तेज व मान्यता होती हे लक्षात घेतले म्हणजे त्यांनी हाती प्रत्यक्ष आलेली शिक्षणखात्यातील मोठी नोकरी कशी सोडली याचे सामान्य मनुष्यास आश्चर्यच वाटेल. सरकारी नोकरीच्या त्यागा-संबंधाने त्यांनी असे लिहून ठेवलेले आहे की, **'सरकारी नोकरी सुटणे यासारखा दैवाचा दुसरा मोठा लाभ मला जन्मात कोणताच घडला नाही.'** व त्यांच्या पुढील चरित्रक्रमावरून पाहता त्यांचे हे उद्गार सर्वस्वी खरे आहेत असेच म्हणावे लागते. हिंदी लोकांना वरिष्ठ सरकारी नोकऱ्या मिळाव्या अशाविषयी दादाभाईंनी अत्यंत परिश्रम केले. असे असता स्वतः त्यांनीच हाती आलेली

सरकारी नोकरी का सोडावी ? या प्रश्नाचे उत्तर इतकेच की, खऱ्या देशभक्तीचे स्वरूपच असे असते. सुखाच्या व सोयीच्या गोष्टी आपल्या देशबांधवांना लाभाव्या या हेतूने कोणताही खरा देशभक्त जरी खटपट करतो तरी तो स्वतः मात्र त्या सुखाचा किंवा सोयीचा अभिलाष धरीत नाही. इतकेच नव्हे तर त्या प्राप्त झाल्या असल्या तरी त्यांचा मोहही दूर सारून त्यातून तो बाहेर पडतो. सरकारी नोकरीत शिरणे म्हणजे आपली बुद्धिमत्ता विक्रीला काढून सदसद्विवेकाला कुलूप लावून त्याची किल्ली परक्याच्या हाती देणे होय, ही गोष्ट सामान्य प्रतीच्या सरकारी नोकरासही जाणवते, मग दादाभाईसारख्या उच्च कोटीतील विभूतीस ती गोष्ट अनुभवाशिवाय केवळ आत्मस्फूर्तीनेही पटावी यात नवल कोणते ? सेवाधर्मातील हे दोष बडोदे संस्थानच्या दिवाणगिरीसारख्या प्रतिष्ठित व बऱ्याच स्वतंत्र अशा नोकरीत बरेच कमी असणार हे उघड आहे. तथापि एका मोठ्या देशी संस्थानाचे कल्याण करण्याची संधी थोडीबहुत तरी मिळवून देणारी मोठी नोकरीदेखील दादाभाईंनी पोलिटिकल रेसिडेंटचा यत्किंचित उपसर्ग लागताच सोडून दिली !

स्वतंत्र देशसेवा हेच दादाभाईंचे पहिल्यापासून ध्येय होते; व शिक्षणक्रम संपल्यानंतर अवघ्या १०।१२ वर्षांतच त्यांनी समाजसुधारणा, समाजशिक्षण, स्थानिक स्वराज्य, राजकीय शिक्षण वगैरे बाबतीत आपली बुद्धिमत्ता, आपली कल्पकता, आपली उद्योगशीलता, आपली स्वार्थत्यागबुद्धी व आपले नीतिधैर्य इतक्या तऱ्हेने लोकनिदर्शनास आणले की, मुंबईसारख्या शहरी त्यांची पुढारी लोकांत मुख्यत्वाने गणना होऊ लागली. वयाच्या ३०व्या वर्षीच दादाभाईंनी लंडन येथील एका स्वदेशी व्यापारी पेढीवर नोकरी धरली व तिचाही हेतू स्वतः पैसा मिळवून गबर होण्याचा नसून, ब्रिटिश राज्याचे केंद्रस्थान जे लंडन शहर तेथे राहून, आपल्या देशाचे हित जेणेकरून होईल असा उद्योग करण्याचाच होता. लंडन येथे लंडन इंडियन सोसायटी, ईस्ट इंडिया असोसिएशन वगैरे संस्थांचे काम त्यांनी नावारूपास आणले, हिंदी लोकांना वरिष्ठ सरकारी नोकऱ्या मिळण्याविषयीची अतिशय खटपट केली, व हिंदुस्थानातून विलायतेस शिक्षणाकरता जाणाऱ्या तरुण पिढीची सोय लावून दिली; अशा रीतीने वयाच्या ४४ व्या वर्षाच्या आत दादाभाईंनी हिंदुस्थानात व विलायतेतही महत्त्वाची कामगिरी

करून राष्ट्राची कृतज्ञता संपादिली; व १८६९ साली मुंबई शहरच्या लोकांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक मानपत्र समर्पण केले.

यानंतर दादाभाईंच्या उच्च प्रतीच्या राष्ट्रीय कामगिरीस खरी सुरवात झाली. लोकशिक्षण, समाजसुधारणा वगैरे विषय त्यांच्या आवडीचे असताही ते सर्व त्यांनी बाजूस ठेवून, राष्ट्राच्या दुर्दशेची खरी मीमांसा काय व ती घालविण्यास खरा उपाय कोणता याची आपल्या मनाशी कसून चौकशी केली. या चौकशीत त्यांना असे दिसून आले की, हिंदुस्थान देश हा निर्धन व इतर अनेक बाबतीत विपन्न होण्याचे खरे कारण त्यावरील परकीय अम्मल व विशेषतः त्यातील एकतंत्री राज्यपद्धती ही होय. ही गोष्ट बोलून दाखविणे त्या काळच्या स्थितीत अत्यंत धैर्याचे किंबहुना धाडसाचेच काम होते. कारण राज्यकर्तृत्वाच्या अभिमानाने स्वतः अधिकाऱ्यांची दृष्टी तर अंध झाली होतीच; पण ब्रिटिश अमदानीतील पहिल्या तकलुपी भरभराटीची जिल्हई लोकांच्याही डोळ्यांना अद्यापि दिपवून टाकीत होती. तथापि मनाला पटणारी गोष्ट स्पष्ट शब्दांनी बोलून दाखवावयाचीच, मग त्यात कोणाचीही मर्जी जावो किंवा कोणी आपला कितीही उपहास करो, असा त्यांचा बाणा असल्यामुळे, देशस्थितीचा सूक्ष्म व परिश्रमपूर्वक विचार करून काढलेले सिद्धांत, हिंदुस्थानात हो वा इंग्लंडात हो, खाजगी लोकांत हो वा प्रत्यक्ष अधिकाऱ्यांच्या तोंडावर हो, बोलण्यास दादाभाईंनी केव्हाही कमी केले नाही. त्यांच्या या नवीन सिद्धांताचे तेज सामान्य लोकांच्या बुद्धीस सहन न होऊन पुष्कळांनी त्यांची पुष्कळ दिवसपर्यंत विक्षिप्त म्हणून टवाळीही केली; पण सत्याचाच अखेर विजय होत असल्यामुळे, फक्त ब्युरॉक्रसीशिवाय इतर सर्व लोकांची आपल्या सिद्धांताविषयी त्यांनी खात्री करून दिली. दादाभाईंच्या समकालीन असलेल्या सुशिक्षित, किंबहुना राजकारणातही पडणाऱ्या, हिंदी गृहस्थांत स्वतः दादाभाईइतक्या किंबहुना त्यांच्याहून काकणभर अधिक बुद्धिवान अशा व्यक्ती काही थोड्याथोडक्या नव्हत्या; पण दादाभाईंचे सूक्ष्म निरीक्षण, परिस्थितीचा भेद करून जाणारी त्यांची बुद्धिमत्ता, व सर्व जग एका बाजूस असले तरी आपला सत्सिद्धांत त्यांच्यापुढे प्रतिपादन करण्यास लागणारे मनोधैर्य हे गुण एकट्या दादाभाईंच्याच अंगी होते. यामुळे हिंदी राजकारणातील एका श्रेष्ठ तात्त्विक सिद्धांताचे संस्थापक व प्रवर्तक अशा तऱ्हेची म्हणजे आचार्यांची पदवी सर्व जगाला त्यांना द्यावी लागली. या त्यांच्या सिद्धांतावर

प्रचलित सर्व राष्ट्रीय राजकारणाचा पाया रचलेला आहे व या पायाच्या भक्कमपणावरच स्वराज्याच्या मागणीची इमारत रचली गेली आहे व टिकेलही. कोणतीही गोष्ट आमच्या सरकारास समजून सांगितली म्हणजे समजते व समजली की लगेच उमजते, अशी त्यांची प्रथम प्रथम भोळी समजूत असल्यामुळे आपल्या वयाची पुष्कळ मौल्यवान वर्षे त्यांनी निव्वळ आकडेमोडीत घालविली. तसेच ब्रिटिश जनतेच्या सौजन्यावर व स्वातंत्र्यप्रियतेवर त्यांचा बराचसा विश्वास असल्यामुळे त्यांनी विलायतेत पुष्कळ दिवस राहून पाहिले. तेथील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन, विवेचनपूर्ण पत्रे लिहून व त्यांच्या औदार्यबुद्धीस पाझर फुटावा म्हणून करुणाष्टके आळवून पाहिली. ब्रिटिश जनता झाली तरी पार्लमेंटच्या द्वारेच काम करणार ! अर्थात तेथे प्रवेश करून घेतल्याने प्रत्यक्ष देवदर्शन घडून हिंदुस्थानचे दुःखनिवारण होईल या हेतूने त्यांनी पार्लमेंटमध्ये प्रवेश करूनही पाहिला. एवढेच नव्हे तर केवळ आपल्या कर्मकटकटीचा विलायतेतील लोकांना वीट आणून त्यांनी अनेक कमिशने बसविली, कमिट्या नेमविल्या व त्यांच्यापुढे साक्षीदार या नात्याने पुरावा मांडून किंबहुना कमिशने व कमिट्या यांचे स्वतः एक सभासद होऊन तक्रारी मिनिटेही लिहून पाहिली. तात्पर्य, ज्याला सनदशीर चळवळ असे प्रौढ व उदात्त नाव देण्यात येते तिचा असा एकही प्रकार नाही की जो दादाभाईंनी केवळ नुसता गमतीखातर नव्हे तर अनेक वर्षे रात्रंदिवस परिश्रम करून, आतड्याला पीळ पाडून, रक्त आटवून व स्वार्थत्याग पराकाष्ठेला पोचवून करून पाहिला नाही. एका शब्दात सांगावयाचे तर सनदशीर चळवळीच्या सत्त्वाचे ५० वर्षेपर्यंत त्यांनी परीक्षण केले, व शेवटी नाइलाजाने सनदशीर चळवळीचे सत्वहरण झाले, असेच त्यांना मोठ्या दुःखाने जगजाहीर करावे लागले.

दादाभाईंना हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्याचा मान तीन वेळा मिळाला व या तीन वेळी अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेली भाषणे जो लक्षपूर्वक ताडून वाचील त्याला दादाभाईंचे खरे चरित्र कळल्यावाचून राहणार नाही. १८८६ साली कलकत्ता येथे ब्रिटिश जनतेच्या औदार्याची स्तुती करून त्यावरच भिस्त ठेवण्याचा त्यांनी बहुधा उपदेश केला. १८९३ साली लाहोर येथील भाषणात ब्रिटिश जनतेच्या औदार्याच्या आत्मस्फूर्तीवरील त्यांचा विश्वास किंचित् ढळलेला दिसून आला. कारण केवळ या औदार्यावर भिस्त न ठेवता

करून राष्ट्राची कृतज्ञता संपादिली; व १८६९ साली मुंबई शहरच्या लोकांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक मानपत्र समर्पण केले.

यानंतर दादाभाईंच्या उच्च प्रतीच्या राष्ट्रीय कामगिरीस खरी सुरवात झाली. लोकशिक्षण, समाजसुधारणा वगैरे विषय त्यांच्या आवडीचे असताही ते सर्व त्यांनी बाजूस ठेवून, राष्ट्राच्या दुर्दशेची खरी मीमांसा काय व ती घालविण्यास खरा उपाय कोणता याची आपल्या मनाशी करून चौकशी केली. या चौकशीत त्यांना असे दिसून आले की, हिंदुस्थान देश हा निर्धन व इतर अनेक बाबतीत विपन्न होण्याचे खरे कारण त्यावरील परकीय अम्मल व विशेषतः त्यातील एकतंत्री राज्यपद्धती ही होय. ही गोष्ट बोलून दाखविणे त्या काळच्या स्थितीत अत्यंत धैर्याचे किंबहुना धाडसाचेच काम होते. कारण राज्यकर्तृत्वाच्या अभिमानाने स्वतः अधिकाऱ्यांची दृष्टी तर अंध झाली होतीच; पण ब्रिटिश अमदानीतील पहिल्या तकलुपी भरभराटीची जिल्हई लोकांच्याही डोळ्यांना अद्यापि दिपवून टाकीत होती. तथापि मनाला पटणारी गोष्ट स्पष्ट शब्दांनी बोलून दाखवावयाचीच, मग त्यात कोणाचीही मर्जी जावो किंवा कोणी आपला कितीही उपहास करो, असा त्यांचा बाणा असल्यामुळे, देशस्थितीचा सूक्ष्म व परिश्रमपूर्वक विचार करून काढलेले सिद्धांत, हिंदुस्थानात हो वा इंग्लंडात हो, खाजगी लोकांत हो वा प्रत्यक्ष अधिकाऱ्यांच्या तोंडावर हो, बोलण्यास दादाभाईंनी केव्हाही कमी केले नाही. त्यांच्या या नवीन सिद्धांताचे तेज सामान्य लोकांच्या बुद्धीस सहन न होऊन पुष्कळांनी त्यांची पुष्कळ दिवसपर्यंत विक्षिप्त म्हणून टवाळीही केली; पण सत्याचाच अखेर विजय होत असल्यामुळे, फक्त ब्युरॉक्रसीशिवाय इतर सर्व लोकांची आपल्या सिद्धांताविषयी त्यांनी खात्री करून दिली. दादाभाईंच्या समकालीन असलेल्या सुशिक्षित, किंबहुना राजकारणातही पडणाऱ्या, हिंदी गृहस्थांत स्वतः दादाभाईइतक्या किंबहुना त्यांच्याहून काकणभर अधिक बुद्धिवान अशा व्यक्ती काही थोड्याथोडक्या नव्हत्या; पण दादाभाईंचे सूक्ष्म निरीक्षण, परिस्थितीचा भेद करून जाणारी त्यांची बुद्धिमत्ता, व सर्व जग एका बाजूस असले तरी आपला सत्सिद्धांत त्यांच्यापुढे प्रतिपादन करण्यास लागणारे मनोधैर्य हे गुण एकट्या दादाभाईंच्याच अंगी होते. यामुळे हिंदी राजकारणातील एका श्रेष्ठ तात्त्विक सिद्धांताचे संस्थापक व प्रवर्तक अशा तऱ्हेची म्हणजे आचार्यांची पदवी सर्व जगाला त्यांना द्यावी लागली. या त्यांच्या सिद्धांतावर

प्रचलित सर्व राष्ट्रीय राजकारणाचा पाया रचलेला आहे व या पायाच्या भक्कमपणावरच स्वराज्याच्या मागणीची इमारत रचली गेली आहे व टिकेलही. कोणतीही गोष्ट आमच्या सरकारास समजून सांगितली म्हणजे समजते व समजली की लगेच उमजते, अशी त्यांची प्रथम प्रथम भोळी समजूत असल्यामुळे आपल्या वयाची पुष्कळ मौल्यवान वर्षे त्यांनी निव्वळ आकडेमोडीत घालविली. तसेच ब्रिटिश जनतेच्या सौजन्यावर व स्वातंत्र्यप्रियतेवर त्यांचा बराचसा विश्वास असल्यामुळे त्यांनी विलायतेत पुष्कळ दिवस राहून पाहिले. तेथील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन, विवेचनपूर्ण पत्रे लिहून व त्यांच्या औदार्यबुद्धीस पाझर फुटावा म्हणून करुणाष्टके आळवून पाहिली. ब्रिटिश जनता झाली तरी पार्लमेंटच्या द्वारेच काम करणार ! अर्थात तेथे प्रवेश करून घेतल्याने प्रत्यक्ष देवदर्शन घडून हिंदुस्थानचे दुःखनिवारण होईल या हेतूने त्यांनी पार्लमेंटमध्ये प्रवेश करूनही पाहिला. एवढेच नव्हे तर केवळ आपल्या कर्मकटकटीचा विलायतेतील लोकांना वीट आणून त्यांनी अनेक कमिशने बसविली, कमिट्या नेमविल्या व त्यांच्यापुढे साक्षीदार या नात्याने पुरावा मांडून किंबहुना कमिशने व कमिट्या यांचे स्वतः एक सभासद होऊन तक्रारी मिनिटेही लिहून पाहिली. तात्पर्य, ज्याला सनदशीर चळवळ असे प्रौढ व उदात्त नाव देण्यात येते तिचा असा एकही प्रकार नाही की जो दादाभाईंनी केवळ नुसता गमतीखातर नव्हे तर अनेक वर्षे रात्रंदिवस परिश्रम करून, आतड्याला पीळ पाडून, रक्त आटवून व स्वार्थत्याग पराकाष्ठेला पोचवून करून पाहिला नाही. एका शब्दात सांगावयाचे तर सनदशीर चळवळीच्या सत्त्वाचे ५० वर्षेपर्यंत त्यांनी परीक्षण केले, व शेवटी नाइलाजाने सनदशीर चळवळीचे सत्वहरण झाले, असेच त्यांना मोठ्या दुःखाने जगजाहीर करावे लागले.

दादाभाईंना हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्याचा मान तीन वेळा मिळाला व या तीन वेळी अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेली भाषणे जो लक्षपूर्वक ताडून वाचील त्याला दादाभाईंचे खरे चरित्र कळल्यावाचून राहणार नाही. १८८६ साली कलकत्ता येथे ब्रिटिश जनतेच्या औदार्याची स्तुती करून त्यावरच भिस्त ठेवण्याचा त्यांनी बहुधा उपदेश केला. १८९३ साली लाहोर येथील भाषणात ब्रिटिश जनतेच्या औदार्याच्या आत्मस्फूर्तीवरील त्यांचा विश्वास किंचित् ढळलेला दिसून आला. कारण केवळ या औदार्यावर भिस्त न ठेवता

त्यांनी असे प्रतिपादले की, अमुक एक गोष्ट युक्तिसिद्ध आहे अशी ब्रिटिश जनतेची खात्री करून दिली म्हणजे कोणतीही मागणी ती सहसा नाकारणार नाही. १८९३ साली आत्मनिष्ठा व स्वावलंबन यांकडे वळलेली त्यांची दृष्टी १९०६ साली कलकत्ता येथील भाषणात त्या दिशेला संपूर्ण वळली व स्वराज्य हेच ध्येय व स्वावलंबन हेच त्यांचे साधन वगैरे सुप्रसिद्ध चतुःसूत्रीचा त्यांनी उच्चार केला; व एका अर्थाने या सत्य सिद्धांताचा पुण्योच्चार करिता करिता " जनपदहितकर्ता " या नात्याची आपली कारकीर्द संपविली. ते म्हणाले, " मी इतके निराशेचे प्रसंग सोसले की, त्यामुळे कोणाचेही काळीज फुटून गेले असते व तो निराशेच्या वेडाने बंड करण्यास प्रवृत्त झाला असता. " याच भाषणात स्वदेशाला स्वराज्याचा आशीर्वाद देताना दादाभाईंना नोकरशाहीला शाप द्यावा लागला. ते म्हणाले, "मी फार झगडलो व अनेक वेळ झगडा करून यशाचा पेला ओठासही नेऊन लाविला; पण केवळ या नोकरशाहीने तो पेला उडवून दिला !" दादाभाईंचा आशीर्वाद व त्यांचा शाप यांच्या अंगी काही तरी दिव्य तेज खचित असले पाहिजे. कारण त्यांच्या भाषणानंतर अवघ्या १० च वर्षांत स्वराज्याच्या चळवळीला इतके तेज आलेले आम्ही पाहतो !

१९०६ च्या राष्ट्रीय सभेनंतर दादाभाईंनी जवळ जवळ योगनिद्रा स्वीकारली होती असाच भास होतो. ते क्वचित एखादा जाहीर शब्द बोलत, पण त्यातूनही त्यांच्या सात्त्विक देशप्रीतीचा व त्यांच्या आशावादित्वाचा पूर्वीसारखा खणखणीत आवाज ऐकू येत असे. वरसोवा येथे समुद्रकिनाऱ्यावर पश्चिमेकडे डोळे लावून विचारमग्न होऊन बसलेले त्यांना पाहिले असते म्हणजे, शरासनावर पडून प्राणोत्क्रमणासाठी उत्तरायणाची वाट पाहात बसणाऱ्या भीष्मांची आठवण झाल्याशिवाय राहिली नसती.

दादाभाई आपले इहलोकीचे कर्तव्य करून निजधामाला गेले खरे; पण त्यांच्यासारख्या पुरुषाची गणना परमेश्वराने या जगात काही गोष्टी घडवून आणण्याकरिता जन्मास घातलेल्या "आधिकारिक" पुरुषांत होत असल्यामुळे त्यांचा आत्मा हिंदुस्थानाकरिता त्यांनी स्थापलेले जे ध्येय ते हिंदुस्थानास प्राप्त होईपर्यंत सायुज्यमुक्तीची अपेक्षा न धरता परमेश्वराची प्रार्थना करण्यास चुकणार नाही, किंबहुना त्यातच आनंद मानून जरूर लागल्यास त्यासाठी पुनर्जन्म घेऊनही पुनः अवतरेल असा आमच्या शास्त्राज्ञेप्रमाणे आम्हास विश्वास आहे.

तथापि त्यांच्या अधिकाराप्रमाणे त्यांनी चालविलेला उद्योग सफल होण्यास इतका काल न लागता त्यांच्या निरपेक्ष व निरलस सत्कर्मांनी प्राप्त होणारी सद्गती त्यांस लवकरच प्राप्त होवो, अशी परमेश्वरापाशी आमची प्रार्थना आहे.

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न

१. दादाभाईंच्या अंगच्या प्रमुख गुणांचे वर्णन करा.

२. 'सदनशीर चळवळ' म्हणजे काय? दादाभाईंना तिच्याविषयी वीट का आला?

३. 'जनपदहितकर्ता' म्हणजे काय? त्या दृष्टीने दादाभाईंनी कोणती कामगिरी केली?

**वाचन** : महर्षी दादाभाई नौरोजी— ना. सी. फडके.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२०२८
ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: ..........
नों दि: ..........

३.

# न्यायमूर्ती महादेव गोविन्द रानडे



| जन्म | मृत्यू |
| --- | --- |
| १८ जानेवारी १८४२ | १६ जानेवारी १९०१ |

टिळकांच्या पूर्वीच्या निकट पिढीचे पुण्याचे प्रख्यात राजकीय पुढारी म्हटले म्हणजे कै. महादेव गोविंद रानडे हे होत. एका अर्थानं ते नुसते पुण्याचे गुरू नसून सर्व हिंदुस्थानचे गुरू होते असे म्हणता येईल. असा कोणताही प्रांत नाही की, ज्यातील सुशिक्षित लोक त्या काळी रानड्यांना विद्वत्ता, राजकारणाचे ज्ञान व स्वदेशप्रीती या बाबतीत प्रत्यक्ष गुरुस्थानी मानीत नव्हते. किंबहुना, गेल्या वीस बावीस वर्षांत अनेक नवीन राजकीय पुढारी या भूमीत निर्माण झाले व त्यांनी हा देश अकल्पित अशा उन्नतीप्रत नेला, तरी रानड्यांचे नाव घेताच त्यांच्या योग्यतेचे स्मरण होऊन अजूनदेखील प्रत्येक समंजस मनुष्य मनाने त्यांना वंदनच करितो. "अलौकिक बुद्धिमत्ता, दीर्घ व सतत व्यासंग, देशाबद्दलची खरी कळकळ, विद्यार्जनाचे स्वाभाविक जडलेले व्यसन, अचूक कल्पकपणा वगैरे अनेक गुणांनी

माधवरावजींचे चरित्र बोधप्रद असून महत्त्वाचे झाले आहे." अशा प्रकारची सामान्य स्तुती तर टिळकांनी रानड्यांच्या मृत्युलेखात केलीच आहे; पण टिळकांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी रानड्यांचे म्हणून जे वैशिष्टय पुढे दाखविले आहे ते खरोखरच मार्मिकपणाचे आहे. ते असे की, "महाराष्ट्रातील तेज अनेक कारणांनी सर्वस्वी नष्ट होऊन तो एक थंड गोळा बनला असता, त्यात फिरून जिवंतपणाची ऊब कशी येईल, व तो गोळा आपले हातपाय कसे हालवू लागेल याचा रात्रंदिवस विचार करून, आणि ते दुर्धर काम स्वतः अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड मेहनत जर कोणी केली असेल तर ती प्रथम माधवरावजींनीच केली असे म्हटले पाहिजे." महाराष्ट्रातील जुन्या थोर घराण्यातील लोक घरच्या सुखवस्तुपणामुळे आयदी बनले व पुणे पाठशाळेतून तयार झालेले बहुतेक सर्व नवे विद्वान नोकरीत शिरून निस्तेज झाले. अशा स्थितीत रानडे यांनी केलेल्या कामगिरीचे महत्त्व व त्यांच्या स्फूर्तीचे तेज सहजच विशेष ठरते, आणि मौज ही की हा सर्व पराक्रम त्यांनी सरकारी नोकरीत राहूनच केला.

रानडे यांच्या सर्वमान्यतेच्या आड येण्यासारखी एक गोष्ट होती ती अशी की या देशाची सुधारणा सर्वच अंगांनी झाली पाहिजे असे मनाने घेतल्यामुळे त्यांनी प्रार्थनासमाज, विधवा-पुनर्विवाह, धर्मसहिष्णुत्व वगैरे गोष्टींवर विशेष भर दिला; पण या तीनही गोष्टी तेव्हा समाजात अप्रिय असल्यामुळे त्यांच्या राजकीय कर्तृत्वासही संसर्गदोषाने लोक नाके मुरडीत. तथापि लोक आपणास काय म्हणतील याविषयी सर्वदा पूर्णपणे उदासीन राहून, बारा आणि बारा चोवीस तास हरएक प्रकारच्या चळवळीची चर्चा व उद्योग त्यांनी आजन्म ठेविला होता. लोकमताची जशी त्यांनी पर्वा केली नाही, तशीच सरकारच्या अवकृपेचीही त्यांनी पर्वा केली नाही. इंग्रज लोकांचा गुण घेतला तरी व्यक्तिशः त्यांच्याशी केव्हाही लगट करावयाची नाही, फाजील स्नेहसंबंध ठेवावयाचा नाही, उदारमताचा दिमाख दाखविण्याकरिता त्यांचे घरी जेवणखाणास जाणे किंवा स्वतःच्या घरी त्यांना जेवणखाणास बोलावणे या गोष्टी होता होईतो टाळावयाच्या, त्यांजकडून अपमान होईल असे सर्व प्रसंग युक्तीने टाळावयाचे, व त्यांच्याशी मतभेद असेल तो लिहून, बोलून स्पष्ट दाखवायचा; तात्पर्य, दुसऱ्याचा उपमर्द तर करावयाचा नाही व स्वतःचा प्रतिष्ठितपणाही गमवावयाचा नाही, अशी जी मध्यम स्वभावाच्या थोर मानी मनुष्याची वागण्याची ढब असते ती रानडे यांना सर्वस्वी साधली होती. तेलंग–

भांडारकरांना युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर सरकारने नेमले; पण रानड्यांना तो मान सरकारने केव्हाही दिला नाही, याचे कारण त्यांची विद्वत्ता कमी असे नसून त्यांच्याबद्दल सरकारची मनातून इतराजी अधिक हेच होय. तसेच तेलंगांनंतर त्यांना सरकारने हायकोर्टातील हिंदी न्यायाधीशाची जागा दिली तीदेखील केवळ नाइलाज म्हणून. त्यांनी एलएल. बी. व ॲडव्होकेट या दोन्ही परीक्षा दिलेल्या असताही वकीली करण्याचा त्यांना मनापासून कंटाळा एवढ्याकरिता ते सरकारी नोकरीत शिरले. त्यांनी दादाभाईप्रमाणे पोटाचा स्वतंत्र धंदा केला असता, किंवा विष्णुशास्त्री व टिळक यांसारखा स्वार्थत्याग करून एखादी शिक्षणसंस्था काढली असती तर त्यांच्या लौकिकांत अर्थात अधिकच भर पडली असती, पण त्यांनी अमुक केले असते तर त्यांची कीर्ती अधिक झाली असती असे म्हटले तरी, सरकारी नोकरी करून त्यांतच त्यांनी जी देशसेवा केली तीही सर्व देशाने गुरूच्या स्थानी मानण्याइतकी अलौकिक ठरली, हीच विशेष कौतुकाची गोष्ट होय. नोकरीचे बंधन रानडे इतकेच समजत की, अगदी उघडपणे सरकारी नोकराने राजकीय चळवळ करू नये; किंचित सूक्ष्म पडदा ठेवला म्हणजे काम झाले. शिवाय ते जी चळवळ करीत तीही अशा उत्कृष्ट पद्धतीने करीत की खुद्द सरकारलाही उघड नाव ठेवण्यास त्यात जागा सापडू नये. खुद्द राष्ट्रीय सभेचे जनकत्व ज्या दोनचार गृहस्थांच्या योजकतेकडे दिले पाहिजे त्यांत रानडे यांची प्रमुखत्वाने गणना होते; व त्यापूर्वीही पुण्यात जी दंगलीची चळवळ झाली तिलाही कारण रानडेच आहेत अशी सरकारची समजूत होण्याइतका त्यांचा आणि पुण्यातील चळवळींचा संबंध निकट होता.

माधवरावांच्या पूर्वीच्या व बरोबरीच्या पिढीत विद्वान पुष्कळ झाले व त्यांतील कित्येकांनी सार्वजनिक कार्यात लक्ष घालण्याचा थोडाबहुत प्रयत्नही केला. पण " यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः " या न्यायाने देशसेवेचे मर्म रानडे यांनीच खरे करून दाखविले. लोकांप्रमाणे सरकारलाही माधवराव यांच्या बुद्धीचा उपयोग हायकोर्टापेक्षा वरच्या दर्जाच्या एखाद्या ठिकाणी करिता आला असता; पण तो करिता आला नाही हा सरकारचा दोष होय, माधवरावजींचा नव्हे असे टिळकांनी म्हटले आहे, व ते योग्यच आहे. अडचणींची सबब सर्वांनाच असते. तीतून कोणीच सुटलेला नाही. तथापि त्यातूनही राष्ट्रसेवेचा भगवा झेंडा हाती घेऊन रानडे यांनीच महाराष्ट्राला सार्वजनिक कार्यकर्तेपणाचा धडा

चालून दिला. सुदैवाने त्यांच्या मागून येणारी सुशिक्षित लोकांची पिढी स्वार्थ-त्यागाच्या दृष्टीने त्यांच्याही पुढे गेल्याने महाराष्ट्राचे पाऊल रानड्यांच्या मृत्यूनंतर मागे न येता पुढेच पडले. त्यापैकी गोपाळराव गोखले हे तर रानड्यांचे प्रत्यक्ष शिष्यच होते; आणि टिळक हे जरी अनेक बाबतीत रानड्यांचे प्रतिपक्षी होते, तरी उत्कर्षांच्या शिखराला टिळक पोचले असताही रानडे यांच्या गुणासंबंधाने बोलण्याचा प्रसंग आल्यास तेही कृतज्ञता व पूज्यबुद्धी मनात ठेवूनच बोलत असत.

ज्ञानाच्या बाबतीत, टिळक रानड्यांना पूर्वकालीन हेमाद्री किंवा माधवाचार्य यांची उपमा देत असतच; पण ज्ञानाप्रमाणे, रानडे यांनी उत्तेजन देऊन पुढे आणलेल्या संस्थाही अशाच विविध स्वरूपाच्या होत्या. वक्तृत्वसमारंभ, वसंत-व्याख्यानमाला, औद्योगिक परिषद, प्रदर्शन, फीमेल हायस्कूल, प्रार्थनासमाज, लायब्ररी, सार्वजनिक सभा— तात्पर्य, पुण्यात अशी कोणतीही सार्वजनिक संस्था नव्हती की जिच्या उघड किंवा गुप्त चालकांत रानडे नव्हते. सरकारला ही गोष्ट पुष्कळ दिवस कळून चुकली होती, व टेंपलशाहीत रानड्यांवर राजद्रोहाचा खटला न झाला तरी आरोप आल्याशिवाय राहिला नाही. १८७४ पासून ७९ पर्यंत राजकीय चळवळीच्या महोदयाचा पूर्वरंग पुण्यात अनेक अंगांनी दिसून येत होता. सन १८७४–७५ साली, बडोद्याचे अधिपती मल्हारराव गायकवाड यांच्यावर तेथील रेसिडेंट कर्नल फ्रेअर यांना विषप्रयोग करण्याचा आरोप ठेवून कमिशनमार्फत त्यांची चौकशी करण्यात आली. या प्रकरणातील सर्वच गोष्टी अजब होत्या. मल्हाररावासारखा बेबंद, तऱ्हेवाईक सुलतानी संस्थानिक. रेसिडेंट तेही कातडीने गोरे पण सुलतानच. त्यांची सुलतानी इतकी अजब की दादाभाई नौरोजींसारख्या सात्त्विक मनुष्याला वैतागून बडोद्याची दिवाणगिरी सोडून द्यावी लागली; व आरोपही असला भयंकर की त्याची जाहीर रीतीने चौकशी झाल्या-खेरीज समाधान कोणालाच नाही. एवढया बड्या संस्थानिकाला आरोपी करून इन्साफ करण्याचा हा इंग्रजी राज्यात दुसरा प्रसंग. या प्रकरणाचा गवगवा सर्व हिंदुस्थानभर झाला; पण महाराष्ट्राने त्या प्रसंगी आपले वैशिष्ट्य दाखविले. तो प्रकार असाः कमिशन नेमले तेव्हा चौकशी व्हावयाची ती अर्थात दुतर्फा. सरकारच्या बाजूला कायदेपंडितांचा तोटा नव्हता; कारण पैशालाही तोटा नाही; पण मल्हारराव अटकेत असल्यामुळे पैशाचे बाबतीत ते सर्वस्वी पराधीन. पुढे

काहीतरी प्रसंग येणार असे पाहताच महाराजांनी बऱ्याच मोठ्या रकमा लांबविण्याचा प्रयत्न केला होता, पण तो फसला. लाखो रुपयांच्या नोटा, खाजगी तिजोरीतील शिल्का, जडजवाहीर वगैरे सर्व इंग्रज अंमलदारांनी जप्त करून मोहोरबंदीत टाकून दिल्यामुळे वकील-बॅरिस्टर वगैरे करण्यास लागणाऱ्या पैशाकरिताही महाराजांना सरकारच्या तोंडाकडे पाहावे लागले. महाराजांना या कामी पैसा किती द्यावा याची घासाघीस सुरू झाली. मल्हाररावांतर्फे जेफर्सन व पेन हे सॉलिसिटर काम करीत होते. त्यांनी डिफेन्सकरिता एकंदर चार लक्ष बत्तीस हजार रुपयांचे अंदाज पत्रक केले होते; पण सरकार एवढी रक्कम देण्यास तयार होईना. अखेर मल्हाररावांनी व्हाइसरॉय साहेबांना अशी तार केली की गाठी पैसा नसल्यामुळे माझ्या बचावाचे काम लोळत पडले आहे. तरी मला बडोद्याच्या खजिन्यातून दोन लक्ष रुपये तरी तात्रडतोब द्यावेत, त्यांचा हिशेब सॉलिसिटर देतील.

"Deeply pained to learn from my solicitors that preparations for my defence are at a standstill for want of funds, their requirements for legitimate expenses not granted. Promises of ample opportunity for vindicating my innocence thus practically ignored. Private purse attached. Rani's marriage ornaments and money seized. My charcter, liberty and kingdom at stake." ही तार खाजगी होती; परंतु अशा तारेचा गवगवा झाल्याशिवाय कसा राहणार? तारेचा सुगावा लागताच सर्व महाराष्ट्रभर गोंधळ उडून गेला. मल्हाररावांबद्दल व्यक्तिशः विशेष सहानुभूती होती असे नाही; पण आरोप ठेवून बचावाकरिता जरूर तो पैसाही न देणे हा उलट सरकारी कटाचाच एक प्रकार आहे असे सर्व लोकांच्या मनाने घेतले; पण या खऱ्या अगर मानीव कटाचा सक्रिय निषेध करण्याची स्फूर्ती फक्त पुण्यानेच दाखविली. पुणेकरांनी बडोद्यास व व्हाइसरॉय साहेबांना एकदम तार केली की महाराजांच्या बचावाकरिता महाराष्ट्र एक लक्षपर्यंत वर्गणी देण्यास तयार आहे; त्यांना जरूर ती कायदेपंडितांची मदत द्यावी. पुढे सरकारने दोनअडीच लक्ष रुपये खर्चास दिले; विलायतेहून मोठा बॅरिस्टर येऊन कमिशनपुढे बचावाची जी योग्य तजवीज व्हावयाची ती झाली; व पुण्याला एक पै सुद्धा खर्च पडला नाही. या कामी पुण्याचे जसे बाहेर नाव झाले तसेच सरकारच्या

डोळ्यात पुणे खुपूही लागले. पुण्यात गुप्त पोलिसांचा सुळसुळाट झाला. तार वास्तविक राजरोसपणे सहीनिशी गेली होती; पण कोणत्याही गोष्टीच्या मुळाशी काय आहे हे उलथून पालथून पाहण्याची सरकारची वानरवृत्ती प्रसिद्धच असल्यामुळे त्यांनी बारीक शोध चालविला होता. असल्या शोधात प्रमुख माणसांवर संशय यावयाचाच, तसा तो माधवरावजी रानड्यांवर आला; व फार दिवस पुण्यास राहिल्याचे निमित्त करून त्यांची बदली नाशकास करण्यात आली.

श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनी आपल्या पुस्तकात या वेळच्या एका संभावित गुप्त पोलिसाची हकीकत दिली आहे ती फार मनोरंजक वाटते. या भल्या प्रतिष्ठित गृहस्थाने पुण्यास श्रीमंतीचा थाट करून आणि अनेक करमणुकींच्या साधनांनी आपल्या घरी अड्डा पाडून पुष्कळ सद्‌गृहस्थ नादी लावले होते. ही बातमी सीतारामपंत चिपळूणकरांच्या उदाहरणाने रानड्यांना कळल्यावर, त्यांनी याची पत्रे कोठून येतात जातात याचा छडा लावण्याकरिता गुप्त शोध चालविला. तेव्हा तो गृहस्थ गुप्त पोलिस असे ठरले. "तिसरे दिवशी सकाळी सीतारामपंत चिपळूणकर येऊन म्हणाले की परवा व काल मी टपालाचा सगळा शोध लावला. त्या गृहस्थाचे टपाल शिपायाबरोबर येत नाही. ते पहाटे उठून फिरावयास म्हणून बाहेर जातात, ते प्रथम एका रस्त्याने निघून वाकडीतिकडी वळणे घेऊन शेवटी जनरल पोष्ट ऑफिसमध्ये जाऊन टपाल आपल्याच हाती घेतात, व पाठविण्याकरिता तयार केलेले टपाल बरोबर नेऊन आपल्या हातानेच पेटीत टाकतात. काल त्यांच्या मागोमाग पुष्कळ अंतरावर मी होतो, त्यामुळे येताना वाटेत मला हे फोडलेल्या पत्राचे कव्हर सापडले त्याजवर सिमल्याचा छाप आहे. एकंदर गोष्टींवरून आपण घेतलेल्या संशयाला जागा पुष्कळ आहे असे आम्हालाही आता वाटू लागले आहे. पोस्ट ऑफिसातील एका मित्राने मला आताच सांगितले की या गृहस्थांचा पत्रव्यवहार कलकत्ता व सिमला येथील गव्हर्मेंट सेक्रेटरींशी असावा असे दिसते. कारण त्यांच्या नावावर यांची बरीच पत्रे जातात." सीतारामपंत चिपळूणकरांत गुप्त पोलिसाची हुशारीही होती असे उघड दिसते ! गुप्त पोलिसाचा संशय व मेलेल्या उंदराची घाण दोन्ही सारखीच; कारण दोन्ही येताच लोक घरे टाकून जातात. या सिमलेवाल्या गुप्त पोलिसाच्या पुणेकर मित्रांनी एका दिवसात त्याचे घर वर्ज्य केले, व तोही एका रात्रीत बिऱ्हाड आटोपून अदृश्य झाला.

पण दुसऱ्याच्या टपालावर नजर ठेवण्याची रानड्यांची ही विद्या स्वतः त्यांना लवकरच फळास आली. नाशकाहून त्यांची बदली धुळ्यास झाली तरी त्यांच्यावरचा संशय दूर झाला नव्हता. १८७९ साली वासुदेव बळवंत फडके याच्या बंडाची धामधूम सुरू होती. तीतच ता. १६ मे रोजी रानडे पुण्यास असता, बुधवारवाडा व विश्रामबागवाडा हे दोन्ही रानडे याच नावाच्या एका गृहस्थाने जाळले; पण तेवढ्यावरून पुढे कैक महिने, त्यांचे टपाल सरकारी हुकमाने फोडण्यात येऊ लागले; आणि ही केवळ संशयाची गोष्ट नसून, स्वतः पत्रे फोडणारे डॉ. पोलन यांनीच सांगितली आहे. रानड्यांच्या नावे पत्रे येत त्यांत दंगे, लुटालुटी, कारस्थाने वगैरे अनेक गोष्टी असत. वासुदेव बळवंत फडके किंवा हरी रामोशी हे बिचारे धुळ्यास रानड्यांना पत्रे कशाला पाठवतील? त्यांना असली पत्रे लिहविणार पोलीस व फोडविणार सरकार; पण रानड्यांनी ती सर्व जशीच्या तशी परत पोलिसाकडे पाठवावी. असा क्रम अनेक दिवस चालू होता. कालांतराने रानड्यांविषयी सरकारची दृष्टी निवळली, पण महाराष्ट्रातील चळवळीचे सूत्रचालक म्हणून त्यांच्यावरचा राग सर्वस्वी गेला नाही. रानडे पुढे धुळ्याहून पुण्यास आले, पुण्याहून मुंबईस गेले व त्यांनी प्रथमपासून आरंभिलेला कार्यक्रम तसाच शेवटास नेला. रानडे व टिळक यांच्या स्वभावात पुष्कळ फरक होता तरी टिळकांना रानड्यांपासून पुष्कळच स्फूर्ती मिळाली यात शंका नाही.

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न

१. न्या. रानडे यांना सर्व हिंदुस्थानचे गुरू असे का म्हटले आहे?
२. लो. टिळकांनी रानड्यांच्या कोणत्या वैशिष्ट्याचे वर्णन केले?
३. न्या. रानडे यांचे स्वभावचित्र रेखाटा.

**वाचन :** न्या. रानडे चरित्र— न. र. फाटक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................



# ४. सर फेरोजशहा मेथा

जन्म ४ ऑगस्ट १८४५ मृत्यू ५ नोव्हेंबर १९१५

सर फेरोजशहा मेथा यांचे थोडक्यात वर्णन करावयाचे तर आम्ही असे म्हणू की त्यांच्याइतका दणदणीत पुढारी मुंबई शहराला आजवर लाभला नव्हता. त्यांचे वय मरणसमयी सुमारे सत्तर वर्षांचे होते; पण त्यापूर्वी सतत चाळीस पंचेचाळीस वर्षे त्यांनी देशसेवा केली होती. त्यांचा जन्म १८४५ साली झाला. मेथा यांनी विद्यार्थीदशेत दाखविलेली बुद्धिमत्ता पाहून सर अलेक्झांडर ग्रँट हे त्यांच्यावर खुष झाले आणि त्यांनी यांना विलायतेस जाण्यास मदत केली. १८६८ साली मेथा हे बॅरिस्टर होऊन परत आले. विलायतेत असतानाच त्यांनी काही निबंध लिहून, काही व्याख्याने देऊन आपल्या कामगिरीला सुरवात केली होती व तेच काम त्यांनी इकडेही सुरू केले. प्रारंभीच काही खटल्यात त्यांना चांगले यश आल्यामुळे बॅरिस्टर म्हणून त्यांची चांगली प्रसिद्धी झाली आणि कोल्हापूर प्रकरणात आगरकर व टिळक यांच्यातर्फे त्यांनाच वकीलपत्र देण्यात

आले होते. वकिलीच्या धंद्यात पुढे त्यांना गुजराथ काठेवाडमधील संस्थानिकांचा आश्रय लाभला आणि पैसेही भरपूर मिळू लागले. यामुळे आणि जात्या थोडेसे आळशी असल्यामुळे हळू हळू ते मिजाशी बनले; पण काही नियमित वेळ सार्वजनिक कार्याकडे देण्याची पद्धती त्यांनी चालू ठेवल्यामुळे ते केव्हाही पुढारी-पणात मागे पडले नाहीत. लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दीत स्थानिक स्वराज्याची प्रगती झाली तेव्हा बदरुद्दिन तय्यबजी व तेलंग यांच्याबरोबर त्या प्रगतीची लाट उचलून धरण्याला त्यांनी बरीच खटपट केली; पण ही नुसती वरची खटपट नसून मेथा यांना स्थानिक स्वराज्याची खरी आवड होती. यामुळे ते मुंबई म्युनिसि-पालिटीत लवकरच शिरले आणि तेथील धुरीणत्व त्यांनी आजन्म आपणाकडे टिकविले. नावाचा अध्यक्ष कोणीही असो, पण केव्हा विरोधी चळवळीची तर केव्हा अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या योजनेची सूत्रे त्यांच्या हाती येत असत. शिवाय त्यांच्या अंगी एककल्लीपणा नसल्याने त्यांचे सहाय्य आपणास मिळावे असे सर्व पक्षांना वाटे आणि ते तारतम्य पाहून असे सहाय्य देतही. १९०८ साली म्युनिसिपालिटीतील काही सभासदांनी त्यांच्या वतनदारीविरुद्ध मोठा गवगवा केला पण त्यात मेथा हेच यशस्वी झाले. कायदेकौन्सिलात मुंबई म्युनिसिपालिटीला एक प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळाला तेव्हापासून अनेक वर्षे त्या जागेवर त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाची निवड झाली नाही; पण हे वर्चस्व मिळण्याला त्यांचा एक गुण विशेष कारणीभूत झाला तो हा की, कॉरपोरेशनमधील सभांना नियमितपणे हजर राहून काम करण्याविषयी त्यांनी दक्षता ठेवली; आणि या सभांच्या दिवशी लाभदायक अशी वकीलपत्रे आली तरी ती ते नाकारीत व आठवड्यातील हे दिवस रोजनिशीत प्रायः मोकळे राखून ठेवीत. वरिष्ठ कायदे-कौन्सिलात निवडणुकीचा अधिकार मिळाला तेव्हा प्रथम त्यांचीच निवडणूक झाली; आणि पुढेही अनेक वर्षे ते निवडले जात; पण गोपाळराव गोखले यांना संधी देऊन त्यांनी तरुण पिढीविषयी गुणग्राहकता दाखविली. कायदेकौन्सिलात लोकपक्षाला बहुमत नसल्याकारणाने मेथासारख्यांनाही टीका करण्यावरच आपले कर्तव्य व हौस भागवून घ्यावी लागे; पण ही टीका करण्यात त्यांनी जो बाणेदार-पणा व धीटपणा दाखविला तो वाखाणण्यासारखा होता. सरकारी सेक्रेटरी, मेंबर वगैरे लोक त्यांचे टीकेला नेहमी भीत असत. कारण ते कोणावर तुटून पडले म्हणजे त्याची काही बाकी ठेवीत नसत. राजकारणात तात्त्विकदृष्ट्या ते नेमस्त

असत; पण स्वाभिमानाची गोष्ट आली म्हणजे ते जहालाहून जहाल होत. वरिष्ठां-तल्या वरिष्ठ युरोपियनांना ते बरोबरीच्या नात्याने वागवीत आणि वेळ पडली असता त्यांना ते तोडून टाकीत. त्यांच्या तात्त्विक नेमस्तपणावरून अधिकाऱ्यांना असे वाटे की, स्वराज्य पक्ष व नवीन मताचे लोक यांचेविरुद्ध मोहीम करण्याला मेथा हे आपणास मदत करतील; आणि त्यांनी ही मोहीम केली ही गोष्टही खोटी नाही, पण 'मला वाटेल ते मी करीन, माझ्या लोकांना मी बोलेन; परंतु या कामात तुमचे-माझे संगनमत होणे शक्य नाही, किती केले तरी ते लोक माझे आहेत आणि तुम्ही लोक तरी काय गुणवान आहात?' असे ते अधिकाऱ्यांना बजावीत. या त्यांच्या वृत्तीमुळे लॉर्ड सिडनहॅमचा व त्यांचा उघड बेबनाव झाला होता. मुंबई युनिव्हर्सिटीमध्येही त्यांनी बरेच काम केले; आणि सरकारने तेलंग, चंदावरकर, भांडारकर यांच्याप्रमाणे त्यांना जरी कधी व्हाईस-चॅन्सेलरची जागा दिली नाही तरी म्युनिसिपालिटीप्रमाणे युनिव्हर्सिटीतही ते पुढारी म्हणूनच गाजत असत. तेथेही अधिकाऱ्यांचा व त्यांचा खटका उडे. राष्ट्रीय सभेचे ते प्रारंभीच्या वर्षांतच अध्यक्ष होऊन गेले; आणि सुमारे वीसबावीस वर्षे कॉंग्रेसची सूत्रे मुंबईस त्यांच्याकडूनच हलविली जात. इतर प्रांतांत त्यांच्या बरोबरीचे पुढारी प्रायः नव्हते व जे होते तेही त्यांना दबून वागत. मुंबई शहराची आघाडी राजकारणात ठेवण्याचे पुष्कळसे श्रेय मेथा यांच्याकडेच आहे. गोखले यांना ते एखाद्या शिष्याप्रमाणे किंवा मुलाप्रमाणे वागवीत; पण राजकीय विषयाच्या अभ्यासात, परिश्रमात आणि विशेषतः स्वार्थत्यागात त्यांची मजल आपल्यापुढे पुष्कळच आहे हे ते ओळखून असत आणि त्याबद्दल गोखल्यांना ते बहुमानही देत. टिळक हे गोखल्यांपेक्षा वडील असले तरी मेथांपेक्षा बारा वर्षांनी लहान. यामुळे त्यांनाही मेथा हे तरुण पिढीच्या माणसाप्रमाणे वागवीत. मेथांचे व टिळकांचे केव्हाही फारसे बनले नाही. याचे कारण त्या उभयतांचा संबंध म्हणजे लोखंड-गारगोटीच्या संयोगासारखा असे. दोघेही टणक, मानी, हट्टी. तथापि प्रतिपक्षातील झाले तरी टिळकांची योग्यता ते जाणून होते. राष्ट्रीय सभेत ते हळूहळू मागे पडण्याचे खरे कारण असे की, टिळकांचीच काय पण गोखल्यां-चीही झडप पुढे पुढे त्यांना झेपेनाशी झाली. वर्षातून एक वेळ जमून राजकारणाचा आढावा घ्यावा, समालोचन करावे ही त्यांची राष्ट्रीय सभेची कल्पना गोखले यांनाही मान्य नव्हती. तसेच गोखले यांनी राजकारणाचा मार्ग म्हणून घालून

दिलेले स्वार्थत्यागाचे उदाहरण त्यांच्या बुद्धीला पटत नसे; पण तात्त्विक राजकीय मतांपेक्षाही सामान्य लोकांना मेथा अप्रिय होण्याचे खरे कारण म्हटले म्हणजे सामान्य जनतेपासून नेहमी तुटक व अलिप्त राहणे हा त्यांचा अवगुण होय. आधी मुंबई शहरात बारमास वसती. सुट्टी मिळाली की थंड हवेत राहण्यास नित्य जात. यामुळे त्यांना भेटणे हे देखील सामान्य मनुष्याला मोठे मुष्किलीचे होई; आणि त्यातूनही त्यांचा दरारा विशेष यामुळे त्यांची भेट घेणे म्हणजे आधी डोंगर तुडवीत जावा आणि शेवटी वाघाची गाठ पडावी असे होई ! आपल्या वकिलीच्या खोलीत रोज तासभर संध्याकाळी बसून त्या वेळात आपली हस्तक मंडळी बरोबर घेऊन त्यांना सल्लामसलत द्यावी, त्यांना कामाला पिटाळावे व आपल्या आज्ञा त्यांच्या उद्योगाने अमलात आणाव्या याशिवाय अधिक घासाघीस त्यांना सोसत नसे; पण अशा रीतीने राजकारण व्हावे तसे सिद्ध होत नाही. पुढे पुढे तर त्यांनी राष्ट्रीय सभेला जाण्याचेच टाकून दिले आणि एखाद्या बिकट प्रसंगी हजर राहण्याविषयी गळ घालून जेव्हा त्यांची आराधना करावी तेव्हा ते हजर राहावयाचे. त्यांची व्यवस्था ठेवणे हा कोठल्याही स्वागतमंडळाला एक मोठा पेचच असे; पण पुढारी होण्याला जी बुद्धिमत्ता लागते ती असून शिवाय जे काही बाह्यस्वरूपाचे गुण लागतात तेही त्यांच्या ठिकाणी होते. पाहताच रुबाबदार दिसणारा मनुष्य त्यांच्यासारखा हजार-पाचशेतही मिळणार नाही. एकाच राजकीय मताचे असताही गोखले हे जितके सौम्य वाटत तितकेच मेथा हे उग्र वाटत. त्यांची उंची, विशाल भालप्रदेश, उन्नत नासिका, भरदार मिशा, ऐटदार कल्ले, उंची पोषाखाची ढब, उठण्याबसण्याबोलण्यातला ताठरपणा, भाषेतील जोर, ठासून बोलण्याची ऐट आणि या सर्वांना शोभणारा एखाद्या खोल दरीतून झालेल्या भुभुःकारासारखा आवाज या सर्वांची छाप स्वकीय-परकीय कोणावरही पडे. थोडक्यात थट्टा करून प्रतिपक्षाला पातळ करून टाकण्याची विद्याही त्यांच्याजवळ असे. येवढेच काय पण प्रसंगविशेषी मिस्किलपणाने कोणाकडे डोळे मिचकावून, कोणाला शाबासकीने मोठेपणा देऊन, कोणाला तात्पुरती ममता दाखवून जवळ बोलावून अशा रीतीनेही ते आपले कार्य साधीत. त्यांना पाहणाऱ्या प्रत्येकाला हा 'पुरुषसिंह' आहे असेच त्यांचे वर्णन करावेसे वाटे. पण वरचे पुष्कळसे गुण असूनहि ते लोकांना अप्रिय होण्याला कारण त्यांचा मानी स्वभाव. जो त्यांचा गुण साहेब लोकांशी वागताना परिणामकारक

होई तोच स्वकीयांशी वागताना अप्रीती उत्पन्न करी. टिळकांनी त्यांच्यासंबंधाने असे म्हटले आहे की, त्यांचा हा बेसुमार आढ्यताखोर ताठरपणा व मानधन स्वभाव यांचा अतिरेक होत असला तरी या गोष्टी आम्हा लोकांच्या स्वभावात इतक्या कमी आहेत की त्यांच्या अवगुणाची गणना कदाचित गुणातही करावी लागेल. मुंबईतील 'पंच' हा त्यांचे चित्र काढताना नेहमी सिंहाची आयाळ लावून काढी; आणि लिओ म्हणजे सिंह आणि फेरोजशाहा मेथा हे शब्द जवळ जवळ समानार्थक ठरले होते.

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न

१. सर फेरोजशहा मेथा हे परकीयांशी कसे वागत असत ?

२. त्यांचे कोणते गुण वैशिष्ट्यपूर्ण होते ? कोणत्या गुणांमुळे ते सामान्य जनांना अप्रिय वाटत ?

३. 'मुंबईचा सिंह' हे वर्णन सर फेरोजशहांना कसे लागू पडते ते सांगा.

**वाचन** : 'भारतीय राष्ट्रपुरुष'–भी. गो. देशपांडे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
क्रमांक ................ वि: ..............
क्रमांक ................ नों दि: ..............



# ५.
# डॉ. ॲनी बेझंट

जन्म — १ आक्टोबर १८४७
मृत्यू — ५ नोव्हेंबर १९१५

गेल्या शे-दोनशे वर्षांमध्ये या हिंदुस्थानात हजारो-लाखो इंग्रज येऊन वा राहून गेले. त्यांपैकी ज्यांचे स्मरण आपण आदरबुद्धीने किंवा आनंदाने करितो असे किती थोडे ? पण त्यांपैकी मिसेस बेझंट या एक अवश्यमेव होत, असे मी नेहमी मानीत आलो आहे. मी त्यांना प्रथम प्रत्यक्ष अशा १९०५ साली पाहिल्या. या सालच्या डिसेंबरात मी घरच्या सर्व वडील लहान माणसांसह काशीयात्रेला व बनारस कॉंग्रेसला मिळून गेलो. त्या प्रवासात अलाहाबाद येथे माझा मुक्काम झाला, त्यात एक दिवस अलाहाबाद टाऊन हॉलमध्ये बेझंट-बाईंचे व्याख्यान होते. ते ऐकण्याची संधी मी सहजच उत्सुकतेने साधली, आणि त्यांच्यासंबंधाने ऐकीव माहितीवरून मी मनाशी जी एक कल्पना केली होती ती प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. बेझंटबाईंना पाहून मला वाटले की जुन्या काळी भारतभूमीत योगिनी विदुषी म्हणून कोणी होऊन गेल्या त्या बहुधा अशाच

काही तरी असतील. त्यांचा वेषपेहराव अर्थात तेव्हाच्या भारतीय थाटाचा असेल इतकेच अधिक. मी त्यांना पाहिले त्या वेळी बेझंटबाईनीही जो वस्त्र-प्रावरण प्रकार आदरिला होता तो बहुतांशी हिंदी थाटाचाच होता. शुभ्रवर्ण असे जरीकाठी पातळ त्यांनी परिधान केलेले असून अंगात लांब हाताचे पांढरे बनियन घातले होते. पायात अर्थातच पायमोजे व बूट हे परदेशी थाटाचे होते; परंतु उभे राहण्याची त्यांची धाटणी, डोक्यावर अगदी साधेपणाने बांधलेले पांढुरके केस, मुखावरील गंभीर वृत्ती, आत्मविश्वास, विनयशीलता एवढ्याच गोष्टी प्रथमच त्यांच्याविषयी कौतुकादर उत्पन्न करण्याला मला पुरे होत्या; आणि मग त्यांचे भाषणच ऐकले तेव्हा त्या माझ्या आदरबुद्धीत किती मोठी भर पडली असेल, याची कोणीही कल्पना करावी.

## नमुनेदार व्याख्यात्या

यापूर्वी पुष्कळ इंग्रज व्याख्यात्यांची भाषणे ऐकण्याचा योग मला आला होता; परंतु त्या दिवशी मी जसे ओघवते अस्खलित विद्वत्ताप्रचुर ठसठशीत आणि अध्यात्मज्ञानमिश्रित भाषण ऐकले तसे मला पूर्वी केव्हाही कोणाही युरोपियनाच्या तोंडून ऐकावयास मिळाले नव्हते; आणि त्यातल्या त्यात सांगण्यासारखी गोष्ट ही की, बेझंटबाई या ठरीव मर्यादित वेळात भाषण संपविणाऱ्या वक्त्यांचा एक उत्कृष्ट नमुना होत, अशी त्यांची कीर्ती मी पूर्वी ऐकल्यामुळे, त्या आपले भाषण बरोबर एक तासात संपवितात की नाही हे मुद्दाम पाहण्याकरता मी हातात घड्याळ काढून घेतले होते; आणि खरोखरच एक तासाला एक मिनिट कमी असताच त्यांनी भाषण संपविले. हे पाहून मला फार मौज वाटली. वास्तविक ठराविक वेळेत भाषण संपविणे यात वर्णन किंवा कौतुक करण्यासारखा असा मोठा गुण काय आहे असे कोणी म्हणो; परंतु खरोखरच तोही एक गुण आहे, या मताचा मी आहे. कारण देशी-विदेशी शेकडो वक्त्यांची भाषणे ऐकण्याचे प्रसंग मला येत; आणि भाषण त्रोटक आखुडते संपवून, किंवा निष्कारण चऱ्हाट वळून कंटाळा आणून, ज्यांनी माझा अपेक्षाभंग केला अशीच त्यांतली पुष्कळशी भाषणे असत. म्हणून बाईंचा गुण मी घेतला. शिवाय बाईंच्या त्या दिवसाच्या भाषणात मी हे पाहिले की, त्यात जाणते म्हणजे मुद्दाम होऊन केलेले असे वक्तृत्व काहीच नव्हते. विषय उच्च-विचार-युक्त, मांडणी पद्धतशीर-प्रमाणबद्ध, शब्दयोजना अचूक व उचित, हे

सर्व पाहून मी थक्कच होऊन गेलो; व त्यानंतर बाईंचे भाषण ऐकण्याची संधी मी पुढे केव्हाही दवडली नाही.

## बाईंचे शत्रुत्व करणारी एकच व्यक्ती

बेझंटबाईंनी जिचे कार्य आयुष्यभर केले त्या थिऑसॉफिकल सोसायटीचा सभासद मी स्वतः नाही. तथापि या संस्थेने हिंदुस्थानाकरिता काय केले याची जाणीव मला आहे. तसेच बेझंटबाई यांच्या मतप्रसारकार्यातील क्वचित काही गोष्टी माझ्या बुद्धिवादाला पटण्यासारख्या नसल्या, तरी त्यामुळे त्यांच्या इतर आध्यात्मिक धर्मसेवेविषयी माझ्या मनात जी आदरबुद्धी आहे तिजमध्ये काही कमीपणा आलेला नाही. तीच गोष्ट त्यांच्या राजकारणविषयक जीवनाविषयी समजावी. माझ्याप्रमाणेच याविषयी ज्यांची मनःस्थिती असेल अशी दुसरी एक व्यक्ती मला दिसते. ती म्हणजे सर सी. पी. रामस्वामी अय्यर, त्रावणकोर संस्थानचे सेवानिवृत्त दिवाण हे होत. आजचे कृष्णमूर्ती हे लहानपणी बेझंट-बाईंच्या हाती राहावे म्हणून झालेले प्रयत्न, व विशेषतः कृष्णमूर्ती हे भावी अवतार असे केलेले बेझंटबाईंचे भविष्य, या वादांत सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी बाईंच्या विरुद्ध वकीलपत्रच कोर्टात घेतले होते. तसेच मीही 'अवतारकृत्याचा पोरखेळ' या मथळ्याखाली केसरीत एक कडक लेख लिहिला होता असे आठवते. तथापि आज बेझंटबाईंच्या जन्मशताब्दीला उद्देशून जगभर होणाऱ्या समारंभात सर सी. पी. व मी दोघांनीही भाग घेण्याचे मान्य केले आहे; पण याहीपूर्वी बरीच वर्षे सर सी. पी. व मी होमरूल लीगच्या चळवळीत एकत्र येऊन बेझंटबाईंशी सहकार्य केले होते. याचे कारण हेच की, काही काही धार्मिक गोष्टींविषयी कोणा दोघांची मते जुळत नसली, किंबहुना नावडण्यासारखी असली, तरी इतर गोष्टींत परस्परांना परस्परांविषयी प्रामाणिकपणे आदर राहू शकतो. अशी विवेचकबुद्धी नसणारी माणसे एकांधळी, केवळ एका डोळ्याने पाहणारी असतात.

## मनावरची आत्मस्वातंत्र्याची छाप

बेझंटबाई प्रथम हिंदुस्थानात आल्या, त्या राजकारणात भाग घेण्यासाठी नाही हे निश्चित होय. त्यांच्या पूर्वचरित्राकडे पाहिले असता त्यांच्या मनावर आत्मस्वातंत्र्याची छाप उघड दिसते. मते बदलण्याचा त्यांना संकोच वाटत

नाही. त्या प्रथम मनाने ख्रिस्ती व ईश्वरवादी असता, पुढे काही कारणाने बुद्धिवादी भूमिका घेऊन, ईश्वराने 'हे का असे केले ?' 'ते का तसे केले नाही ?' असे प्रश्न स्वतः त्याचे त्याला विचारावेसे त्यांना वाटले; आणि त्या निरीश्वरवादी बनल्या; पण पुढे त्याच पूर्ण सेश्वरवादी झाल्या. तसेच आपल्या धर्माधिकारी नवऱ्याशी भांडून त्याची व आपली जन्माची सोडवणूक त्यांनी करून घेतली; परंतु एकंदरीने पाहता त्यांनी आपले चरित्र सच्छील, सत्प्रवृत्त, उद्योगशील व जगाला हितकारक असेच ठेवले असे कोणीही म्हणेल. थिऑसॉफीमध्ये त्यांचा प्रवेश झाला त्यातून मात्र त्यांचे पाऊल कधीही मागे पडले नाही; आणि हिंदी राजकारणांत त्या प्रत्यक्ष लक्ष घालू लागेपर्यंत त्या या राजकारणात पडतील अशी कोणाची अपेक्षा नव्हती. हिंदुस्थानात अधिकारावर असणाऱ्या किंवा नसणाऱ्या युरोपियन लोकांना थिऑसॉफिअस्ट म्हणून त्या कधीही प्रिय नव्हत्या. ते त्यांजकडे नेहमी साशंकवृत्तीने पाहात. त्यांना बाअी ही अेक ब्याद वाटे; पण एकदा राजकारणात पडल्यावर त्यांनी ते अखेरपर्यंत सोडले नाही.

**बाईंचे राजकारण**

राजकारणात त्यांना नेमस्त किंवा मवाळपक्ष हाच अधिक आवडे. लोकमान्य टिळकांविषयी त्यांच्या मनात आदर असला तरी स्नेह असा फारसा केव्हा नव्हता. टिळक हे फाजील जहाल किंबहुना क्रांतिकारक अत्याचारांना साहाय्य करणारे असेही त्यांना वाटे. मात्र टिळक १९१४ साली मंडालेहून परत आल्यावर काँग्रेसमध्ये त्यांचा प्रवेश व्हावा याविषयी बाईंनी खटपट केली; आणि पुढे होमरूल लीगची चळवळ निघाली तेव्हा तर ते व त्या एकमेकांच्य। होमरूल लीगमध्ये सभासदत्वानेहि एकरूप झालेल्या लोकांना काही काळ दिसल्या. १९१९ सालीं बेझंटबाई आपल्या होमरूल लीगतर्फे व टिळक आपल्या होमरूल लीगतर्फे पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढे साक्ष द्यावयाला गेले तेव्हा एकाच सभेत त्यांची भाषणेही झाली; परंतु नंतर सोलापूरच्या प्रांतिक सभेत, बाईंचे नेमस्त पक्षाशी अधिक जुळते, टिळकांशी तितके जुळत नाही, हे दिसून आले. मात्र स्वतः मी टिळकांचा अनुयायी किंवा पाइक हे त्यांना माहीत असताही त्यांनी व्यक्तिशः माझ्याशी सर्वस्वी संबंध स्नेहबुद्धीचा ठेवला होता. पुण्यात एक-दोन वेळा त्यांच्या सत्कारसमारंभात मी भाग घेतला होता. त्यांना अटक होऊन मद्रास सोडावी लागली तेव्हा मी टिळकांच्या वतीने त्यांच्या भेटीला मद्रास येथे गेलो.

व्यक्तिशः त्यांचे माझे संबंध चांगले राहिले होते. कारण टिळक व बेझंटबाई यांच्यामध्ये, काँग्रेसमध्ये व बाहेर राजकारणाच्या क्षेत्रात, बरोबरीच्या नात्याने स्पर्धा चाले; पण मी बाईकडे वडील माणूस या दृष्टीने पाही. त्यांच्या कर्तृत्वाविषयी मला कौतुक वाटे. टिळक दिवंगत झाल्याने १९२० नंतर टिळक पक्षाचे पुढारीपण मजकडे आले. बाईनाही काँग्रेसची असहकारितेची चळवळ मान्य नव्हती. प्रथम दोन-तीन वर्षे त्यांच्या मनावर गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडली होती. परंतु ती लौकरच निघून गेली. आम्ही काही मंडळी काँग्रेसमध्ये राहून काही दिवस झगडलो; परंतु बाईनी काँग्रेसमधून लौकरच अंग काढून घेतले. यानंतर मी दिल्ली येथील असेंब्लीचा सभासद झालो, तेव्हा ओळीने काही वर्षे दिल्लीस सर्वपक्षीय म्हटली जाणारी परिषद भरत असे. तिला बेझंटबाई उपस्थित राहात. त्या प्रत्यक्ष कामात फारसा भाग घेत नसत. या सभांत त्या पाच पाच तास एकासनस्थ अवधानपूर्वक पुतळ्यासारख्या तटस्थ राहू शकत व बोलल्या तर अगदी मोजके बोलत.

हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाले तर ते केवळ क्रांतीने मिळणार नाही, युद्धाने मिळणार नाही, तर पार्लमेंटरी कायद्यानेच मिळेल अशी त्यांची खात्री होती, व तीच आता अखेर खरी ठरली आहे की नाही! आज हिंदुस्थान स्वतंत्र झाले ते पार्लमेंटच्या कायद्याने झाले आहे. विधायक राजकारणावर विश्वास आणि पार्लमेंटरी पुढाऱ्यांशी स्नेहसंबंध व ओळखी जागत्या ठेवण्याची आवश्यकता बाईना वाटे. यापुढे बाईच्या मनात कल्पना आली की, इकडे काँग्रेसची प्रतिकारी चळवळ काय चालावयाची ती चालू दे; पण विलायतेतील हिंदी राजकारण बंद राहू नये. यासाठी बेझंटबाईनी 'कॉमनवेल्थ ऑफ इंडिया' नावाचे एक स्वराज्यविषयक बिल तयार करण्याचे ठरविले. बाईच्या दृष्टीने त्यांच्या होमरूल लीगपक्षाच्या कार्याची ही सहजच पुढची पायरी होती.

## अनुकूल असणाऱ्या परिस्थितीचे स्वरूप

मनात येताच बाईना काय कमी? त्यांनी हिंदुस्थानातील व इंग्लंडातीलही चांगल्या कायदेपंडितांचा सल्ला घेतला, व या कामी मुद्दाम माणसे नेमून लौकरच बिलाचा मसुदा तयार करविला, आणि १९२६ च्या जून महिन्यात ह्या बिलाचा मसुदा घेऊन त्या विलायतेस निघाल्या. इंग्लंडात बाईची कीर्ती फार, त्यांचा स्नेहपरिवार अती विस्तृत, नवोदित मजूर पक्षाशीच इतरांपेक्षा त्यांचा स्नेहसंबंध

अधिक, आणि त्यांनी कोणतेही कार्य अंगावर घेतले म्हणजे त्याला युरोपातील सर्व देशांतून थोडाबहुत पाठिंबा हटकून मिळावयाचा.

## बिलाबद्दल वाटणारी आशा

आता पार्लमेंटमध्ये कोणा खाजगी सभासदाने एखादे बिल मांडले असता ते मंजूर होण्याला फारच अडचणी असतात. त्यातून या बिलाचा आशय तर फारच जाडा. अर्थात स्वतः अधिकारारूढ पक्ष किंवा थेट समोर बसणारा विरोधी पक्ष यांपैकी कोणीतरी वजनदार व्यक्तीने असे बिल पुढे मांडले तरच त्याचे पहिले वाचन तरी पार पडावयाचे. या सर्व अडचणी बाईंच्या लक्षात होत्या. तथापि बिल पार्लमेंटात प्रविष्ट होऊन पहिल्या वाचनाची मजल गाठता येईल अशी आशा वाटण्याइतका त्यांनी मजूरपक्षाचा पाठिंबा मिळवून ठेविला होता. बाई हे बिल घेऊन विलायतेस निघाल्या तेव्हा त्यांना खरोखरीच पुष्कळ आशा वाटत होती; आणि बिल मंजूर न झाले तरी त्याच्या निमित्ताने विलायतेत हिंदी स्वराज्याची चळवळ चालू राहील व राहावी हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

## टिळक पक्षाचा पाठिंबा

टिळक पक्षात बाईंना व्यक्तिशः मान्यता न देणारे असे काही लोक नेहमीच होते. उदाहरणार्थ, दादासाहेब खापर्डे हे एक वेळ सांप्रदायिक थिऑसॉफिस्ट असताही ते बाईंपेक्षा टिळकांना अधिक चाहत. यामुळे त्यांचा व बाईंचा ऋणानुबंध तुटत चालला होता. तथापि टिळक पक्षाने एकंदरीने परराष्ट्रीय राजकारण मनाने कधीही सोडून दिले नसल्याने त्याने बाईंच्या बिलाला पाठिंबा दिला. बाई विलायतेला गेल्या; पण त्यांच्या बिलाचे कार्य फारसे झाले नाही. तथापि बेझंटबाईंना जोपर्यंत लिहिता बोलता येत होते तोपर्यंत त्यांनी हिंदी स्वराज्याच्या राजकारणाचा प्रचार कधीही टाकला नाही. इतक्या वृद्धपणी त्यांनी या बिलासारखी योजना केली, व ते पार्लमेंटमध्ये मांडण्याची आकांक्षा धरली, यावरून त्यांच्या मनाची व शरीरशक्तीची झेप केवढी मोठी होती हे ध्यानी येईल. थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले शिक्षण-कार्यही प्रचंड आहे. त्यांची साधने मोठी तसेच त्यांचे कार्यही मोठेच होते.

आजच्या प्रचंड बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचे मूळ बाईनी स्थापलेल्या बनारस हिंदु कॉलेजमध्येच रुजले. असो. ज्यांच्या नावाची सांगड शतकाशी घालता येते अशा व्यक्तींपैकी बेझंटबाई ह्या एक होत्या, एवढे सांगून केवळ स्थलाभावामुळे मी हा लेख संपवितो.

♣ ♣ ♣

**अभ्यासाकरिता प्रश्न :**

१. बेझंटबाईना पहिल्याप्रथम पाहून लेखकाला काय वाटेल ?

२. बेझटबाईच्या वक्तृत्वाचे वर्णन करा.

३. हिंदुस्थानला कशाने स्वातंत्र्य मिळेल असे बाईना वाटत होते ? आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी यासाठी कोणते कार्य केले ?

**वाचन :** डॉ. बेझट यांचे चरित्र —रा. स. भागवत.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

# ६.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



जन्म — २३ जुलै १८५६  
मृत्यू — १ ऑगस्ट १९२०

"आपणापुढे हे जे पद्य नुकतेच म्हणण्यात आले त्यापेक्षा टिळकांची अधिक स्तुती ती मी काय करणार ? मी केवळ त्यांची स्तुती करण्यासाठी येथे* आलो नाही; कारण, मी काही भाट नाही. तसेच गुणदोषविवेचनाच्या पद्धतीनेही आज मी आपणापुढे बोलणार नाही; कारण टिळकांतमध्ये जरी एखादा दोष असला तरी या वेळी मी तो दाखवावा अशी ही वेळ नाही. या वेळी दोषचर्चा ही अप्रस्तुत आहे व दोषाविष्करणाची ही वेळही नाही. मी त्यांचे नुसते गुणवर्णन करणार नाही; तसेच नुसते दोषाविष्करणही करणार नाही. तर मग मी तुमच्या-

* हा उतारा कै. केळकरांनी फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुढे 'लो. टिळकांच्या चरित्राविषयी चार शब्द' या सन १९२० साली विषयावर दिलेल्या व्याख्यानातून घेतला आहे.

पुढे आज काय बोलणार आहे? मी आज अॅप्रीशिएशनच्या म्हणजे गुणग्राहकतेच्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहणार आहे. या दृष्टीने पाहता नुसती निंदा किंवा नुसती स्तुतीच करावयाची नसते, फक्त गुण पहावयाचे असतात; व त्यातल्या त्यात जो चांगला गुण असेल तो प्रामुख्याने दाखवावयाचा असतो. त्यापासून आपल्याला काय बोध घेता येईल हे पहावयाचे असते.

कोणी म्हणतील की, ही दृष्टी एकेरी आहे; परंतु गुणग्रहण हे नेहमी एकेरीच असणार. सर्वगुणसंपन्न असा कोण आहे? काही गुण परस्परविरोधी असतात व ते दोघे एकाच माणसाच्या ठिकाणी असणे हे प्रायः अशक्य असते. रानड्यांच्याविषयी असे सांगतात की, रानडे म्हणजे केवळ क्षमासमुद्र होता! याच्या उलट टिळक हे तापट होते. आता हे दोन्ही गुण एकाच वेळी एका माणसात असणे केव्हाही शक्य नाही. परस्परविरोधी अशा गुणांचा वास फक्त एका परमेश्वराच्याच ठिकाणी कल्पिलेला आहे. कसे ते पाहा. परमेश्वर हा सर्वज्ञ, प्रेमळ व न्यायी आहे असे म्हणतात. आता परमेश्वर जर सर्वज्ञ आहे तर त्याला लोकांचे दुःख कळत असले पाहिजे; आणि परमेश्वर न्यायी असे म्हटले तर प्रेमळ कसे म्हणता येईल? पण सर्वगुणसंपन्नता ही एका परमेश्वरापाशीच संभवते. मानवी समाजात जन्मास येऊन कोणीही 'सुपरमॅन' कसा असू शकेल? असो; आतापर्यंत टिळकांच्या गुणांची इतकी चर्चा झालेली आहे, की एखाद्याला सांगितले की आजपर्यंत कोणास न दिसलेला असा एखादा टिळकांचा गुण सांग, तुला हजार रुपये बक्षीस देतो, तरी ते त्याला शक्य होणार नाही. तेव्हा मी तुम्हाला टिळकाचा एखादा कोणास न दिसलेला गुण दाखविणार आहे असे नाही. टिळकांचे गुण तेच; पण ते मी वेगळ्या पद्धतीने आपणापुढे मांडणार आहे. तीच फुले पण चार माळ्यांपुढे दिली तर चौघेहीजण चार तऱ्हेने हार गुंफतील. त्याचप्रमाणे टिळकांचे आजपर्यंत वर्णन केलेलेच गुण; पण ते जर निराळ्या तऱ्हेने मांडून दाखविले तर ते नवीन दिसतील.

प्रथम मी विष्णुसहस्रनामाप्रमाणे त्यांचे गुण आपणापुढे म्हणून दाखवितो. पहा त्याचा काय बोध होतो! टिळक सद्वर्तनी होते, विद्वान होते, स्वार्थत्यागी होते, देशभक्त होते, उद्योगी होते, पराक्रमी होते, धैर्यवान होते. अर्थात याने आपणास काहीच बोध झाला नसेल. आता हेच गुण पण ते एकमेकांवर कसे अवलंबून होते हे मी आपणास दाखवितो. या सर्व परस्परावलंबी

गुणांची मी एक साखळी तयार केली आहे ती अशीः– टिळक सद्वर्तनी होते, म्हणून त्यांच्या विद्वत्तेचे चीज झाले. ते विद्वान होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला. स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या देशभक्तीचे चीज झाले. देशभक्त होते म्हणून त्यांच्या उद्योगाचे चीज झाले. उद्योगी होते म्हणून पराक्रमाचे चीज झाले. पराक्रमामुळे धैर्याचे चीज झाले; व टिळक स्वतः धैर्यवान होते म्हणून लोकांना उपदेश करण्याची त्यांना पात्रता आली.

ही साखळी थोडी स्पष्ट रीतीने दाखविणे जरूर आहे. 'टिळक सद्वर्तनी होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेचे चीज झाले' हे कसे ? टिळकांच्या अंगचा लहानपणापासूनचा पहिला गुण म्हणजे सद्वर्तन हा होय. मनुष्य नुसता विद्वान असून उपयोग नाही. त्याच्या जोडीला सद्वर्तन हाही गुण त्याच्या अंगी पाहिजे. या दोन गुणांची सांगड असल्यामुळेच न्यू इंग्लिश स्कूल काढले तेव्हा टिळकांच्या लायकीविषयी कोणाला शंका आली नाही. खुद्द भांडारकरांनी त्यावेळी या प्रसंगासंबंधाने बोलताना असे उद्गार काढले की, 'ही संस्था काढणाऱ्या लोकांत दोन सद्वर्तनी स्वार्थत्यागी एल्‌एल्. बी. आहेत ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे !' मनुष्य सद्वर्तनी असेल तरच त्याच्या विद्वत्तेचे चीज.

दुसरे, 'टिळक विद्वान होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला.' मनुष्य विद्वान असून स्वार्थत्यागी असेल तरच त्याचा उपयोग व चीज. जवळ ५ रुपये असून त्यातून ८ आठ आणे धर्म करण्यापेक्षा जवळ १००० रुपये असून त्यातून ९०० देशकार्याला देणारा मनुष्य माझ्या मताने जास्त श्रेष्ठ ठरेल. टिळक वकील झाले असते तर दरमहा हजारो रुपये मिळविता येण्यासारखी त्यांची विद्वत्ता होती; परंतु त्यांनी स्वार्थाचा त्याग केला व दरमहा ३० रुपयांवर स्वतंत्र पण दरिद्री आयुष्य पत्करिले ! हा खरा स्वार्थत्याग. अविद्वानाच्या स्वार्थत्यागाला जग काडीचीही किंमत देत नाही हे लक्षात ठेवा. स्वार्थी असता तर ज्याने जगाला आग लावली असती अशा मनुष्याने निःस्वार्थी होऊन देशाचा दास व्हावे हा केवढा गुण ! सुभाषितकाराने धीर कोण हे सांगितलेच आहे. 'विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि तएव धीराः' विकारहेतु असून त्याचा त्याग करतील तेच धीर !

'टिळक स्वार्थत्यागी होते म्हणूनच त्यांच्या देशभक्तीचे चीज झाले.' स्वार्थत्यागाचा उपयोग देशभक्तीकडेच केला पाहिजे, तरच त्याचे चीज. मला

अशी काही माणसे माहीत आहेत की, ज्यांच्या अंतःकरणात कधी देशभक्तीचा लवलेशही नव्हता ! परंतु तोंडातून एक शब्द उच्चारल्याबरोबर त्यांची रवानगी तुरुंगामध्ये झाली व सुटल्यावरही त्यांनी कधी देशभक्ती दाखविली नाही ! माणूस उद्योगी असून मनावर घेईल तर हातून पराक्रम घडणार. उद्योग करीत असतानाच पराक्रम केले पाहिजेत. न कळत पराक्रम एखाद्याच्या हातून पुष्कळ होतात; पण टिळकांचे पराक्रम तशांपैकी नव्हते. टिळकांनी सर्व उद्योग जाणूनबुजून केले असल्यामुळे त्यांना पराक्रम करता आले. अजाणतेपणे, क्षणिक उर्मीच्या भरात टिळकांनी कोणतेही कृत्य केले नाही, तर देशसेवा करण्याचा निश्चय ऐन तारुण्यात विचारपूर्वक केला. त्यामुळेच त्यांच्या अंगी असलेल्या धैर्याचे चीज झाले व स्वतः त्यांच्या अंगी एवढे अलोट धैर्य होते म्हणूनच लोकांना उपदेश करण्यास त्यांना पात्रता आली, हे काय कोणास सांगावयास पाहिजे ?

टिळकांच्या विरुद्ध नुकताच एके ठिकाणी असा एक आक्षेप घेण्यात आलेला आहे की, त्यांचे सर्व काम Destructive म्हणजे विघातक होते. माझ्या मते आक्षेप घेणारांनी हा दोष म्हणून दाखवावयास नको होता. निदान तो यावेळी तरी दाखवावयास नको होता ! गुण सुद्धा दोषांच्या भाषेत बोलता येतात व दोष हेदेखील गुणांच्या भाषेत बोलता येतात. दोष दाखविणारालासुद्धा या वेळी असे म्हणता आले असते—" विध्वंसक काम ना ? होय; विध्वंसक काम टिळकांनीच करावे. ते त्यांनाच करता येते ! विध्वंसक काम का होईना, पण पहा कसे बहाद्दरीने केले ! " दुसरे, आक्षेपकांनी निदान राजकीय बाबतीत तरी टिळकांच्याबद्दल असे म्हणावयास नको होते. प्रत्यक्ष चिरोलसारख्या शत्रूकडून त्यांना The father of the Indian Unrest म्हणजे " हिंदवी प्रक्षोभाचे जनक " अशी पदवी मिळाली होती व ती सर्वथैव योग्य होती. कोणतेही राष्ट्र उदयोन्मुख होत असते तेव्हा त्यात 'अन्‌रेस्ट'च उत्पन्न व्हावी लागते. इंग्रज श्रेष्ठ म्हणून त्यांच्याशी नमून वागण्यात नेहमी जी एक फाजील आदरबुद्धी दाखविण्यात येते, तिचा विध्वंसच झाला पाहिजे. काही वेळा विध्वंसच योग्य असतो. लढाई सुरू असता काय होत असते ? दोन्ही पक्षांकडून लढाईची तोफ सुरू झाली म्हणजे मधल्या जमिनीत पखालींनी पाणी टाकून शेताकरिता ती काही कोणी नांगरावयास लागत नाही किंवा त्या वेळेला तेथे शहर कसे उठेल याचाही कोणी विचार करीत बसत नाही. तोफांच्या माऱ्याने सर्व वातावरण भाजून निघून

तेथे No man 's land उत्पन्न होते. चिटपाखरूसुदा तेथे जिवंत राहात नाही मग माणसाची काय कथा ? जमीन भाजून काढल्यानंतरच पेरणी करतात ना ! टिळकांना त्यांच्या शत्रूंनी तोफेची उपमा दिली असती तर ती जास्त समर्पक झाली असती. टिळकांच्या शत्रूंनीदेखील त्यांची राजकीय कामगिरी पाहून असे म्हणावयास पाहिजे होते की, " वा; अहो टिळक म्हणजे केवढी तोफ ! "

असो; टिळकांच्यावरील आक्षेपांचा काही मी आज येथे विचार करणार नाही. कारणपरत्वे म्हणून एवढ्या एकाच आक्षेपाबद्दल बोललो. मी आपणास जी गुणमाला सांगितली त्यांतला मुख्य गुण कोणता हे आपणास पाहावयाचे आहे. जगामध्ये रुचिवैचित्र्य आहे. अर्थात कोणाला हा गुण विशेष आवडेल तर कोणाला तो कमी आवडेल, पण माझ्या मताने मी एक संयुक्त गुण काढला आहे. माझ्या मते टिळकांचे मुख्य गुण म्हणजे निःस्वार्थीपणा, पराक्रम व धैर्य आणि उद्योगीपणा, या चार गुणांच्या संयोगामुळेच त्यांचे आयुष्य इतके प्रभावी झाले. या गुणमिश्रणालाच इंग्रजीत ' Practical Power ' असे म्हणतात.

निःस्वार्थीपणापासूनच त्यांचे चरित्र सुरू झाले म्हणून तो गुण सांगण्याची जरूरी नाही. टिळकांचे धैर्य असामान्य होते. त्यांचे धैर्य केवळ प्रसंगापुरते होते, असे म्हणणारे काही लोक आहेत; परंतु मी निकट सहवासामुळे खात्रीने असे सांगू शकतो की, जितका जोराने निराशेचा आघात होत असे, तितक्याच जोराने किंबहुना त्याच्यापेक्षा जास्त जोराने टिळक आपल्या कार्याला पुनः सुरवात करीत. त्यांच्या धैर्याविषयी एकदोन गोष्टी सहज आठवल्या म्हणून त्या सांगतो. १९०८ साली शिक्षा होण्यापूर्वी अर्धापाऊण तास ते आपल्या स्नेह्यांशी गप्पाविनोद करीत बसले होते, व तो विनोद ओढूनताणून आणलेला नसून अगदी खरा व मनापासूनचा होता. नंतर खटल्याचा शेवटचा निकाल ऐकण्याकरिता आम्ही चौघेजण चौचाकीतून कोर्टात जावयास निघालो. निकाल काय होणार याचे स्वप्न त्यांना पडलेच होते; पण अशा प्रसंगीसुद्धा त्यांनी विनोदाने म्हटले की, " जाताना आपण चौघेजण आहोत. येताना घोड्याचे ओझे एका माणसाने तितकेच कमी होईल ! " यावरून त्यांचे मन किती निष्काळजी व संकटाविषयी बेफिकीर असे ते दिसून येते.

टिळकांच्या अतुल पराक्रमामुळेच लोकांवर त्यांची इतकी छाप बसली. वास्तविक पाहता ते तुरुंगात गेले हा पराक्रम असे मी म्हणणार नाही. त्यांना

तुरुंगात घालण्याची बुद्धी सरकारला ज्या कारणामुळे झाली ते कारण म्हणजे त्यांचे तेजस्वी लेख हा पराक्रम होय. "नो मॅन इज ए हीरो टु हिज व्हॅलेट डी चेंबर" अशी एक इंग्रजीत म्हण आहे. म्हणजे "राजाचे मोठेपण त्याच्या खाजगी नोकराला काय?" परंतु टिळकांच्या बाबतीत तसे म्हणता यावयाचे नाही. टिळकांच्या सहवासात चोवीस तास एकसारखा राहणारा मनुष्यसुद्धा टिळकांच्या गुणांची तारीफ केल्यावाचून राहणार नाही. म्हणून, टिळक वॉज ए हीरो टु हिज व्हॅलेट डी चेंबर! रानडेदेखील टिळकांच्या काही गुणांचे प्रेमाने वर्णन करीत.

## विद्यार्थ्यांनी घेण्यासारखे टिळकांच्या अंगचे काही गुण

विद्यार्थीदशेत टिळक हे पुढे पुढे येणारे किंवा काहीतरी उद्योग बगलेत मारणारे विद्यार्थी नव्हते. चंदावरकरांनी टिळकांचे असे वर्णन दिले आहे की, "टिळक म्हणजे त्या वेळी आमच्या वर्गात एका कोपऱ्यात बसणारा गरीब मुलगा होता; परंतु गणित व संस्कृत या विषयांत त्याचा हात धरणारा कोणी नाही हे सर्वांस पक्के माहीत होते. विद्यार्थीदशेत त्याची देशभक्ती वाखाणण्यासारखी होती.' नुसती देशभक्ती घेतली तर विद्यार्थीदशेत प्रत्येकाच्या अंगात देशभक्ती असते. फार काय पण विद्यार्थीदशेत देशभक्त नाही असा मनुष्यच विरळा! (हशा) याचे कारण असे की, या वयात मनाच्या भराऱ्या फार उंच असतात; भावी आयुष्याचे अत्यंत सुखमय व उज्ज्वल चित्र रेखाटावयाचा प्रयत्न प्रत्येकजण करतो. लाँगफेलो याने "यूथ" म्हणून कविता लिहिली आहे. त्यात त्याने तारुण्याचे फार सुंदर चित्र काढले आहे.

"How beautiful is youth, how bright in gleams,
With its illusions, aspirations, dreams.
Book of beginnings story without end.
Each maid a heroine each man a friend.
Alladins lamp fortunatus' purse.
That holds the treasure of the universe;
All possibilities are within its hands.
No danger daunts it, no foe withstands;
In its sublime audacity of faith

Be thou removed, it to the mountain saith.
And with ambitious feet secure and proud;
Ascends the ladder leaning on the cloud."

पहा बरे या कवितेत तुमचे किती सुंदर चित्र काढले आहे! तुमचे वर्णन येईल तुम्हाला असे करिता ? या कवितेचा अर्थ तुमच्या लक्षात आला असेल. अशक्य हा शब्दच तारुण्यात मनाला माहीत नसतो. अडचणींचा पर्वत जरी मार्गात आडवा आला तरी तरुणपणी इतका विलक्षण आत्मविश्वास वाटत असतो की, पर्वताला तो म्हणतो, 'चल तू दूर हो! मला पुढे जावयाचे आहे.' तसेच तरुण मनुष्य आपल्या महत्त्वाकांक्षेची शिडीही अशी लावतो की, त्याचे एक टोक जमिनीवर तर दुसरे टोक आकाशात उंच असणाऱ्या ढगावर ! पहा कशास काय संबंध ? पण विचार नसणे हेच तरुणांचे लक्षण. पर्वत मार्गात आडवा आला तर त्याला दरडावून दूर होण्यास सांगणे हाच तरुणपणा. पर्वत कसा दूर होईल, आपणास बाजूने गेले पाहिजे, हा विचार त्याच्या मनातच येत नाही. पण सगळी अडचण काय ती—ही धडाडी, हा जोम पुढील आयुष्यात कायम ठेवणे यातच आहे. वृद्ध लोक म्हणतात की, आम्ही आता झालो. तरुण मुलेच आता राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. हे त्यांचे म्हणणे अक्षरशः खरे आहे. तरुण असताना जसे आधार होते तसेच पुढेही आधारस्तंभ म्हणवून घेता आले पाहिजे. नाहीतर पूर्वी मानला जाणारा आधारस्तंभ पुढे चिपाडासारखा वाळून हलका झाला तर उपयोग काय ? अमका चांगला तमका वाईट, असले वादही व्यर्थ होत. टिळक मोठे की गोखले मोठे, असा शुष्क वाद करणारांना नेहमी मी हेच सांगतो की, यातून तुमच्या दृष्टीने जो कमी असेल त्याच्याइतके तुम्ही स्वतः मोठे व्हा म्हणजे झाले ! नुसता वाद करून उपयोग काय ? तुम्ही काय करिता ? तुमचे कर्तव्य काय, याची तुम्हास जाणीव पाहिजे. टिळकांचे विद्यार्थ्यांस नेहमी हेच सांगणे असे. टिळकांची तरुण मुलांवर भक्ती होती, याचे कारण यांतून कर्ती माणसे निघण्याची त्यांना आशा असे. ज्याप्रमाणे एखाद्या तरुण उपवर मुलीचा बाप जो जो तरुण भेटेल त्याच्याकडे पाहात 'हा माझा जावई होण्यास योग्य आहे काय ?' असा प्रश्न स्वतःला विचारीत असतो, त्याप्रमाणे प्रत्येक तरुणाच्या चेहेऱ्याकडे टिळक नजर लावून मोठ्या आशेने पाहात असत. टिळकांकडे कोणीही तरुण गेला तर याचा राष्ट्रकार्याला काय

उपयोग होईल याचा विचार ते करीत. ऑक्सफर्ड–केंब्रिजला परवा आम्ही गेलो होतो, तेव्हा टिळकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला विचारले की, "तू पुढे काय करणार ?" आपण पुढे काय करणार हे जरी आपण ठरविले असले तरी पुढेही ते तसेच हटकून अमलात येते असे नाही. अरविंद घोष हे सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घोड्यावर न बसता आल्याकारणाने नापास झाले व त्यांच्या आयुष्याची सर्व दिशा बदलली. गोखले हे एंजिनियरिंगची परीक्षा पास होते तर एक बडे ऑफिसर झाले असते ! अर्थात अशा गोष्टी क्वचित होत असल्या तरी पण काही-तरी निश्चित ध्येय प्रत्येकाने डोळ्यांसमोर ठेवणे जरूर आहे. प्रत्येकाने राजकारणाचाच अभ्यास केला पाहिजे किंवा राजकारणात प्रत्येकाचे डोके चालेलच असे नाही. राजकारणाशिवाय दुसरे पुष्कळ विषय आहेत. देश हा त्यातल्या मोठ्या माणसांवरून ओळखला जातो. बंगाल म्हटला म्हणजे आज आपल्या डोळ्यांसमोर एकदम दहावीस थोर व्यक्ती उभ्या राहतात. ते सर्वच पुरुष काय राजकारणी आहेत ? कोणी जगद्वंद्य कवी आहेत, तर कोणी वनस्पतिशास्त्र, प्राणि-शास्त्र यांत शोध लावले आहेत. एखादा विषय आला नाही तरी चालेल. तेव-ढ्याने निराश होऊ नका. दुसऱ्यात तुमचे डोके चालेल. काहीतरी मोठे कार्य करण्याची इच्छा धरा. स्वभावभेदामुळे ते राजकीय नसले तरी चालेल. तुमचे सध्याचे कर्तव्य म्हणजे उत्तम तऱ्हेची विद्या संपादन करणे हे होय. अशी महत्त्वाकांक्षा तुम्ही मनात बाळगली पाहिजे की, येथील सर्वात उच्च शिक्षण व सर्वात उच्च पदवी मी मिळवीन व नंतर ही सामुग्री बरोबर घेऊन मी देशकार्य करण्यास झटेन. निस्वार्थीपणा, पराक्रम, धैर्य व उद्योगीपणा हे जे चार गुण टिळकांच्या चरित्रात संयुक्तपणे दिसून येतात म्हणून मी सांगितले, त्यांची जोपासना करण्यास तुम्हाला हाच काळ सर्वात अनुकूल आहे. ती तुम्ही कराल तरच टिळकांचे स्मरण करण्याचे तुम्ही सार्थक केले असे होईल."

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न :

१. 'मनुष्य नुसता विद्वान असून उपयोगी नाही; त्याच्या जोडीला सद्वर्तनही त्याच्या अंगी पाहिजे' असे लेखकाने का म्हटले ? टिळकांच्या उदाहरणावरून याचे स्पष्टीकरण करा.

२. टिळकांचे कोणते प्रमुख गुण लेखकाने दाखविले आहेत ? त्यांचा परस्पर-संबंध काय ?

३. टिळकांच्या ध्येयनिष्ठेचे व धैर्याचे उदाहरण सांगा.

४. तरुण मुलांविषयी टिळकांची दृष्टी काय होती ?

**वाचन** : लो. टिळकांचे चरित्र —न. चिं. केळकर.
'टिळक आणि आगरकर' —श्री. ना. बनहट्टी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# ७. महर्षी धोंडो केशव कर्वे



जन्म १८ एप्रिल १८५८ — मृत्यू ९ नोव्हेंबर १९६२

श्री. अण्णासाहेब कर्वे यांच्यासारखे समाजहितकर्ते शंभर वर्षेपर्यंत जगावे, वाचावे, कार्यक्षम राहावे अशी इच्छा असणे स्वाभाविक होय. अण्णासाहेबांना आज ऐंशी वर्षे पुरी झाली व इतके कार्यनिष्ठ आणि प्रसंगी खडतर जीवन घालवूनही ते आयुष्याचा इतका पल्ला गाठू शकले ही त्यांची कर्तबगारीही लहानसहान नाही. आजही कर्वे यांची कामाची शक्ती व उरक पुष्कळ प्रमाणात कायम आहे. वयोमानाप्रमाणे त्यात थोडीबहुत मंदता व क्षीणता ही यावयाचीच; पण अण्णासाहेबांपेक्षा कितीतरी पटीने अधिक सुखासीन असे आयुष्य घालवूनही साठी ओलांडताच ज्यांच्या शरीराची व मनाची ताकद अगदी कमजोर झाली आहे असे महाभाग कितीतरी भेटतात; नव्हे हा नियमच झाला आहे, व अण्णासाहेब कर्वे यांच्यासारखे सतत कार्यरत असणारे, तऱ्हेतऱ्हेचे प्रसंग नेटाने निभावून नेलेले व तरीही ऐंशीच्या घरात आपली कार्यशक्ती कायम ठेवणारे पुरुष वरील नियमाला अपवाद म्हणूनच समाजात आढळतात. आपल्या

समाजातील कर्ते पुरुष स्वतःचे शरीरस्वास्थ्य, वैयक्तिक आरोग्य यांकडे फारसे लक्ष देत नाहीत. ही गोष्ट क्षुल्लक मानली जाते; पण त्यामुळे समाजाचे नुकसान होते. अण्णासाहेब कर्वे यांनी अत्यंत शिस्तबद्ध व आरोग्याच्या नियमानुसार जीवन व्यतीत करून दीर्घायुष्य मिळविले, हे त्यांचे वैशिष्ट्य सर्वांना आदरणीय व अनुकरणीय असेच आहे.

## निःस्वार्थी समाजसेवा

तथापि केवळ दीर्घायुष्य लाभणे हीच स्वतः एकंदरीने फार महत्त्वाची गोष्ट आहे असे कोणी समजत नाही. म्हणून ही बाजू सोडून इतर रीतीने प्रो. कर्वे यांच्या मोठेपणाची थोडीशी चिकित्सा करू. ही करताना मोठी गणली जाणारी पण लहान-मोठ्या वयांची अनेक माणसे सहजच डोळ्यापुढे येतात. कारण खऱ्या मोठेपणाचा वयाशी काहीच संबंध नसतो. 'गुणिषु न च लिंगं नच वयः' 'तेजसां हि न वयः समीक्ष्यते', 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः' इत्यादी अनुभवसिद्ध वचने हेच दर्शवितात. अर्थात हा वयनिरपेक्ष मोठेपणा एकाच मार्गाने लाभत नाही. कोणी बुद्धीने मोठा, कोणी ध्येयाने मोठा, कोणी कर्तृत्वाने मोठा, कोणी चारित्र्याने मोठा असे प्रकार असतात.

पण ही निरनिराळी अंगे ज्या एकाची असा अंगी म्हणून एक मुख्य गुण मानला जातो, त्याच्या कसोटीवर या विविध गुणांची परीक्षा होऊन निकषावर घासलेल्या सुवर्णाप्रमाणे त्याची प्रत ठरविली जाते. त्या सर्व गुणांचा समावेश करून त्यांच्याकरवी उचित कार्य करवून घेणारा असा एक व्यापक गुण आहे तो म्हटला म्हणजे निःस्वार्थी समाजसेवेचा भाव.

मग या भावाला जे कार्यक्षेत्र मिळेल त्या दृष्टीने त्या मोठेपणाला नाव मिळते. म्हणूनच महात्मा, लोकमान्य, महर्षी, वीराग्रणी, लोकबंधु, धर्मात्मा, देशभक्त अशी निरनिराळी महत्त्वदर्शक नावे रूढ होतात. वास्तविक निःस्वार्थी-पणाची जात एकच; तसेच समाजसेवा, परोपकारबुद्धी यांची जात एकच; पण प्रत्येक मोठा मनुष्य आपले कार्य आपणच पसंत करतो व ठरवून घेतो ते रुचि-भेदाने व स्वभावभेदाने. तसेच बाह्य परिस्थित्यनुरूप या गुणांच्या साहाय्याने केलेल्या कार्याला दिसण्यात महत्प्रमाण किंवा अल्पप्रमाण असे प्रत्यक्ष फल येऊ शकेल; पण 'राजा तुष्टो ग्राममेकं ददाति' या न्यायाने एक गाव धर्मार्थ दिल्याने

राजा जितका उदार म्हणता येईल, तितकाच खरोखर एक मूठभर पीठ धर्म म्हणून देणारा वाणीही उदार ठरेल. कारण मूळातली धर्मबुद्धी तीच. फक्त दोन वस्तूंच्या स्वरूपात व प्रमाणातच कमीअधिकपणा काय तो आला.

## गुणग्राहकाची दृष्टी

पण कर्मफळावरून किंवा विषयभेदावरून कर्मबुद्धीची प्रत लावणाराला खरे तत्त्वज्ञान किंवा साधे व्यवहारज्ञानही नाही असेच कष्टाने म्हणावे लागते. कारण तो मोठ्या माणसांची न होणारी अशी तुलना करू लागतो, व हा श्रेष्ठ हा कनिष्ठ असे ठरवू पाहतो आणि या अज्ञानात द्वेषाची भर पडली म्हणजे मग, जे आहे ते जमेस न धरता जे नाही तेच नेमके त्याने पुढे ओढले म्हणजे कोणीही मनुष्य मोठा म्हणायला उरणारच नाही! पंडिताला 'हा वैदिक नाही' असे म्हणून आणि वैदिकाला 'हा पंडित नाही' असे म्हणून क्षुद्र ठरविण्याची सनातनी कोटी प्रसिद्धच आहे! आधुनिक काळातही ती गोष्ट करणारे भेटतातच. वास्तविक 'कोठे काही। एक आहे एक नाही' हेच संपूर्ण सत्य-प्रतिपादक संपूर्ण वाक्य होय. उदार बुद्धीचा गुणग्राहक 'कोठे काही कोठे काही' (पण काही तरी आहे) हा त्या वचनाचा अर्धा भाग घेईल, तर कृपणबुद्धीचा निंदक 'एक आहे' हेही न घेता 'एक नाही' इतकेच घेऊन, द्वेषबुद्धी प्रभावी करील. तात्पर्य, विवक्षित एखाद्या गोष्टीवरच सर्व महत्त्व रचून ती न करणाराचे मोठेपण अमान्य करणाराला खरे तारतम्य नाही असेच ठरेल. हिमालयाच्या शिखरांत फूटपट्टीनेच मोजले असता कमी-अधिक उंचीची शिखरे दिसतील, परंतु काही एका विशाल उंचीवर गेल्यानंतर शिखरांचा तुलनात्मक उच्चनीचपणा ठरवीत बसण्याच्या उपद्व्यापात काहीच स्वारस्य उरत नाही.

## कार्याचे स्थूल दिग्दर्शन

असो. कर्वे यांचा मोठेपणा इतका निर्विवाद व उघड आहे की, त्याचे वर्णन करण्याला त्यांना कोणतेही विशेषण लावण्याचे कारण नाही. कर्वे यांच्या कार्यावरून त्यांचे मोठेपण प्रतीत होण्यासारखे आहे. म्हणून आम्ही या कार्याचे स्थूल दिग्दर्शन करतो. प्रथम कर्वे हे कोणत्या परिस्थितीतून वर आले हे पाहिले म्हणजेच त्यांच्या कर्तृत्वाचा अचाटपणा सहज लक्षात येतो. जन्मभर केवळ स्वार्थसाधनात घालवून श्रीमंती, लौकिक, संसारसुख, सर्व काही यथास्थित

मिळवून त्यानंतर मग लोकसेवेला प्रारंभ करणाराला मोठेपण प्रमाणाबाहेर मिळते. उघडच आहे की, मोठ्या उंच बैठकीवर लहानसाच पुतळा उभा केला तरी तो लोकांच्या डोळ्यांत सहजच भरतो. राजकारण हीदेखील अशीच एक उंच बैठक आहे की, तिजवर आरूढ झालेली लहानशी मूर्तीही मोठ्या पुतळ्यासारखी वाटावी; पण कर्वे यांना दोनही गोष्टी प्रतिकूल होत्या. त्यांनी सर्व जन्म दारिद्र्यात घालविला, आणि उद्योग केला तोही सामाजिक सुधारणांचा. म्हणजे प्रगतिविमुख समाजाला स्वभावतः अप्रिय असणाऱ्या गोष्टींचा. पाण्यात पोहण्याला पडणाराने अंगात चिलखत घालून शिरावे अशी त्यांची स्थिती होती. म्हणून संपत्तीच्या बडेजावाचे साहाय्य नाही, आणि अद्‌भुतपणाने डोळे दिपविण्यासारखे लोकप्रिय राजकारणी वातावरण नाही ! पण त्यामुळेच त्यांनी मिळविलेल्या यशाला न्याय-बुद्धीने कोणीही अधिक मोठेपण दिले पाहिजे.

**लहानपणचे कष्ट**

प्रो. कर्वे यांनी आपले एक लहानसे आत्मचरित्र लिहिले आहे. ते जो वाचील त्याला आमचे म्हणणे पटेल अशी आम्हाला खात्री आहे. पुण्यास येऊन फर्ग्युसन कॉलेजात ते प्रोफेसर झाले. तेथून पुढे त्यांना किंचित् स्थैर्य लाभले; पण यापूर्वीची त्यांची परिस्थिती काय होती हे लक्षात येण्यासाठी काही गोष्टी सांगतो. वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत त्यांना साधे मराठी शिक्षण पुरे करता आले नाही ! मराठी सहाव्या इयत्तेची परीक्षा देण्याकरिता त्यांना शंभर-दीडशे मैल पायाने प्रवास करावा लागला. पहिली नोकरी केवळ पाच रुपयांची धरली. विद्यार्थीदशेत हाताने स्वयंपाक केला. शिकवण्या धरल्या. खानेसुमारीत गणती-दाराचे काम केले. मुंबईस कॉलेजात असता दरमहा चार रुपयात उदरनिर्वाह केला. पावणेचार रुपयांच्या भाड्याच्या खोलीत संसार केला; पण शिक्षणाप्रीत्यर्थ झालेले दोनशे रुपयांचे कर्ज प्रामाणिकपणे ताबडतोब फेडले. बी. ए. झाल्यावर सर-कारी नोकरी मिळत असता ती धरली नाही. रोज सात-आठ शिकवण्या मुंबईच्या लांबलांबच्या भागांतील करण्याकरिता मैलोगणती पायपीट केली. एखाद्या मजुराप्रमाणे दिवसभर राबून संध्याकाळी रिकामपणा मिळे तेव्हा ते स्नान करीत. अखेर फर्ग्युसन कॉलेजात प्रोफेसरची जागा मिळाली तरी पगार पंचाहत्तरच ! तात्पर्य, घरची गरीबी म्हणून शिक्षण काय किती होईल याची कल्पनाही नाही असे असता शेवटी कर्वे प्रोफेसर झाले! पण हे सर्व होत असता त्याबरोबरच

सक्रिय परोपकार व समाजसेवा यासंबंधी त्यांचे कार्य सुरूच होते. या कार्यांचे धडेही त्यांनी स्वयंस्फूर्तीनेच घेतले. सांगण्यासारखी गोष्ट ही की, मिळकतीच्या पहिल्या रुपयापासून त्यातला काही तरी अंश समाजसेवेकडे खर्च करण्याचे त्यांचे व्रत कमीत कमी ६५–७० वर्षे अबाधित चालू आहे.

कर्वे यांना नुसत्या स्वार्थत्यागाचेच बाळकडू त्यांच्या मातेच्या अमृतमय करांगुलीने घातले होते असे नव्हे, तर ते विधायक स्वरूपाच्या समाजसेवेचेही होते आणि त्यातही त्यांची समाजसेवा प्रथमपासून संघटित स्वरूपाची होती हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. कोणतीही विधायक कार्याची कल्पना मनात आली की, प्रथम संस्था स्थापूनच ते प्रारंभ करीत; पण अशा संस्थेचे पहिले सभासद स्वतः ते असावयाचे, आणि पहिलीच नव्हे तर शेवटची वर्गणीही व्यक्तिशः त्यांचीच असावयाची. शिवाय संस्था अत्यंत काटकसरीने चालवून तिचे जमा-खर्चही आपल्याच हाताने चोख ठेवावयाचे; आणि तिचे काम स्वतः अंग-मेहनतीने करावयाचे असा त्यांचा नियम असल्यामुळे त्यांना इतरांमध्ये सहकार्याची स्फूर्ती उत्पन्न करता येई आणि संस्थेला यश लाभे.

हे मुद्दाम इतक्याकरिताच सांगावयाचे की, महाराष्ट्रात संस्था-संस्थापकांचा दुसराही एक प्रकार लोकांच्या पुऱ्या माहितीचा आहे ! तो असा की, नवीन संस्था स्थापन होण्याच्या आधीच ती स्थापन झाल्याचे नुसते जगजाहीर करावयाचे. स्थापन झाल्यावरही कोकिळेने आपले अंडे कावळ्याकडून उबवून घ्यावे, त्याप्रकारे संस्थेचे अंगमेहनतीचे काम दुसऱ्यावर टाकावयाचे. दुसऱ्यांची वर्गणी घ्यावयाची, पण स्वतःची मागे ठेवावयाची. हिशेब नीट ठेवावयाचे नाहीत किंवा जाहीर करावयाचे नाहीत. संस्था चालेल तोपर्यंत ते सर्व यश आपले आणि बुडाली ( ती बहुधा लवकरच बुडवावयाची ) तर ते अपयश दुसऱ्या कोणाचे ! आणि वरती जन्मभर संस्था-संस्थापक म्हणून स्वतः मिरवावयाचे ! पण कर्वे यांची पद्धती याहून अगदी वेगळी होती. बालविद्यार्थिदशेत स्थानिक 'मुरुड फंड' त्यांनी स्थापिला. तेथपासून दोन वर्षांपूर्वी ग्रामशिक्षणसंघ स्थापन करीपर्यंत त्यांनी दहा-पंधरा संघटित संस्था स्थापन केल्या. त्या सर्वांचा हेतू शिक्षण, दुःखविमोचन, चारित्र्यसंवर्धन अशा म्हणजे उदात्त प्रकारचा होता आणि हा हेतू बऱ्याच अंशांनी सफल झालेला पाहण्याचे भाग्यही सुदैवाने त्यांना लाभले.

## विशिष्ट कार्यपद्धती

कर्वे यांनी केलेले कार्य भरीव समाजसेवेचे असले तरी त्यातल्या त्यात ते बरेच अवघड होते. समाज हा प्रायः शक्य तितकी पूर्वपरंपरा चालू ठेवण्याची इच्छा करणारा असतो. त्यातूनही समाजातील स्त्री-विभाग-सुधारणा हे कार्य नाजूक, जोखमीचे, जबाबदारीचे आणि अनेक पथ्ये संभाळून केले तरी, बहुजन-समाजाला प्रायः अप्रिय असते. कर्वे यांच्या हातून जे स्त्री-समाजसेवेचे कार्य झाले त्याचा प्रारंभ त्यांनी स्वतःच्या पुनर्विवाहापासून केला. एका दृष्टीने व्यक्तिशः सक्रिय कार्यारंभ हा शुभारंभ असला तरी कर्वे यांचे कार्य इतर रीतीने या आरंभामुळेच अप्रिय होण्याचा संभव होता. त्यामुळे त्यांना प्रारंभीच लोकांच्या दूषित ग्रहाची बाधा झाली; पण त्यांच्या स्त्री-समाजसेवेची कल्पना वैधव्य-दुःख-निवारणाहून पुष्कळच अधिक व्यापक आहे हे पुढे दिसून आले. त्याचा विकास सर्वांगीण स्त्री-शिक्षणात होताच लोकांची अप्रीती जाऊन त्या कार्यास लोकप्रियता लाभू लागली. स्वतः पुनर्विवाह केला तरी पुनर्विवाहाच्या प्रत्यक्ष प्रचाराचे कार्य त्यांनी केले नाही. उलट स्त्री-शिक्षणाचे कार्य मनाने आणि कृतीने त्यांनी पुनर्विवाहाच्या प्रचारापासून बरेचसे अलिप्त ठेवले. नव्या रूढी पाडाव्या, मान्य करवाव्या असे त्यांना वाटत असले तरी समाजाशी शक्य तितका संबंध ठेवावा, बंडखोरी करावी लागली तरी ती उनाडगिरीची हौस भागविण्याकरिता करू नये तर तत्त्वनिष्ठेकरिता व अवश्य तितकीच करावी आणि समाजाला विनाकारण डिवचू नये अशीच आचरणपद्धती कर्वे यांनी ठेविली होती. म्हणूनच त्यांच्या कार्याला वाढती मान्यता लाभत गेली.

## रानड्यांचे तत्त्वज्ञान व आगरकरांची तळमळ

गेल्या चाळीस वर्षांपूर्वी स्त्रीशिक्षण आणि स्त्रीविषयक सामाजिक सुधारणा यांजकडे पाहण्याची महाराष्ट्राची दृष्टी कोणती होती आणि तीच आज कोणती आहे यांतील भेद पाहिला म्हणजे महाराष्ट्रीय समाज हा मुख्यतः बुद्धिवादी आहे, अंधभावनावादी नाही हेच दिसून येते. करणारा भेटला तर कोणत्याही चांगल्या गोष्टीचा उपयोग वाईट हेतूने व अनिष्ट दिशेने करता येतो. ज्या अग्नीवर वैश्वदेवाचा भात शिजू शकतो त्याने सज्जनांची घरे जाळता येतात; परंतु केवळ दुरुपयोगाच्या संभवाला बुजून भिऊन सदुपयोगही त्याज्य मानावा असा तारतम्यशून्य हा महाराष्ट्र नाही. म्हणूनच हिंदुस्थानातल्या कित्येक प्रांतातील

समाजापेक्षा महाराष्ट्रीय समाज स्त्री-शिक्षणाच्या बाबतीत पुढे गेला आहे. पुनर्विवाहाच्या बाबतीत तो उत्साही नसला तरी सहिष्णु बनला आहे. स्त्रियांच्या हक्कांच्या अधिकारांच्या बाबतीत त्याने उदारमतवादित्व स्वीकारले आहे. या सर्व गोष्टी स्वाभाविक परिणतीने घडून येणाऱ्या होत्या व तशाच घडून आल्या आहेत हे जरी खरे, तथापि कोणत्याही मतपरिवर्तनाची चळवळ म्हणून व्हावी लागते आणि चळवळ म्हटली म्हणजे तिला पुढारी लागतो. त्याप्रमाणे स्त्री-शिक्षणाच्या चळवळीला खरा सक्रिय व विधायक पुढारी कर्वे हीच व्यक्ती लाभली हे कोणालाही मान्य करावे लागेल. ही चळवळ करून त्यांनी रानड्यांचे तत्त्वज्ञान आणि आगरकरांची तळमळ ही दोन्ही फलद्रूप केली.

## समाजसेवेतील श्रमविभाग

समाजसेवा म्हटली म्हणजे ती समाजाच्या कोणत्याही एकाच अंगाच्या जोपासनेने परिपूर्ण होत नाही हेच खरे आहे. कारण अर्थशास्त्रातील श्रमविभागाचे तत्त्व समाजसेवेलाही लागू पडते. यामुळे आपल्या निष्ठेनुरूप, आवडीनुरूप व अनुकूलतेनुरूप जो तो पुढारी आपले कार्य आखून घेतो. यामुळे तो एकडोळ्या माणसासारखा दिसतो; पण खरोखर तो तसा असत नाही. त्याचा दुसराही डोळा उघडा असतो. देशहिताकरिता चाललेल्या इतर कार्याकडे त्याची दृष्टी तर असतेच पण सहानुभूतीही असते. हे आपलेही काम; पण ते केवळ सोईकरिता दुसऱ्याकडे सोपविले आहे असे तो मानतो. कर्वे हे जन्मभर सामाजिक सुधारणेच्या कार्यात गढून गेले असले तरी राजकीयदृष्ट्या होत असणारे काम त्यांना असंमत नव्हते, इतकेच नव्हे तर ते मनाने त्याला आशीर्वादच देत असतात. ते कोणत्याही राजकीय संस्थेचे सभासद आजवर झाले नाहीत. ते राष्ट्रीय सभेच्या एखाद्या तरी सभेला हजर राहिले असतील की नाही याची शंकाच .आहे; पण यावरून ते राजकारणाला भीत होते असा एखाद्या निंदकाला सहज सुचणारा आक्षेप मात्र मूर्खपणाचा ठरेल. **दारिद्र्य, देहदंडन, उपासमार, स्वयंसेवा, लोकनिंदा किंवा अप्रियता** ही सोसण्याची पात्रता इतके गुण ज्याच्या अंगी कर्वे यांच्याइतके तीव्रतेने वसत असतील तो मनुष्य सरकारच्या रोषाला भिईल हे संभवतच नाही. तात्पर्य, समाजसेवेत श्रमविभागाचे तत्त्व लागू पडते इतकाच बोध कर्वे यांच्या एकध्येयी, एकनिष्ठ चरित्रावरून घेण्यासारखा आहे. राष्ट्रोत्कर्षाच्या उपासनेतही ‘ साधनानाम् अनेकता ’ हाच सिद्धान्त खरा!

## व्यक्तिमत्त्वाची महानता

निष्कलंक चारित्र्य हा जो गुण सार्वजनिक कार्य करणाऱ्या कोणत्याही पुढाऱ्यात पाहिजे तो कर्वे यांच्या ठिकाणी पूर्णपणे होता, हे त्यांचे एक अतुलनीय वैशिष्टच म्हणून सांगता येईल. विशेषतः समाज-सुधारणा—त्यातूनही स्त्रीसमाजाची सुधारणा करण्याचे व्रत ज्यांनी स्वीकारले त्यांचे खाजगी व सार्वजनिक आयुष्य अगदी धुतल्या तांदळासारखे असले पाहिजे. दुर्दैवाने या बाबतीत पुष्कळदा चमत्कारिक परिस्थिती आढळून येते. अण्णासाहेब कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यावर जुन्या मताच्या मंडळींनी पुष्कळदा टीका केली असेल; पण त्यांचे चारित्र्य व निष्ठा यांवर शिंतोडा उडविणे या महाराष्ट्रात कोणालाही शक्य झाले नाही. कीर्ती, पैसा व इतर सर्व तऱ्हेचे मायामोह यांच्यापासून कर्वे हे निग्रहाने दूर राहिले. त्यामुळेच त्यांच्या अंगीकृत कार्याला इतकी स्थिरता व यश प्राप्त झाले आणि 'अनाथबालिकाश्रम', 'विधवा आश्रम' अशा त्यांनी काढलेल्या संस्थांतून व त्यांच्या शिक्षणसंस्थांतून लोकांनी आपल्या मुलीबाळी निःसंकोचपणे पाठविल्या. हा जो समाजाचा विश्वास कर्वे यांनी संपादन केला, तो खरोखर अपवादच म्हणावा लागेल व त्यातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता दिसून येते.

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न :

१. महर्षी कर्वे हे कोणत्या परिस्थितीतून वर आले

२. कर्वे यांच्या अंगचा सर्वांत श्रेष्ठ गुण कोणत त्या गुणाची गरज समाजाला जास्त का आहे ?

३. माहिती मिळवून टिपणे लिहा—'स्त्रीशिक्षणाची चळवळ'; 'सामाजिक सुधारणा'; 'आगरकर.'

**वाचन** : 'भाग्यवान शतायुषी'—य. गो. नित्सुरे; 'आत्मवृत्त'- महर्षी धोंडो केशव कर्वे.

## ८. स्वामी विवेकानंद



जन्म १२ जानेवारी १८६३ — मृत्यू ४ जानेवारी १९०२

"आताच एका विद्यार्थ्याने सांगितले* की, अत्यंत गहन निराशेची लाट आज तरुण पिढीवर आलेली असून, तिची बाधा न व्हावी म्हणून विद्यार्थीवर्ग अनेक करमणुकींच्या मार्गांचे अवलंबन करीत आहे! रास्त प्रकारची व फारसा खर्च न पडणारी करमणून करणे हा, निराशेची आठवण बुजविण्याचा, एक मार्ग आहे खरा. तथापि माझ्या मते तरुण विद्यार्थीवर्ग स्वामी विवेकानंदांसारख्या विभूतीच्या चरित्राचे मनन करील तर त्याची निराशा जाईल; इतकेच नव्हे तर, त्याच्या हातून राष्ट्रोपयोगी कार्यही हौसेने होईल.

* ( फर्ग्युसन कॉलेजात विवेकानंद सोसायटीच्या विद्यमाने ता. १९ जुलै १९३५ रोजी दिलेल्या भाषणातून. )

तीसपस्तीस वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेता त्या वेळच्या तरुण पिढीच्या धार्मिक व आध्यात्मिक मनोरचनेचे एक प्रतीक म्हणून विवेकानंदांचे उदाहरण देण्याजोगे आहे. खुद्द बंगाल्यात ह्यापूर्वी राममोहन राय, केशवचंद्र सेन, यांसारखे धर्मप्रचारप्रवीण लोक होऊन गेले, पण माझ्या मते स्वामी विवेकानंदांची मनोरचना त्यांच्याहून अधिक स्पृहणीय व अधिक यशस्वीही ठरली. राममोहन राय हे अत्यंत विद्वान व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करणारे होते; परंतु त्यांचे बहुतेक कार्य विध्वंसक रूपाचे व्हावे लागले. ते कार्य म्हणजे हिंदूंच्या सामाजिक दोषांचे प्रखर आविष्करण! हिंदुस्थानने पाश्चात्य संस्कृती स्वीकारावी इतकाच मोघम उपदेश त्यांनी केला. केशवचंद्र सेन हे भक्तिमार्गी असून प्रार्थनासमाज स्थापन करण्यास त्यांनी मदत केली; परंतु प्रार्थनासमाज ही धार्मिक संस्था यशस्वी का होऊ शकली नाही याची कारणे महाराष्ट्रातील लोकांना विदितच आहेत.

## विवेकानंदांचे यश अधिक मोठे

मी कदाचित असेही म्हणण्याचे धाडस करीन की, विवेकानंदांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांचेपेक्षादेखील विवेकानंदांचे यश अधिक मोठे. विवेकानंद न होते तर कदाचित रामकृष्ण परमहंसांची कीर्ती इतकी न पसरती. गुरूची सर्व आध्यात्मिक तपस्या समाधी लावून अध्यात्मसाक्षात्कार घेण्यात खर्च झाली; परंतु तिने व्यवहाराला फारशी मदत केली नाही. रामकृष्णांना मी उज्ज्वल दीपाची किंवा मशालीची उपमा देईन, तर विवेकानंदांना त्या मशालीने चेतविलेल्या दावानलाची म्हणजे वनविध्वंसक अग्नीची उपमा देईन ! रामकृष्णांनी स्फूर्ती दिली, विवेकानंदांनी कार्य केले. मग शिष्याचे यश जर अधिक, तर गुरूची स्तोत्रे अशा शिष्याने गावी व अधिक नामस्मरणपूर्वक कोणतेही कार्य करावे, याची जुळणी कशी होते ? असे कोणी विचारील तर त्याला उत्तर हे की, गुरूचे स्तोत्र गाणे हा गुरूला शाबासकी देण्याच्या धिटाईचा एक विनयपूर्ण प्रकार आहे. शाबासकी वडील माणसाने लहानाला द्यावी ही अनुलोम पद्धती खरी; परंतु काही काही शिष्य आपणाकडे लहानपणा घेऊन गुरूलाच मोठा करून दाखवितात. याविषयी ना. गोखल्यांना आपले गुरु म्हणणाऱ्या म. गांधींचे उदाहरण सहज सुचण्यासारखे आहे.

असो. विवेकानंदांचे चरित्र आपण पुष्कळांनी वाचलेच असेल. जन्म १८६२ साली. मृत्यु १९०२ साली. मिळून अवघ्या ४० वर्षांत त्यांनी लोकयात्रा संपविली.

त्यांचे वडील एक वकील ( अटर्नी ) होते; परंतु आजे संन्यासी झाले होते. मध्यंतरी एक किंवा अनेक पिढ्या टाकून मागील पूर्वजांचे काही गुण पुढील वंशजांमध्ये आढळतात, असे म्हणतात, त्याचे हे उदाहरण असेल काय ? बी. ए. च्या परीक्षेला तत्त्वज्ञान या विषयाचा अभ्यास करीत असता विवेकानंदांनी पत्रद्वारें हर्बर्ट स्पेन्सर यांचेशी वादविवाद केला. तथापि कॉलेजातून बाहेर पडताना स्वतः ते अज्ञेयवादीच राहिले; पण पुढे कायद्याच्या अभ्यासाला लागण्यापूर्वीच त्यांची व रामकृष्ण परमहंस यांची गाठ पडली. गुरूला आवडता शिष्य भेटला. शिष्याला आवडता गुरू भेटला व त्याच्या जीवनचक्राला वेगळी दिशा लागली. हिमालय, तिबेट वगैरे भागांत काही थोडे योगसाधन केल्यावर स्वामीजी हिंदुस्थानात संचारार्थ निघाले.

१८९२ किंवा ९३ साली ते मुंबई-पुण्याच्या बाजूला आले होते; पण तेव्हा ते मुळीच प्रसिद्ध नव्हते. त्यावेळी मी सातारा येथे एलूएल्. बी. चा अभ्यास करीत होतो. उन्हाळ्याचे सुटीत साताराची काही वकील मंडळी महाबळेश्वरला गेली होती; ती परत आल्यावर सांगू लागली की, "कोणी एक तरुण तेजस्वी बंगाली संन्याशी आम्हाला भेटला. त्याचे इंग्रजी वक्तृत्व अत्यंत सुंदर मोहविणारे असून, तत्त्वज्ञानविषयक विचार फारच उमदे व शहाणपणाचे भासले. साताऱ्यास येण्याविषयी आम्ही त्याला निमंत्रण केले आहे." पण अखेर ते आले नाहीत; यामुळे त्यांना समक्ष पाहण्याचा योग मला लाभला नाही.

**स्वामीजी गेले, त्यांनी पाहिले व जिंकले !**

असो. हा संचार करीत करीत स्वामी दक्षिणेकडे त्रिवेंद्रम येथे व तेथून मद्रासला गेले. शिकागो ( अमेरिका ) येथे भरणाऱ्या धार्मिक विश्वपरिषदेची बातमी तिकडे नुकतीच आली होती व अशा परिषदेला आर्यतत्त्वज्ञान शिकविण्यास हिंदी प्रतिनिधी पाठवावयाचा तर स्वामीजी हे फार योग्य असे ठरवून काही धनिक लोकांनी त्यांना अमेरिकेस जाण्याला द्रव्यसाहाय्य दिले.

सीझरच्या पराक्रमाचे ज्याप्रमाणे वर्णन करतात त्याप्रमाणे स्वामीजींनी अमेरिकेत मिळविलेल्या यशाचे वर्णन "गेला, पाहिले, जिंकले" अशा तीनच शब्दांनी करता येण्यासारखे आहे ! तेथील पत्रांनी त्यांना "जन्मसिद्ध अजिंक्य वक्ता" असे शिफारसपत्र दिले; आणि यापुढे अमेरिकन लोकांनी हिंदुस्थानात

ख्रिस्ती धर्मोपदेशक मिशनरी पाठवावे तरी कशाला असा प्रश्नही केला! अमेरिकेची ही शंका अद्यापि कायमच आहे. अमेरिकन मिशन सोसायटीतर्फे मिशनरी नसलेल्या (लेमेन) अशा गृहस्थांचे एक शिष्टमंडळ मुद्दाम याच महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता हिंदुस्थानात आले होते. या शिष्टमंडळाने पुण्यातील इतर काही गृहस्थांप्रमाणे मुलाखतीत माझे विचार समजून घेतले. तेव्हा मीही त्यांना हेच सांगितले की, " ख्रिस्ती धर्माच्या जाळ्यात हिंदी सावजे पकडण्याकरिता मिशनरी पाठवावयाचे असतील तर ते यापुढे तुम्ही पाठवू नयेत. त्यात तुमची निराशा होईल. पुढच्या पिढीत या देशात धर्म म्हणून काही उरेल की नाही अशी शंका कोणी घेतात ती घेवोत. मला तसे वाटत नाही; पण एवढे निश्चित वाटते की, यापुढे ख्रिस्ती धर्माला सुशिक्षित हिंदी लोक किंवा सुसंस्कृत हिंदी लोक धर्मांतर करणारे मिळणार नाहीत. दुष्काळासारख्या आपत्तीमुळे तुम्हाला लोक बाटवावयाला मिळतील तितकेच. तथापि अमेरिकन मिशनकडून निरपेक्ष जनतासेवेचे जे उदाहरण घालून देण्यात येते त्याचे आम्ही हिंदी लोकही कौतुक करतो. सुदैवाने सांस्कृतिक देवघेवीच्या दृष्टीने निरनिराळ्या देशच्या लोकांची गाठ यापुढे अधिकच पडत जाईल. म्हणून तुम्ही या दृष्टीने मिशनरी पाठवीत जा. त्यांच्याकडून आम्ही जनतेच्या सक्रिय सेवेची तत्त्वे शिकू, व आर्य धर्माची तत्त्वे त्यांना मोबदल्यादाखल शिकवून परत पाठवू. " स्वामीजींच्या अमेरिकेतील विजयाची खूण हीच की, ते येताना काही इंग्रज व अमेरिकन शिष्यच बरोबर घेऊन आले व ती परंपरा अजूनही सुरू आहे. त्यांनी व त्यांच्या गुरुबंधूंनी अमेरिकेत स्थापलेली वेदान्त सोसायटी अजून कार्य करीत आहे. अमेरिकेतून परत आल्यावर स्वामीजींनी कोलंबोपासून हिमालयापर्यंत दौरा काढून जी व्याख्याने दिली ती अत्यंत वाचनीय आहेत. १८९७ ते १९०० या सालात स्वामीजींनी अल्मोरा, बेलूर वगैरे ठिकाणी मठांची स्थापना केली; व जनताजनार्दनाची सेवा हाच मुख्य कार्यक्रम त्या मठांतून संन्याशांच्या सांप्रदायाकडून सुरू केला. निष्क्रिय भक्तिमार्गाचे ध्येय टाकून देऊन, कर्मयोगी संन्याशाचे ध्येय आपल्या मठवासी गुरुबंधूंकडून मान्य करवून घेण्याला स्वामीजींना कितीतरी प्रयास पडले, पण अखेर त्यांनी ती ध्येयक्रांती कशी घडवून आणली हे रोमां रोलां यांनी लिहिलेल्या स्वामीजींच्या चरित्रात तुम्हाला वाचावयास मिळेल. १९०० साली स्वामीजींनी युरोप-अमेरिकेकडे पुनः एकदा संचार केला;

पण परत आल्यावर ते फार दिवस जगले नाहीत. हाती घेतलेले कार्य अपुरे असताच, पण त्याला योग्य दिशा लावून, त्यांनी चिरसमाधी घेतली.

स्वामीजींचे हे चरित्र थोडक्यात असे आहे, पण त्यापासून आपण काय बोध घ्यावा हा प्रश्न शिल्लक उरतोच. म्हणून माझ्या समजुतीप्रमाणे त्याचे उत्तर देऊन मी आपले भाषण संपविणार आहे.

## देशभक्ती हाच आधार

स्वामी विवेकानंद यांना दैवी संपत्ती पुष्कळच लाभलेली होती. नुसते त्यांचे स्वरूप पाहिले तर भव्य कपाळ, गरगरीत पाणीदार डोळे, मोह पाडणारे वक्तृत्व, तीव्र बुद्धिमत्ता, अतुल उत्साह, आणि लौकिक-अलौकिक विद्यांचा अभ्यास, या गोष्टी लक्षात घेता ते कोणत्याही उद्योगधंद्यात यश मिळवते यात शंका नाही. निदान बंगाली तरुणांच्या आवडीचा व त्यांना वश असणारा वकीलीचा धंदा व राजकारणाचा उद्योग यांत ते पडते तरी उच्च दर्जाला पोचले असते. स्वामीजी वारले त्यावेळी वंगभंगाची चळवळ सुरू झालेली नव्हती; परंतु लॉर्ड कर्झन यांनी आपले स्वरूप प्रकट केले होते. अर्थात् स्वामीजी राजकारणात पडते तर बाबू अरविंद घोष यांचेप्रमाणे ते खचित नाव करते; पण पुष्कळांना हे माहीत नाही की, प्रचलित राजकारण ही फार हलकी गोष्ट ते मानीत! आणि राजकारणात त्यांनी पडावे अशा सूचना त्यांना झाल्या असताही त्यांनी नकारच दिला. कारण "देशभक्ती ही केवळ राजकारणातच साठविलेली आहे असे नाही. तिची उपासना करण्याचे इतर अनेक मार्ग मोकळे आहेत" असे ते मानीत. मात्र राजकारणाविषयीची अनादरबुद्धी त्यांनी देशभक्तीला लाविली नाही. ते वेदान्ती होते तरी देशभक्त होते. याचे कारण जग उलथण्याची शक्ती असली तरी ती प्रभावी करण्याला जो आधार लागतो, तो देशभक्तीवर टेकून किंवा स्थिर होऊनच मिळतो असे त्यांना वाटे. या आधाराला इंग्रजीत 'फलक्रम' असा शब्द आहे. असे सांगतात की ग्रीक गणितशास्त्रज्ञ आर्किमेडीज याने, सर्व भूगोलच्या भूगोल म्हणजे पृथ्वी उचलून फेकून देता येईल अशी लिव्हर, म्हणजे पहार बनविता येईल असे गणिताने ठरविले; पण त्याला पंचाईत ही पडली की, त्या लिव्हरचे टोक भूगोलाखाली घालून तो उलथून टाकताना तो लिव्हर किंवा पहार टेकून धरावयाची कशावर ? स्वामी विवेकानंद यांनी मनाशी असे ठरविले की, आपण

आर्य धर्म जगाला शिकविण्याचे व पटविण्याचे महाकार्य करू, पण त्याला देशभक्तीचा आधार घेतल्याशिवाय भागावयाचे नाही.

## संन्यास व कर्मयोग यांचा मेळ

असो. स्वामीजींनी राजकारण टाकले, तथापि धर्मप्रसार करण्याचे ध्येय त्यांनी स्वीकारले तरी त्याकरिता संन्याशी होण्याचीच काय गरज होती ? खुद्द गुरु रामकृष्ण परमहंस हे विवाहित होते. पूर्वीचे अनेक धर्मप्रसारकही विवाहित होते. मग स्वामीजींनी संन्यासच का पत्करला ? याला माझे उत्तर असे की गीतेतील कर्मयोग जरी त्यांना मान्य होता, तरी संन्याशी बनल्याने कर्मयोगी अधिक यशस्वी होतो असेच त्यांना वाटत असावे. शंकराचार्यांच्या मते संन्यासदीक्षा ही ज्ञानाची खूण, व ज्ञानोत्तर कर्म करण्याचे कारण नाही. उलट टिळकांचा कर्मयोगी हा गृहस्थाश्रमी असू शकतो; पण या दोनही बाजू एकेरी होत. एकीत संन्यासावर जोर तर दुसरीत कर्मयोगावर जोर. किंबहुना संन्यासाविषयी अप्रीती. पण स्वामी विवेकानंद यांनी या दोहोंचा मेळ घालून संन्यास आणि कर्मयोग ही एकत्र केली. इतरांच्या संसारासाठी त्यांचा संन्यास होता. गृहस्थाश्रम हा सांभाळण्याला वास्तविक संन्यासापेक्षाही कठीण असे काही जाणते लोक म्हणतात. कदाचित स्वामीजींनी ही अडचण ओळखून दोन्ही गोष्टींमध्ये चांगल्यातला चांगला म्हणून संन्यासाचा स्वीकार केला असावा. अर्थात असली निष्ठा किंवा विवेक सांगून येत नाही. तो जातीचाच असाव लागतो; आणि त्यावरूनच मनुष्याच्या तत्त्वज्ञानाची परीक्षा होते.

## लोकोद्धाराच्या कार्यात रमलेला संन्यासी !

मनुष्याचा आयुष्यक्रम ही त्याचे तत्त्वज्ञान ओळखण्याची एक खूण होय. जीवनाकडे दोन वेगवेगळ्या दृष्टींनी पाहणारे लोक तत्त्वज्ञान्यांत आहेत. एक त्यागवादी व दुसरे भोगवादी. भोगवादी लोक हे जगत व जीवन सत्य मानणारे व प्राथमिक स्वरूपात तरी द्वैती असतात. योग्य व न्याय्य प्रकारची सुखे भोगणे, हा जीवनाचा हक्कच आहे असे ते मानतात. सुख भोगण्याला जीवन पाहिजे, अर्थात् ते सांभाळले, रक्षिले पाहिजे, म्हणून ते उद्योगवादी असतात आणि उद्योगात मधून मधून अपयश पदरात पडले तरी शेवटी इष्ट तेच प्रभावी होईल अशी आशा ते निरंतर बाळगतात. याला भोगदर्शन असे वाटेल तर आपण नाव देऊ; मात्र हे केवळ चार्वाकाचे तत्त्वज्ञान नव्हे. याच्या उलट सिद्धांत त्यागाचा. इंग्रजीत

त्याला 'ॲसेटिसिझम' म्हणतात. या मताच्या लोकांना जगत व जीवन हे तत्त्वतः खरे नाही, मायामय आभासमय आहे असे वाटते; व त्याच्या खरेपणाचा अनुभव आला तरी तो दुःखमयच असणार असा त्यांचा सिद्धांत असतो. अशा लोकांना पुढील आशा बाळगण्याचे काय कारण? अर्थात् ते नुसते दैववादीच नव्हे तर, निराशावादी असतात. त्यागवृत्ती दर्शविणारे इंग्रजी व मराठी शब्द जवळ जवळ एकाच अर्थाचे कितीतरी सांगता येतील. उदाहरणार्थ, एकोराईट, हर्मिट, मंक, सेंट, सेज, साधु, बैरागी, गोसावी, योगी, ऋषी, यती, संन्यासी इत्यादी. यांतील कोणताही एक शब्द तंतोतंत दुसऱ्याशी अर्थाने मिळणारा नाही. तरी ते एका विशिष्ट वृत्तीचेच द्योतक आहेत, म्हणजे निवृत्तीचे. यांतील कोणता शब्द विवेकानंदांना लावावा? मला वाटते संन्यासी हा सर्वसाधारण शब्दच त्यांना लावणे बरे. पण त्यांनी 'आश्रम' या अर्थी संन्यासाचा स्वीकार केला होता, कर्मसंन्यास या अर्थाने नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे. स्वतःच्या सुखा-विषयीची अभिलाषा त्यांनी सोडली होती. या दृष्टीने ते खरे संन्यासी होते; पण लोकोद्धाराची अनेक कार्ये करण्यात ते गढून गेले होते.

त्यांच्या भाषणांतून-उपदेशांतून त्याग व भोग या दोन शब्दांची जोडी पदोपदी आढळते. ते त्यांचे ब्रीदवाक्याचेच शब्द होत; पण लक्षात ठेवण्याची गोष्ट ही की, त्याग हा स्वतःच्या व्यक्तीपुरताच त्यांनी स्वीकारला होता; आणि आपणाव्यतिरिक्त जग हे भोगाचे अधिकारी आहे असे ठरवून त्याची सेवा करावी म्हणजे त्याला योग्य ते भोग व सुखे प्राप्त करून घ्यावी व दुःखापासून त्याची सुटका करावी, असे सजोड तत्त्वज्ञान त्यांनी निश्चित केले होते. स्वतःकरता त्याग व दुसऱ्याला भोगप्राप्ती असे म्हटले म्हणजे त्यागवाद व सुखवाद या शब्दांचा समन्वय होतो. याच समन्वयबुद्धीने त्यांनी हिंदुस्थानला एका प्रकारचा व युरोप-अमेरिकेला वेगळ्या प्रकारचा उपदेश केला. त्याचे मर्म हेच की, हिंदुस्थानने आहे याहून अधिक भोगवृत्ती स्वीकारावी, व युरोप-अमेरिकेने आहे याहून अधिक त्यागवृत्ती स्वीकारावी, हा तो उपदेश होय. उघडच आहे की, जे आहे ते + जे नाही ते = संपूर्णत्व. सोप्या शब्दांत सांगावयाचे तर, वासना या दुःखमूल खऱ्या; पण त्यामुळे सर्वच वासना निषेधार्ह किंवा विवादा-स्पद ठरत नाहीत. वासनांतही सद्वासना व असद्वासना असा भेद आहेच. म्हणून स्वतः निःस्वार्थीपणा व संन्यास स्वीकारून, सद्वासनांवर आधारलेले

भोग व सुखे जगाने भोगावी, असा उपदेश करण्याला स्वामी विवेकानंदांसारख्या विभूतींना सहजच योग्यता प्राप्त झाली होती. 'बुडते हे जन ! देखवे ना डोळा' अशी स्थिती होऊन ते स्वतः लोकोद्धारासाठी त्यागी संन्यासी झाले; पण म्हणून सर्वांनी संन्यास स्वीकारावा असा त्यांचा उपदेश नव्हता. तर सत्कर्मे करून लोकांनी सुखी जीवनाचा आनंद उपभोगावा असे त्यांचे सांगणे होते, त्या दृष्टीनेच त्यांनी आयुष्यभर परिश्रम केले आणि 'जगाच्या कल्याणा। संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे।' हे तुकोबांचे वचन सार्थ करून दाखविले."

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न

१. स्वामी विवेकानंदांच्या चरित्राचे थोडक्यात वर्णन करा.

२. अमेरिकेत स्वामीजींनी कोणते कार्य केले? त्यांमुळे ख्रिस्ती मिशनऱ्यांपुढे कोणता प्रश्न उभा राहिला?

३. 'स्वामीजी संन्यासी असूनही कर्मयोगी होते' म्हणजे काय? यातील वैशिष्टय सांगा.

**वाचन** : 'युगाचार्य विवेकानंद'–स्वामी अपूर्वानंद.
'श्री विवेकानंद–जीवन व तत्त्वज्ञान'–प्रा. गो. श्री. बनहट्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

९.

# नामदार गोपाळ कृष्ण गोखले



जन्म ९ मे १८६६ मृत्यू १९ फेब्रुवारी १९१५

शुक्रवार ता. १९ फेब्रुवारी रोजी रात्री गोपाळराव गोखले यांना मृत्यू आला. त्यांची प्रकृती अलीकडे बरेच दिवस खालावली होती. काळजाच्या एका विकाराने ते आजारी असत व त्यांचे हे दुखणे दिवसेंदिवस वाढत चालले होते. काळजाचा विकार हा दोन-चार वर्षांचा जुना असून विलायतच्या एका प्रवासात जहाजावरील एका दाराचा धक्का छातीला लागून तो अधिकच वाढला होता. त्यातच परिश्रम करण्याची त्यांना अनिवार हौस असल्यामुळे आणि ते विश्रांती अशी थोडी घेत असल्यामुळे पुढे पुढे त्यांना रात्री झोप येत नसे; आणि आली तरी फार वेळ टिकत नसे. म्हणून त्यांनी सोसायटीतल्या एखाद्या गृहस्थाला अवेळीच उठवून आणून त्याच्याशी गोष्टी बोलत बसावे किंवा काही खेळ काढून खेळत बसावे आणि अशाने रात्र घालवावी. अशा रीतीने पळापळाने अंतकाळ जवळ येत आहे हे गोखल्यांना दिसत होते; पण त्याला त्यांचा किंवा त्यांच्या

डॉक्टरांचा काही इलाजच नव्हता. काळजाचा विकार मनुष्याला केव्हा दगा देईल याचा नेम नसतो. तरी पण ते इतक्यात जातील असे कोणास वाटले नाही. शेवटी शेवटी त्यांनी कामाचा हात थोडा आखडला होता व डॉक्टर लोक सक्त पहारा ठेवून त्यांना कोणाशी फार बोलू देत नव्हते; पण त्यांच्या प्राणाला ओहोटी लागली ती लागलीच; आणि इतके दिवस ते जगले हे तरी काम करण्याच्या हौसेनेच जगले असेही म्हणता येईल. मरणसमयी गोखल्यांचे वय अवघे ४९ वर्षांचे होते. एका दृष्टीने ते आगरकर, आपटे वगैरे समव्यवसायिकांपेक्षा अधिक जगले; परंतु हे काहीतरीच समाधान होय. टिळकांसारखे त्यांना साठासष्ट वर्षे आयुष्य लाभते तर त्यांच्या हातून आणखी किती तरी काम झाले असते; पण जेवढे आयुष्य त्यांना लाभले त्यातच त्यांनी इतर अनेक लोकांपेक्षा फार अधिक काम करून दाखविले. म्हणून टिळकांनी केसरीतील त्यांच्या मृत्युलेखावर 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरं' असे जे अवतरण लिहिले तेच खरे.

गोपाळराव गोखले हे एका गरीब कुळात जन्मले. कागल येथील त्यांच्या वडील भावाने त्यांचे एकंदर शिक्षण केले आणि अल्पवयातच ते बी. ए. झाले; पण स्वार्थत्यागाची वृत्ती मनात असल्यामुळे टिळकांच्या उज्ज्वल उदाहरणाने मोहून त्यांच्याच बोलावण्यावरून ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले व लाइफ मेंबर झाले. पुढे त्यांचे व टिळकांचे ग्रह जमले नाहीत ही गोष्ट वेगळी. शिक्षकाचे काम थोडे दिवस केल्यावर त्यांची बुद्धिमत्ता, इंग्रजी लिहिण्याबोलण्याची हातोटी, कोणत्याही विषयाचा अभ्यास करण्याची इच्छा आणि मर्मग्राहकता, व सर्वात विशेष म्हटले म्हणजे विनयशीलता हे त्यांचे गुण पाहून माधवराव रानड्यांनी त्यांना निवडून आपल्या आवडत्या शिष्यवर्गात सामील केले; आणि तेव्हापासून त्यांनी रानड्यांच्या ठिकाणी जी गुरुनिष्ठा ठेविली ती यावज्जन्म; आणि या गुरुनिष्ठेचे फळही त्यांना तसेच मिळाले. कारण 'आपणासारिखे करिती तात्काळ' ही म्हण या ठिकाणी खरी ठरली. गोखले यांचा बी. ए.च्या परीक्षेचा विषय गणित असला तरी इंग्रजी भाषेच्या आवडीने त्यांनी तिचा परिश्रमाने अभ्यास करून ती चांगली हस्तगत केली. स्मरणशक्ती खूप कमावलेली असल्याने त्यांचे इंग्रजी भाषेचे पाठांतर फार चांगले होते; पण पुढे हळू हळू इंग्रजी हा शिक्षणाचा विषय सोडून देऊन त्यांनी इतिहास व अर्थशास्त्र घेतले आणि शिक्षकाचे

काम सोडून देईपर्यंत त्यांनी त्या विषयातील आपली प्रवीणता जशी वाढविली त्याप्रमाणे आपल्या उत्कृष्ट व्याख्यानांनी शिष्यांचेही कल्याण केले. हे दोन विषय त्यांना सार्वजनिक आयुष्याच्या प्रवेशद्वारासारखे उपयोगी पडले. १८८७ पासून रानड्यांनी त्यांचा सार्वजनिक सभेत प्रवेश करविला; आणि सीतारामपंत चिपळूणकरांनंतर ते सभेचे चिटणीस व त्रैमासिकाचे संपादक झाले. या सुमारास आगरकरांबरोबर त्यांनी 'सुधारक' पत्र काढले पण पुढे लवकरच त्यांनी त्याचा संबंध सोडला. टिळक त्यांच्याहून नऊ वर्षांनी वडील; तथापि दोघांचेही सार्वजनिक चरित्र बरोबरच सुरू झाले व प्रथम बरीच कामे उभयतांनी भागीदारीने केली. एका बाजूने टिळक हे चिटणीस निवडून द्यावे तर दुसऱ्या बाजूने गोखले; पण थोड्याच दिवसांनी त्यांची जोडी फुटली आणि दोघांनीही दोन मार्ग आक्रमिले.

## परिणामकारक वक्तृत्व

सन १८९२ किंवा १८९३ साली मुंबईस एका सभेत लष्करी खर्चाच्या विषयावर गोखल्यांचे मुख्य वक्ते म्हणून भाषण झाले. अध्यक्ष मेथा व उपवक्ते वाच्छा हे होते; पण आपल्या वक्तृत्वाने व विषयप्रतिपादनाच्या शैलीने गोखल्यांनी दोघांवरही ताण केली आणि हे पाहून मेथा व वाच्छा या दोघांच्याही चेहऱ्यावर गोखल्यांविषयीच्या कौतुकाचे तेज चमकत होते हे सर्वांनी पाहिले. या वेळी गोखले अवघे सव्वीस किंवा सत्तावीस वर्षांचे असावे. सार्वजनिक कामात त्यांचे पाऊल जे एकदा पुढे पडले ते कधीच मागे आले नाही. १८९६ साली हिन्दुस्थानतर्फे वेल्बी कमिशनपुढे त्यांना साक्षीदार म्हणून पाठविण्यात आले आणि तेथे झालेली त्यांची प्रश्नोत्तरे पाहिली म्हणजे कोणालाही त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल अभिमान वाटेल. १८९९ साली ते मुंबई कायदेकौन्सिलात शिरले पण ते क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाला अपुरे असे तेव्हाच दिसून आले. १९०२–०३ साली सर फेरोजशहा मेथा यांनी वरिष्ट कौन्सिलातील आपली जागा खाली करून त्यांना दिली. तेथपासून सतत अकरा-बारा वर्षे ते तेथे होते, पण त्यांची जागा घ्यावी असे दुसऱ्या कोणाला वाटेना व द्यावी असे कोणास म्हणवेना. कौन्सिलातील त्यांची भाषणे वाचली म्हणजे ती माहितीने पूर्ण भरलेली व अत्यंत परिणामकारक अशी सहज दिसतात. शिवाय त्यांची वाणी मृदु, मोहक असल्यामुळे आणि त्यांच्या बोलण्यात सच्चेपणा व कळकळ ही मूर्तिमंत प्रगट होत असल्याने त्यांची छाप

तज्ज्ञ व निष्णात अशा अनुभविक व हुशार अधिकाऱ्यांवरही पडे. त्यांच्या भाषणात मुख्य गुण म्हटले म्हणजे भाषण लहान असो मोठे असो त्यात प्रमेय व अनुमान ही एखाद्या सुंदर इमारतीप्रमाणे प्रमाणबद्ध असत. आधार व आकडे पाहून पारखून घेतलेले असावयाचे. विषयांतर कोठेही नसावयाचे. शब्द मोजके रेखीव तोलीव असे असावयाचे. प्रत्येक वाक्यागणिक उद्दिष्टाचे पाऊल पुढे पडत असावयाचे; आणि या सर्वांवर प्रांजलपणा व मृदुलपणा ही बारीक हाताने पसरलेली असावयाची; पण उलट त्यांच्या भाषणात विनोद सहसा कोठे आढळावयाचा नाही. ज्याप्रमाणे डॉ. रासबिहारी घोष वगैरेंच्या भाषणात अभिजात वाङ्मयाचे संदर्भ व रुचिर ध्वनी पदोपदी उमटलेले दिसतात तसे यांच्या भाषणात आढळत नसत. वक्तृत्वाची जी एक ठरीव कल्पना आहे त्या दृष्टीने गोखल्यांना कदाचित वक्तेही म्हणता येणार नाही; पण मन वळविणे किंवा दुसऱ्यांना आपलेसे करणे हा जो वक्तृत्वाचा हेतू व परिणाम तो सिद्ध करण्यात इतर नामांकित वक्त्यांपेक्षाही गोखल्यांचा हातखंडा असे. याचे कारण एकच की, त्यांत प्रसाद, प्रांजलपणा, बुद्धिमत्ता व कळकळ ही खेचून भरलेली असत. यातच त्यांचा वर्ण व बाह्यरूप यांची भर पडे व त्याहिपेक्षा खरा गुण म्हटला म्हणजे त्यांच्या भाषणात ज्यांना एकदा गुरुजन किंवा नेते त्यांनी मानले त्यांच्याविषयीच काय पण समोरच्या प्रेक्षकांविषयीही त्यांची विनयबुद्धी प्रगट होई. त्यांच्या भाषणात आवेश असला तरी अपशब्द नसे आणि मर्मज्ञपणा असला तरी कुचाळी नसे. हे जे त्यांचे गुण सभापांडित्यात तेच खाजगी संभाषणातही दिसून येत. यामुळे नेमस्त पक्षाकडून परदेशी पाठविण्याला जर कोणी एकच मनुष्य योग्य असेल तर ते गोखले असे त्या पक्षाने कायमचे ठरवून टाकले होते आणि ते सार्वजनिक कार्याला दिवसभर वाहिलेले व पडेल ते काम अंगावर घेण्याला तत्पर असे असल्यामुळे इतर धंदेवाईक वकील, सॉलिसिटर, व्यापारी, कारखानदार, शालुमुत्सद्दी व पर्यंकपंडित यांना त्यांच्यापुढे हारच खावी लागे.

## सर्वश्रेष्ठ गुण : देशभक्ती आणि स्वार्थत्याग

पण इतके गुण असूनही त्यांच्या ठिकाणी होती तशी उज्ज्वल देशभक्ती, कर्तव्यनिष्ठ व स्वार्थत्यागबुद्धी नसती तर त्या गुणांचे तेज जनतेवर पडले नसते. त्यांच्या प्रतिपक्षांनादेखील हे त्यांचे दुहेरी गुण मान्य होते. पुण्याच्या दुख-

वऱ्हाच्या सभेत एका वक्त्याने केलेले त्यांचे वर्णन येथे दिले असता अप्रस्तुत होणार नाही. "ॲरिस्टॉटल याच्या व्याख्येप्रमाणे गोखल्यांनी अवगुण व गुणातिरेक या दोहोंमधल्या सुवर्णबिंदूचा बरोबर वेध केला होता. त्यांच्या अंगी धारिष्ट नव्हते पण धैर्य होते. तीव्र मतभेदपात्रता होती पण भांडखोरपणा नव्हता. शब्दात गोडी किंवा मवाळी होती पण तोंडदेखलेपणा किंवा तोंडपुजेपणा नव्हता. त्यांचा शब्दस्पर्श मृदु पण तत्त्वाला ते कठोर होते. त्यांनी हातात मखमलीचे हातमोजे घातलेसे वाटले तरी आत वळलेली मूठ लोखंडी किंवा पोलादी असे. ते सुविनीत असत पण भिऊन वागत नसत." ता. २३ फेब्रुवारीच्या केसरीत टिळकांनी अग्रलेख लिहून गोखले यांचे जे गुणवर्णन केले त्यातील एकदोन उतारे येथे देऊन हे गुणवर्णन संपवू. "एका गरीब ब्राह्मणाच्या मुलाने अभ्यास करून परीक्षा पास झाल्यावर थोड्याच वर्षांत हत्ती, घोडे, संपत्ती, सत्ता किंवा अशी दुसरी बाह्य साधने जवळ नसता सर्व देशात आपले नाव आबालवृद्धांचे तोंडी ठेवून जावे हे काही लहानसान काम नव्हे. गोखल्यांच्या अंगी अनेक गुण होते; पण मुख्य गुण म्हटला म्हणजे निर्लोभ अंतःकरणाने वेळीच देशकार्याला वाहून घेणे हा होय. तरुणपणी संसार यथास्थित करून मंदावलेल्या कायिक व मानसिक शक्ती इतर कर्तव्याच्या अभावी लोकोपयोगाला वाहणारे पुरुष आढळल्यास त्यांच्याबद्दल विशेषशी आदरबुद्धी मनात उत्पन्न होत नाही; पण इंद्रियशक्ती शाबूद आहेत, स्वार्थासाठी उद्योग करण्यास शरीर समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर आहे; आणि संसारातील सुखाचे स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ती होणे साहजिकच आहे अशा वेळी आणि विशेषेकरून या दिशेने गेले असता आपणास यश मिळण्याचा संभव इतरापेक्षा काकणभर अधिक आहे अशी मनास खात्री वाटत असतानाही या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टी मागे ओढून यथाशक्ती आपल्यास देशकार्याला वाहून घेणे, त्यात आलेली संकटे सोसण्यास कबूल असणे किंबहुना त्यातच आनंद मानून त्यासाठी सतत परिश्रम करण्यास तयार होणे याला एक प्रकारचा बळकट मनोनिग्रह लागतो; आणि तो मनोनिग्रह ज्याने दाखविला व नुसता दाखविला नव्हे तर आमरणान्त कायम ठेवला तोच पुरुष धन्य होय. मनुष्य कोणत्या कोणत्या बुद्धीने प्रवृत्त होतो हे लक्षात ठेवूनच प्रत्येकाची किंमत करावी लागते. त्यांचा स्वभाव सौम्य असल्यामुळे हाती घेतलेले काम सौम्य उपायांनीच पार पाडण्याकडे त्यांची प्रवृत्ती असे आणि

आमच्यासारख्या कित्येक लोकांस हे सौम्य उपचार अनाठायी आहेत असे वाटे; पण पथ्य आणि उपचार यांच्या तीव्रातीव्रतेसंबंधाने दोन वैद्यांमध्ये जरी मतभेद झाला तरी वैद्य या नात्याने गोपाळरावजींची जी योग्यता होती ती आम्हासही मान्य आहे."

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न

१. गोखले यांच्या वक्तृत्वशैलीचे वर्णन करा.

२. गोखले यांच्या अंगी कोणते गुण होते ? त्यांतला श्रेष्ठ गुण कोणता ? या गुणाची आवश्यकता आजही का आहे ?

३. गोखल्यांचे व्यक्तिमत्त्व कसे होते, हे थोडक्यात सांगा.

**वाचन** : 'ना. गोखले चरित्र'—साने गुरुजी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ....३७६९८.... वि: ....निबंध
क्रमांक ....१५५७.... नों: दि: ....६।५।६५

# १०.
# श्री पा द
# कृ ष्ण
# को ल्ह ट क र



जन्म २९ जून १८७१ — मृत्यू १ जून १९३५

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे नाव ज्याने ऐकले नाही असा सुशिक्षित मराठी वाचक विरळाच असेल. नाट्य, विनोद, टीका इत्यादी साहित्याच्या क्षेत्रांत त्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यांच्या अंगच्या गुणांशी–विशेषतः त्यांचा कोटिबाजपणा व विनोदशीलता यांच्याशी–माझा परिचय केवळ त्यांच्या लेखांवरून झालेला नाही; तर प्रत्यक्ष त्यांच्याशी बोलण्याचालण्यात व स्नेहाच्या व्यवहारात झालेला आहे. रा. कोल्हटकर यांच्याशी माझा परिचय प्रथम डेक्कन कॉलेजात झाला. सन १८८९ च्या पहिल्या तिमाहीत मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये पी. ई. च्या वर्गात असताना एकदोन वेळ डेक्कन कॉलेजात गेलो होतो; व पुढे १८९१ साली तर मी बी. ए. च्या अभ्यासाकरिता डेक्कन कॉलेजात राहिलो, तेव्हा इंग्रजी व संस्कृत हे विषय ऐच्छिक म्हणून त्यांनी व मी दोघांनीही घेतलेले असल्यामुळे, त्यांचा माझा सहवास वर्गबंधु, सहाध्यायी म्हणून वाढला. त्यातच आम्हा कॉलेज विद्यार्थ्यांनी त्या वर्षी केलेल्या 'मृच्छकटिक' नाटकाची भर पडली.

पुढे एल्एल्. बी. च्या अभ्यासाकरिता १८९२ व ९३ साली आम्ही दोघे व इतर काही विद्यार्थी मिळून मुंबईस एका घरात क्लब करून राहिलो होतो. १८९३ नंतर ते मुंबईस राहिले; परंतु मी मात्र एल्एल् बी. च्या टर्म्स संपवून साताऱ्यास जाऊन राहिलो; व पुढच्याच वर्षी एल्एल्. बी. ची परीक्षा पास होऊन सनद काढून वकिली करू लागलो; पण १८९६ साली केसरी-मराठा संस्थेला येऊन मिळाल्यामुळे माझा वाङ्मयव्यासंग सहजच अखंड सुरू झाला.

**नावडत्या व्यवसायातील कर्तव्यनिष्ठा !**

रा. कोल्हटकर यांच्या बाबतीत मात्र थोडा उलटा प्रकार झाला. म्हणजे वाङ्मयाच्या नादाने त्यांची एल्एल्. बी. ची परीक्षा होण्याचे काही वर्षे लांबणीवर पडले; पण, वकीलीची परीक्षा पास झाल्यावर, सनद बाजूला टाकून धंदा म्हणून मला जशी लेखणी हाती घेता आली, तशी त्यांना घेता आली नाही. ज्या वाङ्मयाभिरुचीने त्यांनी वकीलीची परीक्षा लांबविली, तिजवर त्या वकीलीने पुढे जन्मभर सूड घेतला. स्वतःच्या स्वीकाराला विलंब केल्याच्या रागावर वकीलीने त्यांना जन्मभर राबावयास लावले. रा. कोल्हटकर यांनी वकीली अप्रिय असताही जन्मभर ती सांभाळली. पण, त्याबरोबर वाङ्मयसेवाही त्यांनी इतकी केली की, तसले दुसरे उदाहरण दुसऱ्या कोणाही वकीलाचे, निदान महाराष्ट्रात तरी, दाखवून देता येणार नाही. त्यांनी आपली वकीली अत्यंत प्रामाणिकपणे केली व अत्यंत मेहनतीनेही केली. कारण त्यांच्यामागे संसाराचा व्यापही तसाच मोठा होता; परंतु मनातून त्या वकीलीच्या मेहनतीची त्यांना इतकी नावड असे की, ती एक खडतर तपश्चर्या असेच त्यांना वाटे. संसारातील संपन्नतेपेक्षा, स्वाधीनता व स्वतंत्रता हाच त्यांना मोक्ष वाटे; व या मोक्षाकरिता ही तपश्चर्या केलीच पाहिजे, ती सुटत नाही, हे ते जाणून होते; पण त्यांच्या सर्व जन्मभर त्यांना खरा आनंद जर कोणता असेल, तर तो लिहिणे, वाचणे व रसिक, सहृदय स्नेह्यांशी वाग्विलास करणे हाच होता. ही हौस भागण्याला त्यांना मुख्य नड ही आली की वकीलीच्या धंद्यामुळे त्यांना तालुक्याहून मोठ्या दर्जाच्या गावी राहता आले नाही. मे महिन्याच्या सुटीत पुण्यामुंबईकडे फेरी मारली असता वाङ्मयप्रेमी स्नेह्यांच्या गाठी काय पडतील तेवढयाच. खेडेगावच्या एकांतवासाचा मात्र त्यांनी वाङ्मयचिंतनाच्या कामी फार उपयोग करून घेतला. अकोला, उमरावतीसारख्या मोठ्या ठिकाणी ते राहते तर ३०–३२ वर्षांपूर्वी

प्रारंभ केलेली त्यांची वकीली पुष्कळ चांगली चालली असती; पण एकंदरीने वकीलीच्या कामाला अनुकूल असा त्यांचा स्वभाव नव्हता. माझ्या समजुतीप्रमाणे कोल्हटकरांनी आपल्या सगळ्या वकीलीच्या धंद्यात कोर्टाकडून किंवा कुळाकडून कधी एकही शब्द बोलून घेतला नसेल व इतक्या दिवसांत त्यांनी कोर्टाला रजेचा अर्जही कधी केला नसेल. वकीलीच्या धंद्याच्या दृष्टीने पाहता त्यांची कर्तव्यनिष्ठा अत्यंत वाखाणण्यासारखी होती.

## संभाषणातील व गायनातील आनंद

अशा रीतीने वकीलीचा धंदा त्यांनी सुखाचा करून घेतला तरी त्यांचा खरा आनंद वकीलीच्या कामातील यशात किंवा तदनुषंगिक द्रव्यसंग्रहात नव्हता. त्यांच्याकडे कुळे ओढली जात असतील ती दलालीने तर नाहीच; पण स्वतःच्या लोभबुद्धीच्या प्रयत्नानेही नाही. किंबहुना वकीलीच्या धंद्यात दिसून येणाऱ्या त्यांच्या उल्हासाने किंवा तडफेने ती आकर्षिली गेली नाहीत; तर केवळ त्यांच्या सरळ वागणुकीने, कर्तव्यतत्परतेने म्हणजे त्यांच्यावरील विश्वासाने! पण या बाजूच्या उल्हासाची किंवा आनंदाची वाण त्यांनी आपल्या स्वभावाने व वाङ्मयसेवेने भरून काढली. कुग्राम–वस्तीतही त्यांच्याभोवती कुळांचा अशीलांचा मेळा जेवढा जुळत असेल, त्यापेक्षा एरवीच्या वेळात त्यांच्याशी संभाषण करण्याचा आनंद लुटणाऱ्या विनोदलोलुप स्नेह्यांचाच मेळा मोठा असे. त्यांच्या ठिकाणी बसत असलेला हा आकर्षकतेचा गुण विद्यार्थीदशेपासूनच लोकांना पाहावयाला सापडे. मला असे स्मरते की स्नेह्यासोबत्यांशी संभाषण करणे याला त्यांनी विद्यार्थीदशेत पहिले स्थान दिलेले असून, अभ्यासक्रमातील ग्रंथवाचनाला दुसरे व कमी महत्त्वाचे स्थान दिलेले होते. त्यांच्या मित्रसंभाषणातून ज्या गप्पा-गोष्टी चालत, त्यात विद्याव्यासंग व संस्कृतीची उपासना यांचा बराच भाग असे. त्यांच्या विनोदी स्वभावाबरोबरच ईश्वराने त्यांना दुसरीही एक देणगी दिलेली होती, ती गायनकलेची. रा. कोल्हटकर यांचा आवाज हवा तसा बारीक किंवा मोठा लागत असून, त्यांच्या गळ्यात तान चांगली फिरत असे. याहीपेक्षा त्यांचा विशेष गुण हा की त्यांच्या संग्रही पदांच्या चाली विविध प्रकारच्या असत. ते एकटे असले, तरी स्वतःशी गात व गुणगुणत बसावयाचे; आणि भोवती मंडळी जमली की, अर्थातच त्यांना गाण्याचा आग्रह व्हावयाचा. मग कोणी बाजूला बसून बुकावर किंवा पेटीवर तालाचा ठेका धरावा, कोणी समोर बसून

वाहवा द्यावी, असे होता होता या गाण्याच्या जलशात घटकाच्या घटका जात. रसिकता, गायनपटुता, विनोदशीलता, कोटिबाजपणा व नाट्यवाङ्मयप्रेम ह्यांपैकी एखादा गुण अंगी असणारे थोडेबहुत विद्यार्थी केव्हाही कोणत्याही कॉलेजात असतातच; पण रा. कोल्हटकर यांच्या अंगी हे विविध गुण एकत्रित झालेले असल्यामुळे, लोकप्रियतेचे व आकर्षकतेचे एक विशेष केन्द्र असेच ते होऊन बसले होते. डेक्कन कॉलेजच्या मुख्य मोठ्या इमारतीत राहणाऱ्यांना थोडाबहुत संकोच सोसावा लागे; पण ज्यांना औट हौसेस म्हणतात त्या बैठ्या खोल्यांतून राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आसपास मोठे खुले मैदान असल्यामुळे संकोच वाटत नसे. आणि तरुण विद्यार्थ्यांच्या शीलाला शोभण्यासारखा आरडाओरडा, उच्छृंखलपणा, गायनाच्या मजलशी वगैरे सर्व प्रकार तेथे मुक्तकंठ चालत. कोल्हटकरांच्या या गुणांची आवड असणारे सहानुभवी विद्यार्थी तर त्यांच्या-भोवती जमतच. पण, अभ्यास करून कंटाळा आला म्हणजे तो घालविण्याकरिता म्हणूनही काही विद्यार्थी त्यांचेभोवती जमत. अशामुळे त्यांना एकलकोंडेपणा हवासा वाटला, तरी तो मिळत नसे. मनाच्या आवडीचा विषय वाङ्मय आणि बी. ए. च्या परीक्षेच्या अभ्यासाचाही विषय वाङ्मयीनच. यामुळे आमचे ते वर्ष आनंदात गेले व अखेर आम्ही दोघेही त्या साली परीक्षा पास झालो.

### कोल्हटकरांचे विनोदप्रेम

पुढील वर्षी मुंबईस एलएल्. बी. च्या अभ्यासाला जाऊन राहिलो, तेव्हा कॉलेजातील विशेष परिचयाची अशी आम्ही काही मंडळी काही दिवस क्लब करून व काही दिवस खाणावळीत जेवून राहिलो. तथापि राहते घर एकच होते. विशेष बोलण्याचालण्याचा प्रसंग येई तो माझा व कोल्हटकर यांचाच. क्लबात न राहिलेले पण बाहेरून जेवावयास येणारे असे एक गृहस्थ रा. बळवंत बाबाजी देशपांडे हे असत. रा. देशपांडे हे थोडेबहुत स्वतः गात व कोल्हटकरां-प्रमाणे तेही गायनप्रेमी असत; पण देशपांडे हे शास्त्रीय गायनाचे अभिमानी व कोल्हटकर हे कवाली गायनाचे अभिमानी. यामुळे या उभयतांतील वाद मोठे मौजेचे चालत; व एकमेकांकडून प्रतिपक्षाच्या गायनपद्धतीची चेष्टाकुचेष्टा चाले. तेव्हा या दोहोंपैकी कोणतीच पद्धती हस्तगत नसलेल्या माझ्यासारख्या श्रोत्या प्रेक्षकाला मोठीच करमणूक होई. दोघेही आपापल्या पद्धतीने लहरी. यामुळे कलावंत हे लहरी कसे असतात, याची आम्हा इतरांना साक्ष पटे. पदे म्हणा

म्हणून कोणी खणपटीस बसला तर हे म्हणावयाचे नाहीत; आणि स्वतः म्हणण्याची लहर येऊन यांनी एकदा तोंड उघडले म्हणजे मग कोणी कंटाळून उठून जाऊ लागला तरी समोर श्रोता पाहिजे म्हणून त्याला हाताला धरून बसवीत! दुसऱ्या कोणाला गाता येत नाही हे माहीत असताही ज्याला त्याला तुम्ही हे पद म्हणा पाहू, ते म्हणा पाहू, असा यांचा आग्रह चालावयाचा; पण त्यात त्याला गाणे येत नाही हे त्याचे वर्म काढण्याचा हेतू नसून, आपण जर गातो तर इतरांनाही गाता का येऊ नये, अशा मोठ्या भावनेचा तो आग्रह असून, शिवाय सुचविलेले पदे स्वतःच पुढे म्हणवून दाखविण्याची ती एक अनाहूत प्रस्तावना असे. कायद्याचा अभ्यास हा नाइलाज म्हणून करावयाचा. मग तो रुक्ष म्हणून त्याविषयी कोणीही एकाने दुसऱ्यापाशी चकार शब्द काढावयाचा नाही. आपले औषध आपणच घ्यावे व तोंड वाकडे करावे लागले तर ते दुसऱ्यास दाखवू नये, अशी कायद्याच्या अभ्यासाविषयी आमची भावना होती. खरे प्रेम काय ते गायन, वाङ्मय व नाटक यासंबंधाचेच सर्वांना असे. कलाविलासाच्या दृष्टीने नाटक पाहण्याला जाण्याचे साधन त्यावेळी फारसे नव्हते. म्हणून पारशी, गुजराती नाटके पाहून दुधाची हौस आम्हाला ताकावर भागवून घ्यावी लागली. त्या काळी थट्टेचा व विनोदाचा जो जो म्हणून विषय मिळे, त्याची अपूर्वाई वाटे. १८९३ साली मुंबईस हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला तेव्हा आम्ही गिरगावात मंगलदास नथूभाई यांच्या चाळीत राहत होतो; व मुंबईत अलीकडे होणाऱ्या दंग्याचे वेळी तेथील रहिवाशांची काय भावना असेल याची जाणीव चाळीस वर्षांपूर्वी आम्हाला झाली होती. दोन दिवस कॉलेजची व्याख्याने बंद असून आम्ही चाळीत बंदिवानासारखे होतो. तथापि त्या वेळीही विनोदबुद्धी जागृत होती. त्या चाळीत आमच्याबरोबर रा. काका महाजनी व त्यांची मित्रमंडळी राहात असत. या सुमारास देशावरच्या एका नाटक मंडळीला पाठविण्याकरिता महाजनी यांचे स्नेही गोविंदराव सोरटी यांनी काही खोट्या दाढीमिशा खरेदी केल्या होत्या. त्या त्यांनी लावून मुसल्मानांची सोंगे घेतली व चाळीतील दादरावरून दणदण चढून आले असता आम्ही इतर खोल्यांतील लोक आत्मसंरक्षणाकरिता व्हरांड्यात जमलो व शेवटी नाटक उघडकीला येवून केवढा हशा पिकला हे अजून आठवते. सांगण्याचे तात्पर्य इतकेच की आम्ही डेक्कन कॉलेजात असताना होतो त्याहून मुंबईस एलएल. बी. चा अभ्यास करिताना एकाच चाळीत जवळ जवळ

राहात असल्याने कोल्हटकरांचा व आमचा विशेष स्नेह जमला; आणि त्यांच्या व आमच्या वाङ्मयाभिरुचीची ओळख परस्परांना पूर्वीहून अधिक पटली.

## त्यांच्या साहित्यसेवेतील स्मृती

एल्‌एल्. बी. झाल्यावर कोल्हटकर व मी जे वेगवेगळे झालो ते इतके की, वर्षा दोन वर्षांनी त्यांची माझी सुटीत सहज गाठ पडेल तेव्हाच भेट व्हावयाची व हास्यविनोदाची उजळणी व्हावयाची. पत्रव्यवहाराचा त्यांना व मला सारखाच कंटाळा. म्हणजे चालचलाऊ कामासंबंधाने पत्रे लिहिण्याचा नव्हे; तर रिकामपणी वाङ्मय रंगवून केवळ एकमेकांच्या मनोरंजनाकरिता पत्रे लिहिण्याचा कंटाळा. दोघांनाही दिवसभर पुरून उरतील इतकी आपापली कामे होती. आमचा पत्रव्यवहार असता तर ग्रंथलेखनासंबंधाचाच असता; पण आपल्या इकडे पाश्चात्य देशांतील लोकांप्रमाणे वाङ्मयस्वरूपाचा पत्रव्यवहार करण्याची प्रथा पडलेली नाही व इतर कारणांनीही आम्ही परस्परांस पत्र लिहिण्याच्या भानगडीत फारसे पडलो नाही; पण मला असे पक्के स्मरते की माझा 'सुभाषित आणि विनोद' हा निबंध बराचसा लिहून झाल्यावर मी मुद्दाम उठून तेल्हाऱ्याला त्यांच्याकडे गेलो व तो निबंध वाचून त्यांनी चर्चेच्या द्वारे मला पुष्कळ मदत व सूचना केल्या. उलट, याचा मोबदला ते मला असा सहजगत्या देत की मे महिन्याच्या सुटीत ते आपल्या एखाद्या नवीन पुस्तकाचे हस्तलिखित पुण्याला घेऊन येत, तेव्हा ते मला वाचावयास देत. नाटके ही निबंधासारखी नसतात. म्हणजे निबंधाप्रमाणे त्यात कोणी काही सूचना केल्या तरी फारशा अमलात आणता येत नाहीत व मी सूचना केल्या असत्या तरी कोणाच्या सूचना घेण्याचा स्वभाव कोल्हटकरांचा नसल्यामुळे, मी सूचना करण्याच्या भानगडीत न पडता बरेवाईट काय दिसते, याविषयी सामान्य चर्चा करी. मे महिन्यात किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम पुण्यास असला म्हणजे तर नाट्यविषयक संभाषणे व गायन यांची गोडी कोल्हटकर असल्यामुळे विशेष येई. तसेच कै. वासुदेवशास्त्री खरे वगैरे रसिक गृहस्थ मे महिन्यात पुण्यास आले म्हणजे आमच्या घरी आम्हा त्रिवर्गांच्या ज्या बैठकी होत त्यासारखे आनंदाचे प्रसंग बहुधा फारच थोडे असतील.

कोल्हटकरांच्या टीकात्मक लेखांत स्थलसंकोचामुळे त्यांच्या तत्त्वज्ञानाचा जसा कोंडमारा होतो तसाच त्यांच्या विनोदाचाही होतो ही गोष्ट माझ्या पुष्कळ

वर्षांपूर्वी निदर्शनास आली; व मला असे आठवते की ही गोष्ट मी कोल्हटकर यांजपाशी बोलून दाखवून त्यांना असे सुचविले की "तुमच्या विनोदबुद्धीला होणारा हा अन्याय दूर करण्यासाठी तुम्ही स्वतंत्र असे विनोदी लेख लिहावे, हे बरे." कदाचित् स्वतः त्यांच्याही मनात ही गोष्ट असेल. कसेही असो या माझ्या सूचनेनंतर त्यांनी स्वतंत्र विनोदी लेख लिहिण्यास सुरवात केली. ते लेख त्यांच्या बुद्धिकौशल्याची, प्रतिभेची व विनोदशीलतेची साक्ष देणारे आहेत; व जसजसे दिवस अधिक जातील, तसतशी त्यांच्या या गुणांना मान्यता अधिक मिळत जाईल.

एका अर्थाने साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष होण्याचा मान रा. कोल्हटकर यांना माझ्या आधीच मिळावयास पाहिजे होता. कारण त्यांचे ग्रंथकर्तृत्व माझ्या आधी सुरू झाले, असे म्हणता येईल; परंतु तो मान माझ्यानंतर त्यांना मिळाला. इंदूर येथील साहित्यसंमेलनाला आम्ही दोघेही सभासद म्हणून हजर होतो; व आम्हा दोघांचीही त्यात भाषणे झाली. त्यात मी केलेले आभारप्रदर्शनाचे भाषण कोल्हटकर व मी दोघांनी मिळून योजिले होते; व माझ्या भाषणात कोट्या काय करावयाच्या हे त्यांनी व मी मिळून बसल्या बसल्या जागच्या जागी ठरविले असे स्मरते. बडोदे येथे १९२२ साली भरलेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद मला देण्यात आले. त्या संमेलनास ते हजर राहू शकले नाहीत. पुढे पुण्यास कविसंमेलन करण्याचे ठरले त्याचे, व फिरून साहित्यसंमेलन पुण्यास भरविण्याचे ठरले त्याचेही अध्यक्षपद रा. कोल्हटकर यांना देण्यात आले होते. या संमेलनांच्या अध्यक्षीय भाषणात कोल्हटकरांनी वाङ्मयाची शास्त्रीय चर्चा केली, ती लोकांना फार आवडली.

## मराठीतील विनोदपीठाचे आचार्य

यानंतर कोल्हटकरांचे पुण्यास येणेजाणे बरेच कमी झाले. त्यांची प्रकृती डोळ्यांच्या विकाराने व तोंडाच्या पक्षघाताने बिघडली; स्वतंत्र रीतीने हिंडणेफिरणे त्यांना कठीण होऊन बसले आणि वाङ्मयोपासनेचे नामांकित प्रसंगही त्यानंतर पुण्यात विशेषसे घडले नाहीत. तात्पर्य, त्यांचे माझे राहणे दूर, धंदा वेगळा, व स्वभावाची ठेवणही वेगळी; —यांमुळे आम्ही एका अर्थाने जरी बालमित्र आहो व

एकमेकांविषयी आम्हाला आदर आहे आणि वाङ्मयाची अभिरुची तर दोघांनाही सारखीच आहे तरीही प्रायः आम्ही दूरान्वितच आहो, असे म्हणण्यास हरकत नाही. पुष्कळ वेळा समान शिष्यांच्या योगाने गुरुंचे साहचर्य घडते. तशीही गोष्ट त्याची माझी नाही. कारण, त्यांच्या शिष्यांचा गोतवळा मोठा असला, तरी त्याच्याशी माझा फारसा निकट संबंध येत नाही; व स्वतः माझ्याविषयी म्हणावयाचे, तर मी कोणत्याही प्रकारे वाङ्मयात गुरुपीठ निर्माण केलेले नसून असुक एक गृहस्थ किंवा लेखक हा माझा शिष्य आहे असे मी यथार्थतेने म्हणू शकत नाही. याबाबतीत म्हटले तर इतके मात्र म्हणेन की, कोल्हटकरांना विनोदी राज्याचे मूर्धाभिषिक्त अधिपती मानतात आणि माझीही गणना एका दृष्टीने विनोदी लेखकवर्गात होत असते. सर्व जगच आपापल्या परीने विनोदाचे ऋणी असल्यामुळे कोल्हटकर, त्यांचे सांप्रदायिक अनुयायी व मी हे विशिष्ट प्रकारचे ऋणानुबंधी आहोत, इतकेच फार तर म्हणता येईल. आधुनिक मराठी वाङ्मयातील विनोदयुगाचे प्रवर्तनकार असे कोल्हटकरांचे जे वर्णन करण्यात येते. ते अगदी यथार्थ आहे. नाटके सोडून दिली असता आपल्या विनोदी लेखात कोल्हटकरांनी बंडूनाना, पांडुतात्या ही दोन व स्वतः सुदामा अशी तीने पात्रे घातली आहेत. त्यांच्या लीला कित्येकवेळा वर्णनाच्या फैलाव्यामुळे अतिशयोक्त दिसल्या तरी त्यांचे विचार, त्यांच्या चुका व त्यांच्या हातून झालेल्या योग्य गोष्टी या सर्व बहुतांशी व्यवहाराच्या मर्मस्थानाशी भिडणाऱ्या असल्यामुळे, त्यांचा विनोद मार्मिक झाला आहे. कोल्हटकरांना विनोदवर्णनात व्यवहार व कल्पना यांचेही मिश्रण उत्तम करता येते, हे दाखविणारा त्यांचा नमुनेदार लेख म्हटला म्हणजे ‘धर्मांतर’ हा होय. त्यात धर्मांतराचे स्वाभाविक व कृत्रिम प्रसंग वर्णन करून धर्मांतराच्या चळवळीवर अप्रत्यक्षरीत्या अतिशय कठोर अशी टीका केली आहे; व लोभ, बुद्धी आदिकरून मनुष्यस्वभावाचे दोष हेच धर्मांच्या नावाने बखेडा माजविण्यास मनुष्य किती उपयोगात आणतो, हे फार कुशलतेने दाखविले आहे. तसेच ‘चोरांचे संमेलन’ या विनोदी लेखात सकृद्दर्शनी व्यवहाराचा संबंध येत असता खरोखर कल्पनेचाच विलास फार बहारीचा केला आहे. तात्पर्य विनोदाच्या आधाराने कल्पनातरंग अत्यंत कुशलतेने खेळविण्यात त्यांचा हात धरणारा लेखक मराठी ग्रंथकारांत आजपर्यंत झाला नाही. म्हणूनच मराठी भाषेतील विनोदपीठाचे आचार्य ही

पदवी त्यांना बहाल करण्यात कोणीही हरकत घेईल, असे आम्हाला वाटत नाही.

♣ ♣ ♣

## अभ्यासाकरिता प्रश्न

१. कोल्हटकर व केळकर यांचा स्नेह कसा जमला ? त्यांच्या विद्यार्थीदशेतील आयुष्याचे वर्णन करा.

२. कोल्हटकरांनी वकीलीचा व्यवसाय कसा केला ?

३. कोल्हटकरांना मनापासून कोणत्या गोष्टी आवडत असत ?

४. 'मराठीतील विनोदपीठाचे आचार्य' असे कोल्हटकरांना का म्हटले आहे ?

**वाचन :** 'नाटककार कोल्हटकर'— द. रा. गोमकाळे.
'नाटककार कोल्हटकर'—प्रा. ना वा. पराडकर.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........

# ११.
# विनायक दामोदर सावरकर



जन्म
२८ मे १८८३

विनायकराव सावरकर यांच्या वयाला साठ वर्षे पुरी झाली याबद्दल त्यांचे अभिनंदन महाराष्ट्रातील व भारतातील सर्व देशप्रेमी नागरिक करीतच आहेत. मीही हर्षभराने त्यांच्यांत सामील होतो. सावरकरांचे चरित्र 'असाधारण, असामान्य, अलौकिक, लोकविलक्षण, अद्‌भुत' ही विशेषणे त्याला पुष्कळ अंशी लावण्याला अनेक दृष्टींनी योग्य आहे. सावरकरांना 'देशभक्त', 'स्वातंत्र्यवीर' ही विशेषणे जपून लावली तर खचित शोभण्यासारखी आहेत. मला स्वतःलाही ती मान्य आहेत; पण ती आडनावासारखी उठल्या सुटल्या लावणे मात्र मला पसंत नाही. एखाद्याने प्रसंगविशेषी शालजोडी किंवा जरीकाठी वस्त्र वापरले तरच त्याची शोभा किंवा त्याचे महत्त्व, पण रोज वापरून त्याचा बोळा केला तर ते महावस्त्र नव्हे. मीही सावरकरांच्या चरित्रातल्या काही गोष्टींचा प्रथम उल्लेख करून त्या पटवू शकलो, तरच मी त्यांना लावलेली उज्ज्वल विशेषणे सार्थ ठरतील. म्हणून मी ती विशेषणे या लेखाच्या शेवटापर्यंत राखून ठेवतो !

## असामान्यत्व कशात आहे ?

सावरकरांच्या कुलपरंपरेसारखी कुलपरंपरा लाभलेले अनेक आहेत. तुमच्या आमच्या पुष्कळांचे आजे पणजे मराठेशाही नष्ट झाल्यावेळी व १८५७ च्या बंडाच्या वेळी होते, आणि त्यांच्या भावना त्यावेळी कशा असतील याची कल्पना तुम्हा आम्हाला करिता येते; पण त्याचे श्रेय आज तुमच्या आमच्या खाती जमेस धरता येत नाही. सावरकरांना बालपणात लाभलेल्या सुखदुःखांच्या अनुभवांनी त्यांचा मोठेपणा सिद्ध होत नाही. तसे अनुभव पुष्कळांना असतात. सावरकरांनी ' गोमंतक ' काव्य लिहिले त्यातील कुटुंबवर्णन व विशेषतः बाललीला या यथार्थ आत्मचरित्रवर्णनपर आहेतच असे माझे मत नाही. ते एक काव्य आहे. सावरकरांचे बालपणातील गुण व अवगुण प्रायः इतर चार लहान मुलांसारखे होते. आजच्या विस्तारशील दृष्टीने त्याकडे पाहाण्याचे कारण नाही. बाल सावरकरांच्यासारखी क्षात्रवृत्ती, म्हणजे हूडपणा, धाडसीपणा असणारी मुले पुष्कळ आढळतात. लहानपणी चाकू वगैरे शस्त्रांनी ज्यांनी जखमा करून घेतल्या नाही अशी मुले किती ?

सामान्य गोष्टींच्या संबंधात सावरकरांचे बालपण, तरुणपण, प्रौढपण ही सर्व इतर चार लोकांसारखीच ठरतात. कारण सावरकर झाले तरी मनुष्यस्वभावाच्या पुष्कळ गोष्टीत सामान्यच आहेत; पण मनुष्याचे सामान्यत्व किंवा असामान्यत्व हे अशा गोष्टींवरून न ठरविता काही इतर विशेष गोष्टींवरूनच ठरवावे लागते. अशा गोष्टी थोड्या असतात पण त्याच महत्त्वाच्या असतात; आणि सावरकरांत अशा असामान्य गोष्टी कोणत्या याचे थोडेसे विवेचन करू.

सावरकरांचे वक्तृत्व, लेखन व काव्य ही सर्वच असामान्य कोटीतील आहेत. बॅ. सावरकर यांच्या लेखनाला व वक्तृत्वाला, माझ्या आठवणीप्रमाणे आज सुमारे चाळीस बेचाळीस वर्षांपूर्वी प्रारंभ झाला. प्रथम त्यांचे व्याख्यान मी पुण्याला सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात ऐकले. तेव्हाच हा वक्ता जन्मसिद्ध आहे अशी माझी खात्री झाली. कै. शिवरामपंत परांजपे यांच्याप्रमाणे बॅ. सावरकर यांच्या लेखन–वक्तृत्वाचा मूळ झरा अत्यंत तीक्ष्ण असा देशाभिमान असूनही, या गुरुशिष्यांच्या लखनशैलीत व भाषणशैलीत जमीनअस्मानाचे अंतर होते. कल्पनाशक्ती दोघांचीही पल्लेदार, परंतु शिवरामपंतांच्य

लेखनकलेत घातुक नाजुकपणा होता, त्याऐवजी या त्यांच्या शिष्याच्या लेखणीत व वाणीत कठोर निर्भयता व गावठी आडदांडपणा आढळून येई. शिवरामपंतांच्या कलेचा हेतू आपल्या शत्रूविषयी द्वेष उत्पन्न करण्याचा मुख्यतः असे; तर सावरकरांचा हेतू त्याच्याविषयी जळजळीत राग उत्पन्न करण्याचा असे.

बाळपणीच झालेली काव्यस्फूर्ती व काव्यशक्ती या गोष्टी सावरकरांमध्ये असामान्य कोटीपैकी होत्या असे खचित म्हणता येईल. त्यांच्याइतक्या अल्पवयात कविता करणारी, विशेषतः त्यांनी केल्या तशा प्रकारच्या कविता करणारी, मुले किती आढळतील ? त्यांची प्रतिभा मुखर होऊ लागण्याच्या वेळी ते १२–१४ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसावे; आणि त्यांनी आपली प्रतिभा अनुकरणाने मिळविली असे म्हणावे तर त्या वयात त्यांनी कोणाच्या कितीशा कविता वाचल्या असतील ? शिवाय या कवितांमध्ये महाराष्ट्रभक्तीची जी चमक दिसून येते ती तरी त्यांना दुसऱ्यापासून अनुकरणाने मिळालेली नव्हती हे खचित.

## कवित्व व स्वातंत्र्यवाद यांची सरमिसळ

सावरकरांची मनोरचना पाहिली तर तीत कवित्व व स्वातंत्र्यवादी देशभक्ती यांची सरमिसळ पूर्णपणे झाली आहे. त्यांच्या देशभक्तीच्या भावनेला चटकन काव्याचे स्वरूप येते, व त्यांच्या काव्यात स्वातंत्र्याची आवड कोठे ना कोठे चमकल्याशिवाय राहात नाही. संकटमय अशा जीवनातही त्यांनी किती व कशी काव्यरचना केली हे पाहून कौतुक वाटते.

तुरुंगवासात लेखनसाहित्य किती मिळणार ? शिवाय त्या साहित्याने लिहिलेल्या कवितांचे काही विषयही असे राजकीय स्वरूपाचे की त्या कविता तुरुंगाबाहेर पडण्यास प्रतिबंधच व्हायचा ! म्हणून काही काही कविता त्यांना आपल्या आपण पाठ करून संग्रही ठेवाव्या लागल्या, व काही तुरुंगातील इतर कैद्यांकडून पाठ करवून त्यांच्याबरोबर बाहेर धाडाव्या लागल्या ! लेखनसाहित्य भरपूर मिळते, व कविता करण्याला सुचणारे विषय कमी राजकीय स्वरूपाचे असते, तर सावरकरांचे हातून एकाद दुसरे 'महाकाव्य' खचित निर्माण झाले असते. तथापि, खडतर तुरुंगवासांतही मनाच्या सर्व शक्ती जागृत ठेवून, नव्हे प्रफुल्लित ठेवून, त्यांनी जी अप्रतिम काव्यरचना केली, तीही त्यांच्या बाबतीत एक असामान्य गोष्ट म्हणून सांगता येईल.

उत्कट देशभक्ती आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचे धैर्य हा सावरकरांच्या अल्पवयातलाच गुणविशेष ठरतो. तो त्यांच्या कॉलेजातील जीवनापासूनच दिसून येतो; पण कॉलेज सोडल्यानंतर विलायतेला जाण्याच्या उद्योगापासून त्यांच्यात, व त्यांच्या वयाच्या आणि त्यांच्याचप्रमाणे विलायतेला जाणाऱ्या तरुणांत खरा फरक दिसून येतो. विलायतेला जाऊन आय. सी. एस्. ची परीक्षा पास होण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवणाऱ्या, बुद्धिमान तरुणांच्या दोन पिढ्या त्यांच्यापूर्वी होऊन गेल्या होत्या; पण सावरकरांसंबंधाने बोलायचे तर ते आय. सी. एस्. परीक्षेचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून विलायतेला गेले नाहीत. तथापि एवढेच त्यांचे वैशिष्टय नाही; ते बॅरिस्टर होण्याकरिता गेले, पण बॅरिस्टर होणे हेच मुख्य उद्दिष्ट मनात न धरता गेले, हाच त्यांचा विशेष होय. विलायतेच्या स्वतंत्र वातावरणाचा फायदा घेऊन, म्हणजे तेथे जीभ सैल सोडण्यात धोका नसतो, या गोष्टीचा फायदा घेऊन अद्वातद्वा बोलणारे तरुण विद्यार्थी विलायतेत कितीतरी भेटतात ! परंतु त्यांच्यात व सावरकरांत पुष्कळ तफावत होती. विलायतेत जीभ सैल सोडणाऱ्या पुष्कळ विद्यार्थ्यांचे मुख्य उद्दिष्ट परीक्षा पास होऊन द्रव्यप्राप्तीची तयारी करून परत येणे हे असते. इतर विलायती चैनीबरोबर ते उच्छृंखलपणे बोलण्याचीही चैन करून घेतात, इतकेच काय ते ! परंतु सावरकरांची गोष्ट वेगळी होती. ते इकडून गेले तेच मुळी अशा एका धनिकाने दिलेली शिष्यवृत्ती घेऊन गेले की, जो स्वतःच यापूर्वी विलायतेत हिंदी स्वातंत्र्यवादाचा उघड पुरस्कार करू लागला होता ! हे धनिक देशभक्त म्हणजे **पंडित शामजी कृष्णवर्मा** होत. त्यांनी विलायतेत स्वातंत्र्यवादी तरुणांचे केंद्र निर्मिण्याचा उपक्रम केला होता व याविषयी त्यांनी इकडे टिळकांना जी माहिती पुरविली तिचा सुगावा लागूनच सावरकर ही शिष्यवृत्ती घेऊन विलायतेस गेले. या शिष्यवृत्तीचे नावच 'शिवाजी शिष्यवृत्ती' असे होते.

१९०५ साली शामजींनी 'इंडियन होमरुल सोसायटी' ही संस्था काढली होती; आणि त्या सोसायटीच्या काही सभासदांच्या राहण्याजेवणाच्या व्यवस्थेसाठी 'इंडिया हाऊस' नावाचे बोर्डिंग काढले होते; पण या 'परतंत्र' संस्थेत प्रवेश केल्यावर स्वतःचे असे जे उद्योग सावरकरांनी केले तेच त्यांचे खरे वैशिष्टय दाखवितात. कारण विलायतेस जाणाऱ्या तरुणांच्या वृत्तीचा ओघ देशकार्याकडे वळविणे ही गोष्ट सोपी नव्हती; पण त्याच गोष्टीत त्यांनी आपले लक्ष घातले.

विलायतेस जाण्यापूर्वी त्यांनी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उच्चार केला होता. परदेशी कपड्यांच्या होळ्या केल्या होत्या. गुप्त मंडळ्या स्थापल्या होत्या. स्वातंत्र्याचे पोवाडे रचले होते. अर्थात हिंदुस्थानच्या कोंदट राजकीय हवेतून निघून ते विलायतच्या मोकळ्या हवेत गेल्यावर आणि तेथे अनेक देशांच्य स्वातंत्र्यवादी लोकांचा सहवास त्यांना घडल्यावर, त्यांनी ती पूर्वपरंपरा नुसती चालविली इतकेच नव्हे तर अधिक पुष्ट व सुदृढ केली यात आश्चर्य नाही.

मला तर वाटते की, आपल्या पहिल्या पंचविशीत सावरकरांनी विलायतेतल्या मुक्कामात देशभक्तीच्या जितक्या गोष्टी केल्या तितक्या करणाऱ्या हिंदी तरुणांची उदाहरणे फारच थोडी सापडतील; आणि हेच सावरकरांचे असामान्यत्व असे म्हणता येईल. सावरकर विलायतेला गेले तेव्हा ते अवघे बावीस वर्षांचे होते आणि ते कैदेत कायमचे पडले तेव्हा सत्तावीस वर्षांचे होते.

१९०५ ते १९०९ सालच्या पुढे १९३७पर्यंत त्यांचे सर्व आयुष्य कारागृहात गेले. किंवा कारागृहाबाहेर पण वस्तुतः सरकारी बंदीत बंधनात गेले. यामुळे स्वतंत्रपणे राजकीय अशी कोणतीच चळवळ सावरकरांना करिता आली नाही.

आपल्या तारुण्यातील सर्वच मते स्वतः सावरकरही आज जनतेत पसरवीत नाहीत किंवा पसरवू इच्छित नाहीत. सुदैवाने आज सावरकर विद्यमान असून ते कोणती विशेष मते मान्य करितात किंवा कोणत्या विशेष मतामतांचा प्रसार आज करू इच्छितात हे जगाच्या वेशीवर टांगल्याइतके प्रकट व प्रसिद्ध आहे. आज सावरकर गुप्त मंडळ्या बनवीत नाहीत, युरोपातून हिंदुस्थानात शस्त्रास्त्रे (पिस्तुले) आणवीत नाहीत, कोणत्याही वैयक्तिक वधाचे समर्थन करीत नाहीत. लष्करात शिरण्याविषयी ते हिंदी तरुणांना उपदेश करीत आहेत; व देशाच्या क्षात्रवृत्तीची जोपासना करू पाहणाऱ्यांना त्यांचा हा उपदेश मान्यच होईल.

## स्वातंत्र्याच्या जहाल चळवळी–असामान्य धैर्य

अलीकडच्या काळातील त्यांचे चरित्र हे जरी सर्वसाधारण राजकीय पुढाऱ्यासारखे वाटले तरी बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण होण्यापर्यंतचा काळ ही सावरकरांची विद्यार्थीदशा म्हणता येईल, व या अवधीत त्यांनी ज्या गोष्टी केल्या त्या मात्र असामान्य होत. त्या अशा आहेतः—

## असामान्यत्व कशात आहे ?

सावरकरांच्या कुलपरंपरेसारखी कुलपरंपरा लाभलेले अनेक आहेत. तुमच्या आमच्या पुष्कळांचे आजे पणजे मराठेशाही नष्ट झाल्यावेळी व १८५७ च्या बंडाच्या वेळी होते, आणि त्यांच्या भावना त्यावेळी कशा असतील याची कल्पना तुम्हा आम्हाला करिता येते; पण त्याचे श्रेय आज तुमच्या आमच्या खाती जमेस धरता येत नाही. सावरकरांना बालपणात लाभलेल्या सुखदुःखांच्या अनुभवांनी त्यांचा मोठेपणा सिद्ध होत नाही. तसे अनुभव पुष्कळांना असतात. सावरकरांनी ' गोमंतक ' काव्य लिहिले त्यातील कुटुंबवर्णन व विशेषतः बाललीला या यथार्थ आत्मचरित्रवर्णनपर आहेतच असे माझे मत नाही. ते एक काव्य आहे. सावरकरांचे बालपणातील गुण व अवगुण प्रायः इतर चार लहान मुलांसारखे होते. आजच्या विस्तारशील दृष्टीने त्याकडे पाहाण्याचे कारण नाही. बाल सावरकरांच्यासारखी क्षात्रवृत्ती, म्हणजे हूडपणा, धाडसीपणा असणारी मुले पुष्कळ आढळतात. लहानपणी चाकू वगैरे शस्त्रांनी ज्यांनी जखमा करून घेतल्या नाही अशी मुले किती ?

सामान्य गोष्टींच्या संबंधात सावरकरांचे बालपण, तरुणपण, प्रौढपण ही सर्व इतर चार लोकांसारखीच ठरतात. कारण सावरकर झाले तरी मनुष्यस्वभावाच्या पुष्कळ गोष्टीत सामान्यच आहेत; पण मनुष्याचे सामान्यत्व किंवा असामान्यत्व हे अशा गोष्टीवरून न ठरविता काही इतर विशेष गोष्टींवरूनच ठरवावे लागते. अशा गोष्टी थोड्या असतात पण त्याच महत्त्वाच्या असतात; आणि सावरकरांत अशा असामान्य गोष्टी कोणत्या याचे थोडेसे विवेचन करू.

सावरकरांचे वक्तृत्व, लेखन व काव्य ही सर्वच असामान्य कोटीतील आहेत. बॅ. सावरकर यांच्या लेखनाला व वक्तृत्वाला, माझ्या आठवणीप्रमाणे आज सुमारे चाळीस बेचाळीस वर्षांपूर्वी प्रारंभ झाला. प्रथम त्यांचे व्याख्यान मी पुण्याला सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात ऐकले. तेव्हाच हा वक्ता जन्मसिद्ध आहे अशी माझी खात्री झाली. कै. शिवरामपंत परांजपे यांच्याप्रमाणे बॅ. सावरकर यांच्या लेखन-वक्तृत्वाचा मूळ झरा अत्यंत तीक्ष्ण असा देशाभिमान असूनही, या गुरुशिष्यांच्या लखनशैलीत व भाषणशैलीत जमीनअस्मानाचे अंतर होते. कल्पनाशक्ती दोघांचीही पल्लेदार, परंतु शिवरामपंतांच्य

लेखनकलेत घातुक नाजुकपणा होता, त्याऐवजी या त्यांच्या शिष्याच्या लेखणीत व वाणीत कठोर निर्भयता व गावठी आडदांडपणा आढळून येई. शिवरामपंतांच्या कलेचा हेतू आपल्या शत्रूविषयी द्वेष उत्पन्न करण्याचा मुख्यतः असे; तर सावरकरांचा हेतू त्याच्याविषयी जळजळीत राग उत्पन्न करण्याचा असे.

बाळपणीच झालेली काव्यस्फूर्ती व काव्यशक्ती या गोष्टी सावरकरांमध्ये असामान्य कोटीपैकी होत्या असे खचित म्हणता येईल. त्यांच्याइतक्या अल्पवयात कविता करणारी, विशेषतः त्यांनी केल्या तशा प्रकारच्या कविता करणारी, मुले किती आढळतील ? त्यांची प्रतिभा मुखर होऊ लागण्याच्या वेळी ते १२–१४ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसावे; आणि त्यांनी आपली प्रतिभा अनुकरणाने मिळविली असे म्हणावे तर त्या वयात त्यांनी कोणाच्या कितीशा कविता वाचल्या असतील ? शिवाय या कवितांमध्ये महाराष्ट्रभक्तीची जी चमक दिसून येते ती तरी त्यांना दुसऱ्यापासून अनुकरणाने मिळालेली नव्हती हे खचित.

## कवित्व व स्वातंत्र्यवाद यांची सरमिसळ

सावरकरांची मनोरचना पाहिली तर तीत कवित्व व स्वातंत्र्यवादी देशभक्ती यांची सरमिसळ पूर्णपणे झाली आहे. त्यांच्या देशभक्तीच्या भावनेला चटकन काव्याचे स्वरूप येते, व त्यांच्या काव्यात स्वातंत्र्याची आवड कोठे ना कोठे चमकल्याशिवाय राहात नाही. संकटमय अशा जीवनातही त्यांनी किती व कशी काव्यरचना केली हे पाहून कौतुक वाटते.

तुरुंगवासात लेखनसाहित्य किती मिळणार ? शिवाय त्या साहित्याने लिहिलेल्या कवितांचे काही विषयही असे राजकीय स्वरूपाचे की त्या कविता तुरुंगाबाहेर पडण्यास प्रतिबंधच व्हायचा ! म्हणून काही काही कविता त्यांना आपल्या आपण पाठ करून संग्रही ठेवाव्या लागल्या, व काही तुरुंगातील इतर कैद्यांकडून पाठ करवून त्यांच्याबरोबर बाहेर धाडाव्या लागल्या ! लेखनसाहित्य भरपूर मिळते, व कविता करण्याला सुचणारे विषय कमी राजकीय स्वरूपाचे असते, तर सावरकरांचे हातून एकाद दुसरे ‘ महाकाव्य ’ खचित निर्माण झाले असते. तथापि, खडतर तुरुंगवासांतही मनाच्या सर्व शक्ती जागृत ठेवून, नव्हे प्रफुल्लित ठेवून, त्यांनी जी अप्रतिम काव्यरचना केली, तीही त्यांच्या बाबतीत एक असामान्य गोष्ट म्हणून सांगता येईल.

उत्कट देशभक्ती आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचे धैर्य हा सावरकरांच्या अल्पवयातलाच गुणविशेष ठरतो. तो त्यांच्या कॉलेजातील जीवनापासूनच दिसून येतो; पण कॉलेज सोडल्यानंतर विलायतेला जाण्याच्या उद्योगापासून त्यांच्यात, व त्यांच्या वयाच्या आणि त्यांच्याचप्रमाणे विलायतेला जाणाऱ्या तरुणांत खरा फरक दिसून येतो. विलायतेला जाऊन आय. सी. एस्. ची परीक्षा पास होण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवणाऱ्या, बुद्धिमान तरुणांच्या दोन पिढ्या त्यांच्यापूर्वी होऊन गेल्या होत्या; पण सावरकरांसंबंधाने बोलायचे तर ते आय. सी. एस्. परीक्षेचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून विलायतेला गेले नाहीत. तथापि एवढेच त्यांचे वैशिष्टय नाही; ते बॅरिस्टर होण्याकरिता गेले, पण बॅरिस्टर होणे हेच मुख्य उद्दिष्ट मनात न धरता गेले, हाच त्यांचा विशेष होय. विलायतेच्या स्वतंत्र वातावरणाचा फायदा घेऊन, म्हणजे तेथे जीभ सैल सोडण्यात धोका नसतो, या गोष्टीचा फायदा घेऊन अद्वातद्वा बोलणारे तरुण विद्यार्थी विलायतेत कितीतरी भेटतात ! परंतु त्यांच्यात व सावरकरांत पुष्कळ तफावत होती. विलायतेत जीभ सैल सोडणाऱ्या पुष्कळ विद्यार्थ्यांचे मुख्य उद्दिष्ट परीक्षा पास होऊन द्रव्यप्राप्तीची तयारी करून परत येणे हे असते. इतर विलायती चैनीबरोबर ते उच्छृंखलपणे बोलण्याचीही चैन करून घेतात, इतकेच काय ते ! परंतु सावरकरांची गोष्ट वेगळी होती. ते इकडून गेले तेच मुळी अशा एका धनिकाने दिलेली शिष्यवृत्ती घेऊन गेले की, जो स्वतःच यापूर्वी विलायतेत हिंदी स्वातंत्र्यवादाचा उघड पुरस्कार करू लागला होता ! हे धनिक देशभक्त म्हणजे **पंडित शामजी कृष्णवर्मा** होत. त्यांनी विलायतेत स्वातंत्र्यवादी तरुणांचे केंद्र निर्मिण्याचा उपक्रम केला होता व याविषयी त्यांनी इकडे टिळकांना जी माहिती पुरविली तिचा सुगावा लागूनच सावरकर ही शिष्यवृत्ती घेऊन विलायतेस गेले. या शिष्यवृत्तीचे नावच ‘शिवाजी शिष्यवृत्ती’ असे होते.

१९०५ साली शामजींनी ‘इंडियन होमरुल सोसायटी’ ही संस्था काढली होती; आणि त्या सोसायटीच्या काही सभासदांच्या राहण्याजेवणाच्या व्यवस्थेसाठी ‘इंडिया हाऊस’ नावाचे बोर्डिंग काढले होते; पण या ‘परतंत्र’ संस्थेत प्रवेश केल्यावर स्वतःचे असे जे उद्योग सावरकरांनी केले तेच त्यांचे खरे वैशिष्टय दाखवितात. कारण विलायतेस जाणाऱ्या तरुणांच्या वृत्तीचा ओघ देशकार्याकडे वळविणे ही गोष्ट सोपी नव्हती; पण त्याच गोष्टीत त्यांनी आपले लक्ष घातले.

विलायतेस जाण्यापूर्वी त्यांनी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उच्चार केला होता. परदेशी कपड्यांच्या होळ्या केल्या होत्या. गुप्त मंडळ्या स्थापल्या होत्या. स्वातंत्र्याचे पोवाडे रचले होते. अर्थात हिंदुस्थानच्या कोंदट राजकीय हवेतून निघून ते विलायतच्या मोकळ्या हवेत गेल्यावर आणि तेथे अनेक देशांच्य स्वातंत्र्यवादी लोकांचा सहवास त्यांना घडल्यावर, त्यांनी ती पूर्वपरंपरा नुसती चालविली इतकेच नव्हे तर अधिक पुष्ट व सुदृढ केली यात आश्चर्य नाही.

मला तर वाटते की, आपल्या पहिल्या पंचविशीत सावरकरांनी विलायतेतल्या मुक्कामात देशभक्तीच्या जितक्या गोष्टी केल्या तितक्या करणाऱ्या हिंदी तरुणांची उदाहरणे फारच थोडी सापडतील; आणि हेच सावरकरांचे असामान्यत्व असे म्हणता येईल. सावरकर विलायतेला गेले तेव्हा ते अवघे बावीस वर्षांचे होते आणि ते कैदेत कायमचे पडले तेव्हा सत्तावीस वर्षांचे होते.

१९०५ ते १९०९ सालच्या पुढे १९३७पर्यंत त्यांचे सर्व आयुष्य कारागृहात गेले. किंवा कारागृहाबाहेर पण वस्तुतः सरकारी बंदीत बंधनात गेले. यामुळे स्वतंत्रपणे राजकीय अशी कोणतीच चळवळ सावरकरांना करिता आली नाही.

आपल्या तारुण्यातील सर्वच मते स्वतः सावरकरही आज जनतेत पसरवीत नाहीत किंवा पसरवू इच्छित नाहीत. सुदैवाने आज सावरकर विद्यमान असून ते कोणती विशेष मते मान्य करितात किंवा कोणत्या विशेष मतामतांचा प्रसार आज करू इच्छितात हे जगाच्या वेशीवर टांगल्याइतके प्रकट व प्रसिद्ध आहे. आज सावरकर गुप्त मंडळ्या बनवीत नाहीत, युरोपातून हिंदुस्थानात शस्त्रास्त्रे (पिस्तुले) आणवीत नाहीत, कोणत्याही वैयक्तिक वधाचे समर्थन करीत नाहीत. लष्करात शिरण्याविषयी ते हिंदी तरुणांना उपदेश करीत आहेत; व देशाच्या क्षात्रवृत्तीची जोपासना करू पाहणाऱ्यांना त्यांचा हा उपदेश मान्यच होईल.

## स्वातंत्र्याच्या जहाल चळवळी–असामान्य धैर्य

अलीकडच्या काळातील त्यांचे चरित्र हे जरी सर्वसाधारण राजकीय पुढाऱ्यासारखे वाटले तरी बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण होण्यापर्यंतचा काळ ही सावरकरांची विद्यार्थीदशा म्हणता येईल, व या अवधीत त्यांनी ज्या गोष्टी केल्या त्या मात्र असामान्य होत. त्या अशा आहेतः—

देशभक्तिभावनेने कवित्व केले. शिक्षकांविरुद्ध स्वाभिमान प्रकट केला. स्वदेशीचा उपदेश केला. बहिष्कारप्रदर्शनार्थ परदेशी कापडाच्या होळ्या केल्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उघड पुरस्कार केला. कायद्याची भीती मनात बाळगली नाही. बरोबरीच्या विद्यार्थ्यांना आपल्याच दिशेने विचार करावयास लावून त्यांना आपले अनुयायी व सांप्रदायी बनविले. ज्यांची स्वातंत्र्यवादी मते आधीच कळून आली होती अशांची शिष्यवृत्ती मिळविण्याची खटपट केली. विलायतेस गेल्यावर उघडपणे त्यांचाच आश्रय व संगत केली. विलायती लोकांपुढे वक्तृत्व-पूर्ण व्याख्याने देऊन स्वातंत्र्यवाद प्रतिपादला. आपले राहते टिकाण हे ज्हाल स्वरूपाच्या उद्योगाचे केंद्र बनविले. युरोपाच्या इतिहासातील राज्यक्रांतिकारक चळवळींचा अभ्यास केला, व त्यांच्या पुरस्कारार्थ लेख लिहिले. मॅझिनीचे चरित्र लिहून अंतिम स्वरूपाचा राष्ट्रस्वातंत्र्यवाद प्रतिपादला. हिंदुस्थानातील १८५७ सालच्या बंडाचा नवा अर्थ करून सांगितला व त्यावरील माहिती मिळवून मराठी व इंग्रजी ग्रंथ लिहिले. विलायती छापखानेवाले छापण्यास धजेनात असे लेख व ग्रंथ युरोपातील इतर देशांत छापविले. आक्षिप्त ठरलेले व जप्त झालेले वाङ्मय अनेक युक्तीप्रयुक्तीने विलायतेत व हिंदुस्थानात प्रसृत केले. प्रत्यक्ष खुनी मनुष्याशी जाहीर रीतीने सहानुभूती प्रकट केली. सहज विकत मिळणारी हत्यारे कधीकाळी उपयोगी पडतील पण आज निदान त्यांचा परिचय असावा अशा रीतीने पॅरिसमध्ये मिळविलेली पिस्तुले गुप्त रीतीने हिंदुस्थानात आपल्या स्नेह्या-सवंगड्यांकरिता पाठविण्यात धाडसी वृत्तीप्रमाणे बुद्धिचातुर्यही दाखविले. शेवटी सरकारचे धरणे आले व खटला झाला तेव्हा किंचित्ही भीती दर्शविली नाही, खेद दाखविला नाही, पश्चात्ताप प्रगट केला नाही. अशा संकटाकडे राष्ट्रीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने, त्यागाच्या व समाधानी वृत्तीने कसे पाहाता येते हे तरुणांना शिकविले. तुरुंगवासातील हालअपेष्टा सोसण्याची तयारी दाखविली. जिवावर उदार होऊन कातडी सोलली जाण्याचा धोका पत्करून मार्सेलिस बंदरात जहाजाच्या बारीकशा भोकातून समुद्रात उडी टाकली.

तात्पर्य, वयाच्या विशी-सत्ताविशीत असे देशभक्तिप्रेरित उद्योग आजवर किती हिंदी तरुणांनी केल्याचे दाखविता येईल ? आणि विशेष गोष्ट ही की या सर्व उद्योगांत सावरकर हे इतरांचे अनुयायी नसून पुढारीपणाने वावरत होते. त्यांच्या संगतीत आलेली इतर प्रांतांतील तरुण मुले त्यांचे पुढारीपण मान्य

करीत होती आणि त्यांच्यासबंधी नुसती आदरबुद्धी नव्हे तर प्रेमाचा जिव्हाळा प्रकट करीत होती असेच दिसून येते.

सर्व जन्म बंदिवासात जाईल व कदाचित तुरुंगातच मृत्यु येईल अशी निराशाजनक मनःस्थिती असताही सावरकर हे सर्व तऱ्हेचे बंदिवास भोगून निभावून परत आले, मोकळे झाले, व आज उघड व उजळ माथ्याने देशातील एका प्रमुख पक्षाचे पुढारी म्हणून ते विधायक राजकारण करीत आहेत. आजचे सावरकर डोळ्यापुढे दिसणाऱ्या एखाद्या अजाण मनुष्याला सावरकरांचे पूर्वचरित्र सांगितले तर त्याचा कदाचित विश्वासही बसणार नाही; परंतु आज सामान्य दिसणाऱ्या सावरकरांनी, असामान्य हा शेरा लिहावा लागण्यासारख्याच गोष्टी पूर्वचरित्रात केल्या आहेत; आणि म्हणूनच कोणी एखाद्या प्रसंगी विवेकबुद्धीने त्यांना ‘ देशभक्त ’ व ‘ स्वातंत्र्यवीर ’ हे विशेषण लावले तर ते मात्र सार्थ व समर्थनीय होईल असे मी निश्चयाने म्हणतो.

## मृत्युंजय सावरकर

१९०५ पासून १९२० पर्यंत सावरकर व मृत्यू हे केव्हाही समोरासमोर ठाकून उभे नव्हते असे झाले नाही. इंग्लंडात, मार्सेलिसच्या बंदरात, अंदमानच्या कारागृहात त्या दोघांचा डोळा एकमेकांवर भिडून राहिलेला होता.

आधी विलायतेतल्या उच्छृंखल चळवळीतही कदाचित त्यांना मृत्यू यायचा. मार्सेलिसच्या बंदरात पोहत असता सावरकरांवर झाडल्या गेलेल्या गोळ्या हे तितके अपमृत्युच नव्हते काय ? आणि अंदमानातील बंदिवासाची रोमांचकारक व दुःखद कहाणी वाचीत असता तर सावरकर हे दुःसह शरीरकष्टाने, आजाराने, सरकारी पहारेवाल्या पठाणांच्या किंवा गोऱ्या बारीसाहेबाच्या चाबकाच्या आघातांनी कसे मरण पावले नाहीत याचेच आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. एवढेच काय पण मृत्यूने दुर्लक्ष केले असता, स्वतःच आत्महत्या करण्याचे विचार सावरकरांच्या मनात एक-दोनदा येऊन गेले होते असे तेच लिहितात. बरे, शिक्षेची मुदत तरी किती ! अनेक अपराधांची संकलित शिक्षा म्हणून पन्नास वर्षांचे काळेपाणी म्हणजे ती पुरी भोगण्याला सावरकरांना एक जन्मही पुरावयाचा नाही ! बंदिवासातील त्यांची वागणूकही नमते न घेणारी, पूर्ण स्वाभिमानी ! उत्तरास प्रत्युत्तर देऊन आत्मसमर्थन करण्याला ते तयार.

सोबत्या बंदिवानांची कड घेण्याला व त्याकरिता पहारेवाल्याशी भांडायला ते तयार. संप करण्या-करविण्याला ते तयार. काटेरी पिंजऱ्यातला पक्षी पिंजऱ्याला धडक देणाऱ्या स्वभावाचा भेटला तर त्याचे अंग नित्य किती रक्तबंबाळ होऊ शकेल याची कल्पना तुम्हा-आम्हाला करिता येतेच की नाही ! तात्पर्य, या सर्व प्रतिकूल गोष्टी लक्षात घेतल्या तर सावरकरांना साठ वर्षे कशी पुरी करता आली याचे नवल वाटल्याशिवाय राहात नाही, व एका अर्थाने आपल्या दुर्दम्य स्वातंत्र्यभक्तीमुळे, अतुल मानसिक धैर्यामुळे सावरकरांनी मृत्यूवरही मात केली असे म्हणावे लागेल.

♣ ♣ ♣

**अभ्यासाकरिता प्रश्न :**

१. सावरकरांच्या अल्पवयातच त्यांचे कोणते गुणविशेष दिसून आले ?
२. विलायतेला जाऊन सावरकरांनी कोणत्या असामान्य गोष्टी केल्या ?
३. सावरकरांच्या धैर्याचे उदाहरणांसहित वर्णन करा.
४. सावरकरांना ‘ मृत्युंजय ’ का म्हटले आहे ?

**वाचन :** ‘ सावरकर चरित्र ’—शि. ल. करंदीकर.

---

# संक्षिप्त टीपा

## १. शिवाजी महाराजांची थोरवी

**पान ३ ओळ १. भोर संस्थान :** छत्रपतींच्या अष्टप्रधानांपैकी पंतसचिव यांच्या जहागिरीचा मुलूख पुणे जिल्ह्याच्या नैऋत्य दिशेस होता. भोर शहर त्याची राजधानी असल्यामुळे याला ‘ भोर संस्थान ’ म्हणत असत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातली सर्व संस्थाने विलीन झाली त्याबरोबर हेही विलीन झाले. शिवाजी महाराजांनी आपले स्वराज्य स्थापण्याचा उद्योग ज्या मावळ प्रातांत केला त्या मावळाचा बराच भाग या संस्थानाच्या अमलाखाली होता. राजगड किल्ला व रायरेश्वराचे देवस्थान या संस्थानात होते.

**पान ६ ओळ १०. सुरेन्द्रनाथ बानर्जी :** बंगाली राजकीय पुढारी व देशभक्त (इ. स. १८४८-१९२५). हिंदी राष्ट्रीय महासभेचे (कॉंग्रेसचे) हे पहिल्या

दर्जाचे पुढारी होते. १९१७ च्या पूर्वी यांनी कॉंग्रेसच्या सर्व प्रकारच्या चळवळीत प्रमुखत्वाने भाग घेतला. हे दोनदा कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. यांना १९२१ साली बंगाल प्रांताचे स्थानिक स्वराज्य मंत्री नेमण्यात आले. १९१६ च्या लखनौच्या कॉंग्रेसमध्ये स्वराज्याच्या मागणीचा मुख्य ठराव मांडण्याचा मान यांना देण्यात आला होता.

**पान ११ ओळ १८. पेमगिरी येथे राज्य केले :** दिल्लीच्या शहाजहान बादशहाने इ.स. १६६२ साली अहमदनगरची निजामशाही जिंकून मोगल साम्राज्याला जोडली, तेव्हा शहाजीने निजामशहाच्या घराण्यातल्या एका मुलाला गादीवर बसवून पेमगिरी येथे निजामाच्या नावाने राज्य चालविले. या राज्याचा मुख्य चालक शहाजी होता. हे सुमारे पाच वर्षे चालले (१९३२–३७). पेमगिरी हा किल्ला जुन्नर प्रांतात मोडतो.

**पान १२ ओळ २. शिवभारतकार :** कवींद्र परमानन्द गोविन्द निधिवासकर (नेवासकर) या नावाचा कवी शिवाजी महाराज्यांच्या दरबारी होता. त्याने 'शिवभारत' नावाचे महाकाव्य संस्कृतात लिहिले असून त्यात राज्याभिषेकापूर्वीपर्यंतचे महाराजांचे चरित्र आले आहे.

**पान १३ ओळ ६. इतिहासाचार्य राजवाडे :** पुरातत्त्वभूषण विश्वनाथ काशीनाथ राजवाडे (१८६४--१९२६) हे इतिहाससंशोधकाचे मुकुटमणि होत. त्यांनी नवीन ऐतिहासिक कागदपत्रे शोधून काढून त्यांचे २२ खंड प्रसिद्ध केले. शिवाजीमहाराजांचे वडील शहाजी राजे यांच्या पदरी असलेल्या जयराम पिंड्ये नामक कवीने लिहिलेला 'राधामाधवविलासचम्पू' नावाचा संस्कृत ग्रंथ राजवाडे यांनी १९२२ साली प्रसिद्ध केला. त्याला सुमारे २०० पानांची प्रस्तावना त्यांनी लिहिली त्यात शहाजीचे चरित्र सर्व ठिकाणची माहिती संगतवार जुळवून विवेचक दृष्टीने लिहिले आहे. त्याचाच इथे केळकरांनी उल्लेख केला आहे.

**पान १६ ओळ १६. राज्यक्रांतीच्या संधिप्रकाशाची वेळ :** सूर्य अस्ताला गेल्यावर किंवा उदयाला येण्यापूर्वी थोडा वेळ जो अंधुक प्रकाश असतो त्याला संधिप्रकाश म्हणतात. १८१७ साली इंग्रजांनी पेशव्यांचे राज्य जिंकले; म्हणजे मराठ्यांचे राज्य हाच कोणी सूर्य अस्ताला गेला. त्यानंतरच्या १०।१२ वर्षांतली परिस्थिती संधिप्रकाशासारखी अंधुक होती. नव्या राज्याची घडी पूर्ण बसायची होती; नव्या कार्यपद्धती रूढ व्हावयाच्या होत्या.

## २. महर्षी दादाभाई नौरोजी

**पान १७ ओळ १३. पोलिटिकल रेसिडेंटचा उपसर्ग :** बडोदे संस्थानचे दिवाण म्हणून दादाभाईंची नेमणूक १८७४ साली झाली. संस्थानावर देखरेख ठेवणारा रेसिडेंट फायर यांच्याशी राज्यकारभाराच्या कित्येक बाबतीत दादाभाईंचा मतभेद होऊन प्रकरण स्टेटसेक्रेटरीपर्यंत गेले. अखेर दादाभाईंची बाजू खरी ठरली; तरी रेसिडेंटाची ढवळाढवळ त्यांना सहन न झाल्यामुळे दोन वर्षांच्या आतच त्यांनी दिवाणपदाचा राजीनामा दिला.

**पान २० ओळ ५. सुप्रसिद्ध चतुःसूत्री :** कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेमध्ये स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चार गोष्टी दादाभाईंनी आपल्या भाषणात सांगितल्या. यांनाच 'चतुःसूत्री' म्हणतात. यांपैकी पहिल्या तीन साधनरूप आहेत; चौथे साध्य आहे ( त्यावेळचे ).

**पान २० ओळ २५. "आधिकारिक" पुरुष :** आधिकारिक=अधिकार-संपन्न; अधिकार अंगी असलेला. अधिकार, म्हणजे विशिष्ट कार्य करण्याची खास योग्यता, एखाद्याच्या अंगी ठेवूनच परमेश्वर त्याला जन्माला घालतो.

## ३. न्या. महादेव गोविन्द रानडे

**पान २३ ओळ १६. प्रार्थनासमाज :** हिंदुधर्मामध्ये अनेक देवदेवतांची मूर्तिपूजा आणि आत्मोन्नतीला बाधक अशा अनेक चालीरीती असल्यामुळे अनेक इंग्रजी शिकलेल्यांना तो आवडेनासा झाला. अशा इंग्रजी शिक्षितांनी आपल्या उपासनेसाठी एकेश्वरी संप्रदाय स्थापन केला. बंगाल्यात असा संप्रदाय ब्रह्मसमाज या नावाने राममोहन राय यांनी स्थापिला. महाराष्ट्रात मुंबई येथे डॉ. आत्माराम पांडुरंग, परमानंद, डॉ. भांडारकर, रानडे प्रभृतींनी **प्रार्थनासमाज** या नावाने एकेश्वरी पंथ इ. स. १८६७ साली स्थापन केला. पुढे ३ वर्षांनी पुण्यात याची शाखा स्थापन झाली. रानडे हे आरंभापासून अखेरपर्यंत या समाजाचे एक प्रमुख अध्वर्यु होते.

**पान २३ ओळ शेवटची. तेलंग–भांडारकर : काशीनाथ त्र्यंबक तेलंग** ( १८५०–१८९३ ). विख्यात संस्कृत पंडित, अधिवक्ते व न्यायाधीश. हे राजकीय पुढारी व समाजसुधारक होते. यांचे बोलणे व लिहिणे स्पष्ट पण गोडवे-पणाचे सौजन्यपूर्ण असे. सरकारशी युक्तिवाद करावा पण तिखटपणाने बोलून त्याला चिडवू नये, असे यांचे धोरण होते. आयुष्याच्या अखेरीस सरकारने

यांना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु (व्हाइस चान्सेलर) नेमले होते.

**डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर :** (१८३७–१९२५) महान संस्कृत पंडित, संशोधक व समाजसुधारक. हे सरकारी कालेजात संस्कृताचे प्राध्यापक होते. तेलंगांनंतर सरकारने यांना मुंबई विद्यापीटाचे कुलगुरु नेमले.

**पान २५ ओळ १४. टेंपलशाही :** सर रिचर्ड टेंपल हा १८७६ ते १८८० या काळात मुंबई इलाख्याचा गव्हर्नर होता. प्रजेवर करडा अंमल गाजविण्याविषयी याची ख्याती होती. याच्या कारकीर्दीत गायकवाड प्रकरणाशी, वासुदेव बळवंत फडक्यांच्या क्रांतिकारक चळवळीशी आणि बुधवारवाडा जाळण्याशी रानडे यांचा संबंध असावा असा संशय घेण्यात आला व त्यांची पत्रे फोडणे, बदली करणे वगैरे प्रकारांनी यांना त्रास देण्यात आला.

**पान २७ ओळ ७. रमाबाईसाहेब रानडे :** या. न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी. "आमच्या आयुष्यातील काही आठवणी" नावाचे फार सुंदर पुस्तक यांनी लिहिले आहे. त्यात रानड्यांचे बरेचसे चरित्र आले आहे.

**पान २७ ओळ ११. सीतारामपंत चिपळूणकर :** हे सुप्रसिद्ध पंडित कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे धाकटे बंधू. हे रानड्यांचे अनुयायी, सार्वजनिक सभेचे कार्यकर्ते आणि सभेच्या इंग्रजी त्रैमासिकाचे संपादक होते.

**पान २८ ओळ ३. वासुदेव बळवंत फडके :** इंग्रज सरकारविरुद्ध सशस्त्र बंडाचा उठाव करणारे क्रांतिकारक. यांचे बंड १८७८–७९ मध्ये झाले. १८७९ मध्ये यांना पकडण्यात येऊन यांच्यावर खटला भरण्यात आला व जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

## ४. सर फेरोजशहा मेथा

**पान २९ ओळ ५. सर अलेक्झांडर ग्रँट :** मुंबईच्या एलफिन्स्टन इन्स्टिटयूटचे मुख्य अध्यापक; पुढे हे शिक्षणखात्याचे संचालक झाले.

**पान २९ ओळ ११. कोल्हापूर प्रकरण :** कोल्हापूरचे छत्रपति शिवाजी राजे अल्पवयी असता महादेव वासुदेव बर्वे नावाच्या गृहस्थांना इंग्रज सरकारने कोल्हापूर संस्थानाचे दिवाण नेमले होते. त्यांनी शिवाजी राजांचा छळ चालविला आहे अशा अर्थाची कित्येक पत्रे 'केसरी' व 'मराठा' पत्रात प्रसिद्ध झाली. त्याबद्दल बर्व्यांनी केसरीचे संपादक आगरकर व मराठ्याचे संपादक टिळक यांवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली (१८८२). मेथा हे या दोघांचे वकील होते.

**पान ३० ओळ ५. लॉर्ड रिपन :** हिंदुस्थानचा व्हाइसरॉय व गव्हर्नर-जनरल (१८८०–८४). हिंदुस्थानच्या अत्यंत लोकप्रिय व्हाइसरॉयांपैकी हा एक होऊन गेला. याने प्रेस ॲक्ट रद्द केला व जनतेला स्थानिक स्वराज्याचे जास्त प्रमाणात अधिकार दिले.

**पान ३० ओळ ६. बदरुद्दिन तय्यबजी :** हे मुंबईचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर असून पुढे बरीच वर्षे मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती होते. मुंबईच्या प्रमुख राजकीय पुढाऱ्यांमध्ये यांची गणना होत असे.

**पान ३० ओळ २१. वरिष्ठ कायदेकौन्सिलात निवडणुकीचा अधिकार :** वरिष्ठ म्हणजे हिंदुस्थान सरकारचे. या कौन्सिलात लोकांचे प्रतिनिधी निवडून पाठविण्याचा अधिकार इ. स. १८९२ साली मिळाला.

**पान ३१ ओळ ४. स्वराज्य पक्ष :** हिंदुस्थानला स्वराज्य मिळाले पाहिजे असे रोखठोकपणे सांगणारा आणि त्यासाठी प्रयत्न करणारा पक्ष. याला राष्ट्रीय पक्ष असे म्हणत. लोकमान्य टिळक हे या पक्षाचे प्रमुख पुढारी होते.

**पान ३३ ओळ ५. मुंबईतील 'पंच' :** चालू विषयांवर व्यंगचित्रे (थट्टेखोर विनोदी चित्रे) प्रसिद्ध करणारे हे एक साप्ताहिक वर्तमानपत्र मुंबईत होते.

## ५. डॉ. ॲनी बेझंट

**पान ३६ ओळ ४, पान ३७ ओळ ७. थिऑसफी, थिऑसॉफिकल सोसायटी :** 'थिऑसफी' या शब्दाचा अर्थ ईश्वरविषयक ज्ञान किंवा आत्मज्ञान असा आहे. जगातील सर्व धर्मांच्या माणसांमध्ये बंधुभाव नांदावा आणि अध्यात्मविचाराचा प्रसार व्हावा या हेतूने कर्नल ऑल्कॉट आणि मॅडम ब्लॅव्हॅट्स्की या दोघांनी अमेरिकेत न्यूयॉर्क येथे १८७५ साली थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना केली. ही दोघे नंतर हिंदुस्थानात आली. कर्नल ऑल्कॉट यांनी मद्रासजवळ अड्यार येथे जागा घेऊन सर्व सोसायटीचे आद्यपीठ तेथे स्थापले. ते सोसायटीचे पहिले अध्यक्ष होते. त्यांच्यानंतर डॉ. ॲनी बेझंट या सोसायटीच्या अध्यक्ष झाल्या.

**पान ३७ ओळ २०. होमरूल लीग :** हिंदुस्थानला स्वराज्य त्वरित मिळावे म्हणून लोकमान्य टिळकांनी इंडियन होमरूल लीग उर्फ हिंदी स्वराज्य संघ ही संस्था स्थापन केली ( इ. स. १९१७ ). तिकडे बेझंटबाईंच्याही मनात असाच विचार येऊन त्यांनी मद्रासेस स्वतःची होमरूल लीग त्याच सुमारास

स्थापिली. त्या वेळी दोघांनी एकमेकांशी सहकार्य केले.

## ६. लो. बाळ गंगाधर टिळक

**पान ४४ ओळ २०. चिरोल :** लंडनच्या 'टाइम्स' वर्तमानपत्राचा बातमीदार म्हणून सर व्हॅलेंटाइन चिरोल हा १९०८–०९ सालात हिंदुस्थानात आला होता. त्याने येथील राजकीय परिस्थितीचे अवलोकन करून जी बातमीपत्रे टाइम्सला पाठविली ती पुढे Unrest in India (हिंदुस्थानातील प्रक्षोभ) या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली. त्यात टिळकांच्या कार्याचे विरोधी भावनेने पुष्कळ वर्णन केले असून त्यातच टिळकांना The father of Indian unrest असे म्हटले आहे.

**पान ४६ ओळ १९. लाँगफेलो :** सुप्रसिद्ध अमेरिकन कवी (१८०७–१८८२). याची कविता सोपी, भावनाशाली आणि नैतिकतेवर भर देणारी अशी असल्यामुळे फार लोकप्रिय आहे.

**पान ५१ ओळी ११, १२ :** संपूर्ण सुभाषित—**गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः।** अर्थ–'गुणवान व्यक्तींमधील गुणांची पूजा करायची असते, ती व्यक्ती स्त्री आहे की पुरुष, तिचे वय काय आहे, याकडे लक्ष देण्याचे कारण नसते.' **तेजसां हि न वयः समीक्ष्यते ।** अर्थ–'तेजस्वी लोकांच्या वयाकडे कोणी पाहत नाही.' संपूर्ण सुभाषित—**मूहूर्तं ज्वलितं श्रेयः न च धूमायितं चिरं ।** अर्थ–'फार काळ धुमसत राहण्यापेक्षा थोड्या वेळात जळून जाणे अधिक चांगले.' मुहूर्त–दोन घटका, थोडासा वेळ.

## ७. स्वामी विवेकानंद

**पान ५९ ओळ ३. राममोहन राय, केशवचंद्र सेन : राजा राममोहन राय**—विख्यात बंगाली देशभक्त, समाजसुधारक आणि धर्मसुधारक (इ. स. १७७४–१८३३). याने १८३० साली ब्रह्मसमाजाची स्थापना केली. एकेश्वरी धार्मिक संप्रदाय या नात्याने ब्रह्मसमाजाने केलेली कामगिरी फार मोठी आहे. सतीची चाल बंद करण्याची मोठी चळवळ राममोहन यांनी केली, त्याप्रमाणे पुढे सरकारने कायदा केला. हे इंग्लंडात गेले असता तेथेच १८३३ साली मरण पावले.

**केशवचंद्र सेन**—विख्यात धर्मसुधारक आणि समाजसुधारक (१८३८–१८८४). हे ब्रह्मसमाजाचे पुढारी होते. त्यांचे वक्तृत्व अप्रतिम होते. निःसीम

भक्तिभाव, तीव्र वैराग्य आणि आत्यंतिक प्रेमळपणा हे यांचे गुण.

पान ६२ ओळ १३. **लॉर्ड कर्झन** : हा १८९९ ते १९०५ पर्यंत हिंदुस्थानचा व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल होता. हा अत्यंत तिस्मारखान परंतु मोठा बुद्धिमान व कर्तबगार होता. वंगभंग यानेच केला. हिंदुस्थानच्या इतिहासात या एका गोष्टीकरिता याचे नाव अजरामर झाले आहे.

## ९. गोपाळ कृष्ण गोखले

पान ६७ ओळ ७. **आपटे** : वामन शिवराम आपटे (१८५८-१८९२)-नामांकित संस्कृत विद्वान व कोशकार. हे चिपळूणकर-टिळक यांनी स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर सुरू केलेल्या न्यू इंग्लिश स्कूलला आरंभीच येऊन मिळाले. या मंडळींनी फर्ग्युसन कॉलेज काढल्यावर त्याचे हे पहिले प्राचार्य झाले.

पान ६७ ओळ १७. **न्यू इंग्लिश स्कूल, लाइफ मेंबर** : आपल्या मुलांना स्वतंत्र वातावरणात तेजस्वी शिक्षण देण्याकरिता चिपळूणकर-टिळक-आगरकर या देशभक्तांनी स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर काढलेली शाळा. ही १८८० या जानेवारीत सुरू झाली. लाइफ मेंबर म्हणजे आजीव सदस्य.

पान ६८, ओळ ४. **सार्वजनिक सभा** : इ. स. १८७०-ही संस्था गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांनी इतर काही मंडळींच्या मदतीने स्थापन केली. लोकांची गाऱ्हाणी सरकारला कळवून सरकारला लोकहिताच्या गोष्टी करण्याचा आग्रह करणे हे 'सभे'चे मुख्य कार्य असे. या संस्थेची सूत्रे लवकरच महादेव गोविंद रानडे यांच्याकडे आली व सुमारे २० वर्षे संस्थेचे काम त्यांच्या तंत्राने चालत असे.

पान ६८ ओळ १४. **वाच्छा** : दिनशा एदलजी वाच्छा हे मुंबईचे नेमस्त पुढारी सर फेरोजशहा मेथा यांचे सहकारी होते. अर्थशास्त्र व आकडेशास्त्र यात यांची विशेष गती होती.

पान ६८ ओळ १९. **वेल्बी कमिशन** : ज्या खर्चाचा बोजा वास्तविक इंग्लंडवर पडायचा तो खर्च हिंदुस्थानवर पडतो अशी लोकांची तक्रार होती. तिची चौकशी करण्याकरिता इंग्रज सरकारने विलायतेत एक आयोग (कमिशन) नेमला. वेल्बी नावाचे साहेब त्याचे अध्यक्ष होते, म्हणून त्याला वेल्बी कमिशन म्हणतात.

**पान ६९ ओळ ८. डॉ. रासबिहारी घोष :** बंगाली देशभक्त व राजकारणी पुढारी.

## १०. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

**पान ७२ ओळ ८. पी. ई. :** पी. ई. = Previous Examination कालेजातले पहिले वर्ष व त्याची परीक्षा.

**पान ७२ ओळ ८. डेक्कन कॉलेज :** पुण्याचे सरकारी कॉलेज, हे शहरापासून ५ मैलांवर आहे. हे १८६८ साली सुरू झाले. चिपळूणकर, टिळक, आगरकर, वामन शिवराम आपटे, वा. म. जोशी प्रभृति महाराष्ट्रातले अनेक देशभक्त, विद्वान, पुढारी, वाङ्मयसेवक याच कॉलेजातून शिकून बाहेर पडले.

## ११. विनायक दामोदर सावरकर

**पान ८२ ओळ ७. गोमंतक :** अंदमानातून सुटून आल्यावर १९२१ पासून अनेक वर्षे सावरकर हे रत्नागिरीत स्थानबद्ध होते. त्यावेळी सन १९२२–२३ च्या सुमारास त्यांनी लिहिलेले काव्य. यातील नायकाच्या कुटुंबाचे व बालपणाचे वर्णन हे सावरकरांच्या कुटुंबाचे व बालपणाचे आहे, असे त्यांचे चरित्रकार म्हणतात.

**पान ८२ ओळ २४ व २६. शिवरामपंत परांजपे :** शिवराम महादेव परांजपे (१८६४–१९२९) हे टिळकांच्या काळातील सुप्रसिद्ध जहाल देशभक्त, अप्रतिम वक्ते व साहित्यकार होते. 'काळ' हे त्यांचे वृत्तपत्र त्या काळी खूप लोकप्रिय झाले असल्यामुळे यांना 'काळकर्ते' असे म्हणत. सावरकर तरुण वयातच परांजपे यांच्या सहवासात आले व त्यांच्या मनावर परांजप्यांच्या भाषण-लेखनाचा पुष्कळ परिणाम झाला, म्हणून त्यांना परांजप्यांचे शिष्य म्हटले आहे.

**पान ८४ ओळ २०. पंडित शामजी कृष्णवर्मा :** (१८५७–१९२४) हे काठेवाडी समाजातील एक धनिक व देशभक्त गृहस्थ होते. सुरवातीला व्यापार व इतर उद्योग करून यांनी पुष्कळ संपत्ती कमविली; परंतु मनातून ते जहाल स्वातंत्र्यवादी असल्यामुळे व स्वातंत्र्याची चळवळ करण्यास हिंदुस्थान पेक्षा इंग्लंडमधील परिस्थिती अनुकूल असल्यामुळे ते १८९७ साली इंग्लंडमध्ये गेले. तेथील हिंदी तरुणांमध्ये स्वातंत्र्यवादाचा व सशस्त्र क्रांतीचा प्रचार करण्यासाठी त्यांनी नंतर अनेक उद्योग केले, त्याचप्रमाणे होतकरू व देशभक्त

तरुणांना विलायतेत येता यावे यासाठी त्यांनी अनेक शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. त्यांनी दिलेली 'शिवाजी शिष्यवृत्ती' स्वीकारूनच सावरकर बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी लंडनला गेले होते.

**पान ८६ ओळ १५-१६. प्रत्यक्ष खुनी......प्रकट केली :** सावरकरांनी लंडनमधील हिंदी तरुणांत स्वातंत्र्यवादाचा जो प्रचार केला त्याचा परिणाम झालेल्या मदनलाल धिंग्रा या एका हिंदी क्रांतिकारकाने हिंदुस्थानात इंग्रजांनी केलेल्या अत्याचारांचा सूड म्हणून ता. १ जुलै १९०९ रोजी लंडन येथे एक बडे इंग्रज अधिकारी सर कर्झन वायली यांचा खून केला. त्यानंतर धिंग्राच्या निषेधाची सभा लंडन येथे भरली असता सावरकरांनी निषेधाच्या ठरावाला उघड विरोध केला होता, त्याला उद्देशून हे वाक्य लिहिले आहे.

**पान ८६ ओळ २४ मार्सेलिस बंदरात उडी टाकली :** इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध बंड व सशस्त्र चळवळी करण्याच्या आरोपां वरून सावरकरांना लंडन येथे इ. स. १९१० साली पकडण्यात आले. त्यांच्यावरील खटला हिंदुस्थानात चालावा असे ठरून 'मोरिया' या आगबोटीने त्यांना कडक बंदोबस्तातून हिंदुस्थानकडे नेण्यात येत होते. हिंदुस्थानात आपल्याला बहुतेक फाशी किंवा जन्मठेप देण्यात येईल याची पूर्ण कल्पना असल्यामुळे कैदेतून सुटून युरोपातील एखाद्या देशात वास्तव्य करावे असा सावरकरांचा विचार होता. 'मोरिया' बोट फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावरील मार्सेलिस या बंदरात उभी असताना ता. ८ जुलै १९१० रोजी सावरकरांनी शौचाला जाण्याचे निमित्त केले व संडासाच्या खिडकीतून समुद्रात उडी मारली. त्यावेळी खिडकीतून अंग काढताना त्यांच्या शरीराची कातडी सोलली गेली. ते समुद्रात पडताच, त्यांच्यावर बोटीवरून गोळ्या झाडण्यात आल्या, पण त्या सर्व चुकवून ते मार्सेलिसच्या धक्क्यावर-म्हणजेच फ्रान्सच्या भूमीवर पोचले. इतक्यात त्यांचा पाठलाग करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांना पकडले. सावरकरांची ही उडी त्यावेळी सर्व जगात गाजली होती व तिच्यातून पुढे अनेक कायदेशीर प्रश्न उद्भवले.

**पान ८७ ओळ २०. गोरा बारी साहेब :** सावरकर जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा भोगत अंदमान येथे असताना बारी हा एक आयरिश अधिकारी तेथे जेलर होता. तो राजबंदींचा अतिशय छळ करीत असे.

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ९२५२९

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थाप...
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि: ........................

REFBK-0012729
REFBK-0012729